CMYK

सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

धाराशिव | मंगळवार, ४ नोव्हेंबर २०२५ | वर्ष ३ रे अंक २४४ | पाने १२ | किंमत रु. ६/- ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



शिक्षण आणि संस्कार यामुळेच समाजाची जीवनमूल्ये घडतात आणि सुदृढ होतात. या जीवनमूल्यांची योग्य उभारणी केल्यानंतर लोकेच्छेची नदी आपल्या तटांचे अतिक्रमण करून संकटाचे कारण बनू शकणार नाही.

**- पं. दीनदयाल उपाध्याय**
पूर्व अध्यक्ष, भारतीय जनसंघ

# मानवी चुका जिवावर बेतल्या

## क्षणात होत्याचे नव्हते झाले, दोन अपघातांत ४३ मृत्युमुखी

### तेलंगणात बस-ट्रकच्या धडकेत २४ जण प्राणाला मुकले



चुरीने भरलेल्या टिप्परची धडक एवढी जबरदस्त होती की, बसचा अर्धा भाग कापत नेला. प्रवाशांच्या शरीराच्या अक्षरश: चिंधड्या उडाल्या

### जयपूरमध्ये दारुड्या टिप्पर चालकाचे रस्त्यावर तांडव, १९ ठार



मद्यधुंद डम्पर चालक जयपूरमधील रस्त्यावर मृत्यूचे थैमान घालत अनेक वाहनांना चिरडत नेले. कारला धडक दिल्यानंतर दुभाजकाला धडकून थांबला

**◆ हैदराबाद/जयपूर, ३ नोव्हेंबर**

**केवळ एखाद्या व्यक्तीच्या चुकीमुळे अनेक कुटुंब उद्ध्वस्त होतात. प्रवासाला निघालेल्या व्यक्तींना काहीही कारण नसताना प्राणास मुकावे लागते. जवळच्या आप्तांना जीवनभराचे दुख सहन करीत यातना भोगव्या लागतात. किड्या-मुंग्यासारखे देह चिरडले जातात. सोमवारी केवळ मानवी चुकीमुळे झालेल्या दोन भीषण अपघातांमध्ये ४३ नागरिकांना हकनाक जिवाला मुकावे लागले. राजस्थानातील जयपूर आणि तेलंगणातील रंगारेड्डी जिल्ह्यांत हे अपघात घडले.**

तेलंगणाच्या गंगारेड्डी जिल्ह्यात सोमवारी पहाटेच्या सुमारास सकाळी बस आणि ट्रकमध्ये झालेल्या भीषण अपघातात २४ जण ठार तर, २० प्रवासी जखमी झाले आहेत. यातील तिघांची प्रकृती गंभीर असल्याची माहिती पोलिसांनी दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अपघातावर तीव्र दु:ख व्यक्त केले आहे. चेवला मंडळातील खनापूर गेटजवळ चुकीच्या दिशेने येणाऱ्या टिप्पर आणि टीजीएसआरटीसीच्यान बसची समोरासमोर धडक झाली. गिट्टीच्या चुरीची वाहतूक करणाऱ्या टिप्परने राज्य परिवहन विभागाच्या बसला जोरदार धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की टिप्परमधील चुरी बसवर जाऊन पडली. ट्रक चालकाने चुकीच्या बाजूने भरधाव ट्रक चालवल्याने हा अपघात झाल्याचा प्राथमिक निष्कर्ष आहे. मृत्युमुखी पडलेल्यांत १० महिला आणि तीन महिन्यांच्या बालकाचा समावेश असल्याचे त्यांनी सांगितले. बसमध्ये एकूण ७२ प्रवासी होते, अशी माहिती वाहकाने दिली. पंतप्रधान मोदी यांनी राष्ट्रीय मदत निधीतून मृतकांच्या कुटुंबीयांना दोन लाख रुपयांची आणि जखमींना ५० हजार रुपये देण्याची घोषणा केली.

राजस्थानची राजधानी जयपूर येथे सोमवारी दुपारी भीषण अपघात झाला. लोहामंडी रोड नंबर १४ वर अनियंत्रित झालेल्या भरधाव डंपरने १० वाहनांना उडवले. या अपघातात १९ जणांचा जागेवरच मृत्यू झाला, तर १५ पेक्षा जास्त लोक जखमी आहेत. रिकामा डंपर महामार्गावर जात असताना अचानक त्याचे ब्रेक निकामी झाले आणि तो अनियंत्रित झाला. ब्रेक निकामी झालेल्या या डंपरने वाहनांना धडक देणे आणि पादचाऱ्यांना चिरडणे सुरू केले. वाहनांना धडक देत त्याने जवळपास ३०० मीटर अंतर पार केले. शेवटी एका दुभाजकाला धडक देऊन तो थांबला, अशी माहिती स्थानिकांनी दिली. चालक मद्यधुंद अवस्थेत असल्याचे सांगितले जाते. चालकाला ताब्यात घेतले आहे.

अपघातानंतर परिसरात गोंधळ आणि दहशतीचे वातावरण तयार झाले होते. जखमी झालेले लोक रस्त्यावरच तडफडत होते तसेच वाहनांचा चुराडा झाल्याचे दिसत होते. स्थानिकांनी तत्काळ रुग्णवाहिका बोलवल्या आणि पोलिसांना माहिती दिली. त्यानंतर जखमींना कांवटिया रुग्णालयात दाखल करण्यात आले. येथील तीन गंभीर जखमींना एसएमएस रुग्णालयाच्या ट्रॉमा सेंटरमध्ये हलवण्यात आले. अपघातग्रस्तांचे मृतदेह कांवटिया रुग्णालयातच ठेवण्यात आले आहेत. (वृत्तसंस्था)

### भयावह दृश्य, लोकांनी वस्त्रांनी झाकले मृतदेह

अपघातानंतरचे दृश्य अतिशय भयावह होते. कित्येक वाहनांचा चुराडा झालेला आणि फुटलेल्या काचा विखुरलेल्या होत्या. जागोजागी रक्ताचा सडा पडला होता. मृतदेह झाकण्यासाठी स्थानिकांनी अंगावरचे कपडे आणि चादरींचा वापर करून ते रस्त्याच्या बाजूला ठेवले. अपघातानंतर मृत्युमुखी पडलेल्यांची ओळख पटवण्यासाठी मोठी गर्दी उसळली. पोलिसांना ही गर्दी नियंत्रित करावी लागली.

## अबू जुंदालच्या विरोधातील खटला सात वर्षांनी सुरु होणार

**मुंबई** : २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यातील कथित सूत्रधार अबू जुंदालविरुद्धच्या खटल्यातील रखडलेली सुनावणी सात वर्षांनंतर पुन्हा सुरू होणार आहे. आरोपींना गोपनीय दस्तावेद देण्याचा कनिष्ठ न्यायालयाने अधिकाऱ्यांना दिलेला आदेश मुंबई उच्च न्यायालयाने सोमवारी रद्द केला. जुंदालला गोपनीय दस्तावेज देण्याच्या कनिष्ठ न्यायालयाच्या २०१८ च्या आदेशाला आव्हान देणाऱ्या दिल्ली पोलिस, नागरी उड्डयन मंत्रालय आणि परराष्ट्र मंत्रालयाने दाखल केलेल्या याचिकेला न्या. आर. एन. लड्ढा यांच्या खंडपीठाने मंजुरी दिली.

## अभिनेते पंकज त्रिपाठी यांना मातृशोक

**गोपालगंज** : अभिनेता पंकज त्रिपाठी यांच्या आई हेमवंती देवी यांचे नुकतेच बिहारमधील गोपालगंज जिल्ह्यातील बेलसंड येथील त्यांच्या वडिलोपार्जित घरी निधन झाले. त्या ८९ वर्षांच्या होत्या आणि गेल्या काही काळापासून आजारी होत्या. कुटुंबीयांच्या म्हणण्यानुसार, त्यांचे घरीच निधन झाले. पंकज त्रिपाठी त्यांच्या आईसोबत त्यांच्या शेवटच्या क्षणी उपस्थित होते. बेलसँड येथे कुटुंबातील सदस्य आणि जवळच्या नातेवाईकांच्या उपस्थितीत त्यांचे अंत्यसंस्कार करण्यात आला.




## महत्त्वाचे

### बाजारात लेन्सकार्ट आयपीओचा माहौल

**मुंबई** : भारतीय शेअर बाजार सोमवारी सपाट राहिला. दोन्ही निर्देशांकांनी सपाट पातळीवर व्यवहार केला. निर्देशांकात अवघ्या ४० अंकांची तर निफ्टीत ४१ अंकांची वाढ नोंदविण्यात आली. मात्र, या महिन्यातील सर्वाधिक चर्चेचा ठरलेला आयपीओ लेन्सकार्टला सलग दुसऱ्या सत्रातही गुंतवणूकदारांकडून जोरदार मागणी राहिली.



नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्या व्यवहाराच्या दिवशी बाजारात फारसा बदल दिसून आला नाही. ऑक्टोबरमध्ये मोठ्या प्रमाणावर नफावसुली झाली. मात्र, तिमाही निकालांमुळे काही विशिष्ट शेअर्समध्ये झालेल्या वाढीने तो परिणाम संतुलित केला. निर्देंकात महिंद्रा, टाटा मोटर्स, इटर्नल, एसबीआय, भारती एअरटेल या शेअर्समध्ये वाढ नोंदविण्यात आली. दुसरीकडे मारुती सुझुकी, आयटीसी, टाटा कन्सल्टन्सी, लार्सन अ‍ॅण्ड टूब्रो, भारती इलेक्ट्रॉनिक्स यांच्या शेअर्समध्ये घसरण दिसून आली.

## उत्तर अफगाणिस्तानातील भूकंपात २० ठार

**काबुल** : उत्तर अफगाणिस्तान सोमवारी पहाटे शक्तिशाली भूकंपाने हादरले. रिश्टर स्केलवर याची नोंद ६.३ करण्यात आली. या भूकंपात किमान २० जणांचा मृत्यू, तर ३00 जण जखमी झाल्याची माहिती आरोग्य अधिकाऱ्यांनी दिली. भूकंपाचे केंद्र खुलम् शहरापासून २२ किमी पश्चिम-नैऋत्येस होते आणि २८ किमी खोलवर पहाटे १२.५९ वाजता हा भूकंप झाल्याची माहिती अमेरिकेच्या जिऑलॉजिकल सर्व्हे विभागाने दिली.

# राहुल, तेजस्वी आणि अखिलेश महाआघाडीची तीन माकडे : योगी

**◆ दरभंगा, ३ नोव्हेंबर**

उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी सोमवारी काँग्रेस नेते राहुल गांधी, राजदचे तेजस्वी यादव आणि समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव यांना महाआघाडीचे तीन माकड, असे संबोधले.

दरभंगा जिल्ह्यातील केओटी विधानसभा मतदारसंघात एका निवडणूक सभेला संबोधित करताना, भाजपाचे वरिष्ठ नेते म्हणाले की, तीन नवीन माकडे सत्ताधारी एनडीएने केलेल्या सर्व चांगल्या कामांना पाहू शकत नाहीत, ऐकण्यास तयार नाहीत आणि बोलण्यास असमर्थ आहेत. महात्मा गांधींच्या तीन माकडांनी वाईट पाहिले नाही, वाईट ऐकले नाही आणि वाईट बोललेही नाही. पण आता, आपल्याकडे भारतीय आघाडीचे तीन माकडे आहेत. नवीन माकडे म्हणजे पप्पू, जो एनडीएने केलेले कोणतेही चांगले काम पाहत नाही, टप्पू, जो त्याबद्दल ऐकू शकत नाही आणि अक्कू, जो बोलताना हे मान्य करणार नाही.



दरभंगा जिल्ह्यातील केओटी येथे जाहीर सभेला संबोधित करताना उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ

बिहारमध्ये काँग्रेस, राजद आणि समाजवादी पक्ष गुन्हेगारांना आश्रय देत आहेत, ज्यामुळे घुसखोरांना राज्याच्या सुरक्षेशी तडजोड करण्याची संधी मिळत आहे. आपण जातीच्या नावाखाली लोकांना विभाजित करू आणि दंगली घडवू, हाच त्यांचा अजेंडा आहे. आपण असा संकल्प करूया की आपण विभाजित होणार नाही आणि एकमेकांशी लढणार नाही (ना बटेंगे, ना कटेंगे). बिहारमध्ये राजद-काँग्रेस युती सत्तेत असताना झालेल्या कथित कुशासनाचा संदर्भ देत त्यांनी आरोप केला की, त्यावेळी रेशन दुकाने लुटली गेली. आज बिहारमधील लोकांसह ८० कोटी लोकांना मोफत रेशन मिळत आहे.

आदित्यनाथ यांनी दावा केला की जर बिहारमध्ये एनडीए सरकार सत्तेत आले तर ते घुसखोरांना राज्याबाहेर काढेल आणि त्यांची संपत्ती गरिबांमध्ये वितरीत करेल.

आदित्यनाथ यांनी असा दावा केला की भाजपाने अयोध्येत राम मंदिर बांधण्याचे आश्वासन पूर्ण केले आहे आणि आता ते सीतामढीमध्ये माँ जानकीचे मंदिर बांधेल आणि राम जानकी मार्गाने ते अयोध्येशी जोडेल.

उत्तरप्रदेशच्या मुख्यमंत्र्यांनी सांगितले की पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मखाना बोर्डाची स्थापना केली आहे आणि राज्यातील डबल-इंजिन सरकार लाख बांगड्या ज्या नैसर्गिक राळापासून बनवलेल्या पारंपारिक पद्धतीने बनवल्या जातात त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी काम करत आहे. (वृत्तसंस्था)

### राजदने बिहारची ओळख हिरावली

मुझफ्फरपूर जिल्ह्यातील दुसऱ्या एका सभेला संबोधित करताना आदित्यनाथ यांनी आरोप केला की आरजेडीने बिहारला त्याची ओळख हिरावून घेतली. राज्याचे हरवलेले वैभव परत मिळवण्यासाठी, बिहारचे लोक डबल-इंजिन एनडीए सरकार निवडून देण्यास वचनबद्ध आहेत, असा दावा त्यांनी केला. आदित्यनाथ यांनी आरोप केला की आरजेडीच्या राजवटीत ३०,००० हून अधिक अपहरण झाले. आयएएस आणि आयपीएस अधिकारी देखील बिहारमध्ये काम करण्यास तयार नव्हते. कारण त्यांना लालूंचे वागणे चांगले ठावूक होते, असा दावाही योगी यांनी केला.




## चीन-पाकिस्तान करतोय् अण्वस्त्रांची चाचणी

**वॉशिंग्टन** : सक्रियपणे अण्वस्त्रांची चाचणी करणाऱ्या देशांमध्ये चीन आणि पाकिस्तानचाही समावेश असल्याचा दावा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केला. काही देशांच्या या प्रवृत्तीमुळे अणुचाचणी करणे अमेरिकेसाठी गरजेचे झाले आहे, असे डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले

# अनिल अंबानींची मालमत्ता जप्त

**◆ नवी दिल्ली, ३ नोव्हेंबर**

अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) अनिल अंबानी यांच्या रिलायन्स ग्रुपच्या ४० हून अधिक मालमत्ता जप्त केल्या आहेत. या मालमत्तांमध्ये अनिल अंबानी यांचे पाली हिल येथील घर देखील समाविष्ट आहे. जप्त केलेल्या मालमत्तांची एकूण किंमत ३,०८४ कोटी असल्याचा अंदाज आहे.

मनी लॉंड्रिंग प्रकरणात ही कारवाई करण्यात आली आहे, ज्यामध्ये रिलायन्स कम्युनिकेशन्स (आरकॉम) च्या येस बँकेच्या कर्ज आणि निधी वळवण्याच्या प्रकरणाचा समावेश आहे.

हे मालमत्ता जप्तीचे आदेश ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी पीएमएलएच्या कलम ५(१) अंतर्गत जारी करण्यात आले होते. ईडीचे म्हणणे आहे की सार्वजनिक पैसे वसूल करण्यासाठी ही पावले आवश्यक आहेत. ईडीला त्यांच्या चौकशीत रिलायन्स होम फायनान्स (आरएचएफएल) आणि रिलायन्स कमर्शियल फायनान्स (आरसीएफएल) मध्ये निधीचा मोठा गैरवापर आढळून आला आहे. २०१७ ते २०१९ दरम्यान, येस बँकेने आरएचएफएलमध्ये २,९६५ कोटी आणि आरसीएफएलमध्ये २,०४५ कोटी गुंतवले. परंतु डिसेंबर २०१९ पर्यंत, या रकमा अनुत्पादक मालमत्ता बनल्या होत्या. आरएचएफएलचे थकित कर्ज अजूनही १,३५३ कोटी आहे. (वृत्तसंस्था)

## महत्त्वाचे...



## जैद पटेल, मुजम्मिल सय्यद यांच्यासह असंख्य कार्यकर्त्यांसह शिवसेनेत प्रवेश

**सोलापूर, दि. ३ नोव्हेंबर-**

शेळगी भागातील सामाजिक कार्यकर्ते जैद पटेल व मुजम्मिल सय्यद यांनी असंख्य कार्यकर्त्यांसोबत माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांच्या प्रमुख उपस्थित व शिवसेना जिल्हाप्रमुख अमोल शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली शिवसेना पक्षात प्रवेश केला. यावेळी चांद बाबा नगर शेळगी येथे शिवसेना शाखेचे उद्‌घाटन करण्यात आले. याप्रसंगी उपजिल्हाप्रमुख तुकाराम मस्के, युवा सेना कार्यकारी सदस्य सुजित खुर्द, ओबीसी सेल जिल्हाप्रमुख प्रभाकर गायकवाड, युवानेते माजिद बागवान, यासर सय्यद, अयुब पठाण अनिकेत राठोड, शशिकांत शिंदे, अनिकेत राठोड, वैभव जवळकोटे उपस्थित होते.



## होटगी पंचायत समितीसाठी लक्ष्मी व्हनमाने यांना उमेदवारी देण्याची मागणी

**सोलापूर, दि. ३ नोव्हेंबर -**

सोलापुर जिल्हा व दक्षिण सोलापुर तालुका कॉग्रेस कमिटीच्या बैठकीत जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीत कॉग्रेस पक्षाने होटगीचे सामाजिक कार्यकर्ते दक्षिण सोलापुर तालुका युवक कॉंग्रेसचे कार्याध्यक्ष सचिन व्हनमाने यांच्या मातोश्री धानम्मा व्हसमाने यांना होटगी पंचायत समितीसाठी तिकीट मिळावे अशी मागणी दक्षिण सोलापुर कॉग्रेस सेवादल यंग ब्रिगेड तालुका अध्यक्ष मौलाली शेख यांनी जिल्हा अध्यक्ष सातलिंग शटगार व तालुका अध्यक्ष भिमाशंकर जमादार यांच्या कडे केली आहे. यावेळी माजी जिल्हाध्यक्ष बाळासाहेब शेळके, कॉंग्रेस जिल्हा उपाध्यक्ष अशोक देवकते, कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते जाफरताज पाटील, संजय गायकवाड, राधाकृष्ण पाटील उपस्थित होते.

## सिव्हील हॉस्पीटलमधून तीन दुचाकींची चोरी

**सोलापूर, दि. ३ नोव्हेंबर-**

चोरट्यांनी सिव्हील हॉस्पीटलच्या पार्किंगमधून तीन दुचाकी चोरून नेल्या. संतोष पंडीत नरूटे (वय ४६, रा. अश्विनी कॉलनी, सोलापूर) यांनी ९ ऑक्टोबर रोजी सायंकाळी सिव्हील हॉस्पीटलम धील बी ब्लॉक समोर त्यांची एमएच १३ सीई २०६२ क्रमांकाची दुचाकी ही हॅन्डल लॉक करून पार्किंगमध्ये पार्क केली होती. ती १५ हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरट्याने चोरून नेल्याची नोंद सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार मुलाणी पुढील तपास करीत आहेत. अनिश देविदास शिंदे (वय २३, रा. पाटील चाळ, बार्शी) यांनी ७ ऑगस्ट रोजी सायंकाळी सिव्हील हॉस्पीटल परिसरात एमएच १३ सीडीआर ६१९४ ही दुचाकी हॅन्डल लॉक करून पार्क केली होती. ती ५० हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरट्याने चोरून नेल्याची नोंद सदर बझार पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. पोलिस हवालदार चव्हाण पुढील तपास करीत आहेत. ज्योतीबा सौदागर गुंड (वय ४०, रा. राघवेंद्र अपार्टमेंट, सोलापूर) यांनी १५ ऑक्टोबर २०२५ रोजी सायंकाळी सिव्हील हॉस्पीटलम धील विद्यार्थी उपहारगृहासमोर त्यांची एमएच १३ सीडब्ल्यू ५७९० क्रमांकाची दुचाकी ही हॅन्डल लॉक करून पार्क केली होती. ती १५ हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरट्याने चोरून नेले. हवालदार पापडे पुढील तपास करीत आहेत.

## सराईत गुन्हेगार शकलेश जाधव दोन जिल्ह्यातून दोन वर्षासाठी तडीपार

**सोलापूर, दि. ३ नोव्हेंबर -**



सेटलमेंट फ्री कॉलनी परिसरातील सराईत गुन्हेगार शकलेश जाधव यास पोलिस उपायुक्त विजय कबाडे यांनी सोलापूर व धाराशिव या दोन जिल्ह्यातून दोन वर्षासाठी तडीपार करण्याचे आदेश दिले. तडीपारीच्या आदेशानंतर पोलिसांनी त्यास पुणे येथे सोडले आहे. शकलेश सिद्राम जाधव (वय ३७, रा. सेटलमेंट फ्री कॉलनी नं. ६, सोलापूर) असे तडीपार करण्यात आलेल्या गुन्हेगाराचे नाव आहे. शकलेश जाधव याच्याविरुध्द सोलापूर शहरातील पोलिस ठाण्यांमध्ये सन २०२३, २०२४ व २०२५ या कालावधीमध्ये गुन्हे दाखल आहेत. जाधव याच्याविरुध्द सामान्य नागरीकांची फसवणुक करणे, नागरीकांना शिवीगाळ व मारहाण करून दहशत निर्माण करणे, आत्महत्येस प्रवृत्त करणे यासारखे गुन्हे दाखल असल्याने त्याच्या गुन्हेगारी कृत्यांना आळा घालण्यासाठी त्याच्याविरुध्द तडीपारीची कारवाई करण्याबाबतचा प्रस्ताव सलगर वस्ती पोलिस ठाण्याकडून पोलिस उपायुक्त कबाडे यांच्याकडे पाठविण्यात आला होता. त्यास पोलिस उपायुक्त कबाडे यांनी मंजूरी देत शकलेश जाधव यास सोलापूर व धाराशिव या दोन जिल्ह्यातून दोन वर्षासाठी तडीपार करण्याचे आदेश दिले. तडीपारीच्या आदेशानंतर शकलेश जाधव यास पुणे येथे सोडण्यात आलेले आहे.

## जनविकास क्रांती सेना महापालिका निवडणूक लढविणार

**सोलापूर, दि.३ नोव्हेंबर-**

जनविकास क्रांती सेना या नव्या राजकीय पक्षाची स्थापना करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाकडे याची रीतसर नोंदणी करण्यात आली असून त्याचे प्रमाणपत्रही मिळाले आहे, अशी माहिती संस्थापक अध्यक्ष विष्णू कारमपुरी यांनी पत्रकार परिषदेत दिली. शहराच्या विकासासाठी मी सोलापूर व माझे सोलापूर ही सामाजिक संघटना स्थापन करून गेल्या वर्षभरात अनेक समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर कामगार कार्यकर्ते यांच्याशी चर्चा करून जनविकास क्रांती सेना या राजकीय पक्षाची स्थापना करण्याचा निर्णय घेतला. येणारी सोलापूर महापालिका निवडणूक पक्षाच्या वतीने लढविण्यात येणार असल्याचे श्री. कामपुरी यांनी सांगितले.

# बीडीडी चाळ 'अत्यावश्यक प्रकल्प' म्हणून घोषित करा : मुख्यमंत्री

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ३ नोव्हेंबर-**

राज्यातील सुरू असलेले विकास प्रकल्प नियोजित वेळेत पूर्ण करण्यात यावे. हे प्रकल्प सुरू असताना येणाऱ्या अडचणी तात्काळ दूर करण्यात याव्यात, तसेच नवीन प्रकल्प दोन ते अडीच वर्षात पूर्ण झाले पाहिजे, असे नियोजन करण्यात यावे. विविध विकास प्रकल्प तयार करताना अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा, असे स्पष्ट निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. बीडीडी चाळ हा अत्यावश्यक प्रकल्प म्हणून घोषित करण्याची सूचनाही त्यांनी दिली.



सह्याद्री अतिथीगृहात सोमवारी त्यांच्या अध्यक्षतेखाली येथे मुंबई उपनगर, ठाणे व पुणे येथे सुरू असलेल्या पायाभूत विकास प्रकल्पाचा आढावा घेण्यात आला. या बैठकीस प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी तसेच संबंधित प्रकल्पाचे कंत्राटदार उपस्थित होते. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत मुंबई मेट्रो लाईन - २ - बी ही डी.एन.नगर ते डायमंड गार्डन-मंडाले या मार्गाने धावणार असून यात १९ स्टेशन्स असणार आहे. हा मेट्रो प्रकल्प ३१ मार्च २०२७ पर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश देत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, स्वामी समर्थनगर ते विक्रोळी ही मेट्रो लाईन ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत पूर्ण करण्यात यावी. याकरिता नगरविकास विभागाने श्याम नगर स्टेशन येथील जमिनीसंदर्भातील अडचणी १५ दिवसात सोडवाव्यात.

शिवडी ते वरळी हा जोडमार्ग प्रकल्प दिवसरात्र कामे करून पूर्ण करण्यात यावा. जे प्रकल्प मागे पडले ते वेळेत कसे पूर्ण होतील, यासाठी संबंधित अधिकारी आणि कंत्राटदाराने लक्ष देण्याचे निर्देश दिले.

पुणे महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणामार्फत मान-हिंजेवाडी-शिवाजीनगर या मेट्रो लाईन ३ चे कामकाज ३१ मार्च २०२६ पर्यंत पूर्ण होणार आहे. नायगाव येथील बीडीडी चाळ प्रकल्प जून २०२९ पर्यंत पूर्ण तर वरळी येथील प्रकल्प मे २०२९ पर्यंत पूर्ण करण्याच्या सूचना केल्या. मुंबईतील एन.एम.जोशी बीडीडी चाळ प्रकल्प हा जून २०३१ पर्यंत पूर्ण करण्याच्या सूचना करून 'बीडीडी चाळ' प्रकल्पास अत्यावश्यक प्रकल्प म्हणून घोषित करण्याची सूचना केली.

ठाणे-बोरिवली दुहेरी बोगदा प्रकल्प, उत्तन विरार सी लिंक प्रकल्प, ऑरेंज गेट ते मरीन ड्राईव्ह शहरी बोगदा प्रकल्प योग्य नियोजन करून वेळेत पूर्ण होईल, असे पाहण्याचे निर्देश देवून फडणवीस म्हणाले की, ऐरोली-कटई नाका फ्रीवे प्रकल्पामुळे प्रवासाचा वेळ २० मिनिटावर येणार आहे. यासाठी जमीन अधिग्रहणासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने तात्काळ रक्कम द्यावी असेही निर्देश दिले.

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास प्राधिकरणामार्फत वडपे-ठाणे हा २३.८ कि.मी. रस्ता बांधकाम सुरू असून यातील १९ किमीचा रस्ता तयार झाला असून संपूर्ण रस्ता मार्च २०२६ पर्यंत पूर्ण होणार आहे. हा रस्ता समृद्धी महाम ार्गासाठी महत्त्वपूर्ण असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

त्याचबरोबर मुंबई पुणे मिसिंग लिंकचे काम लवकर पूर्ण करण्यात येणार आहे. वांद्रे -वर्सोवा सी लिंक प्रकल्पाचे काम धीम्या गतीने सुरू असल्याबाबत मुख्यमंत्र्यांनी यावेळी नाराजी व्यक्त केली. हा प्रकल्प वेळेत पूर्ण होण्यासाठी संबंधित कंत्राटदाराने अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून वेळेत कामे पूर्ण करण्याचे आदेश दिले.

फडणवीस यांनी यासोबतच म हावितरण,जलसंपदा आणि सिडको यांच्यामार्फत सुरू असलेल्या विविध विकासकामांचा आढावा घेतला.




## सोलापूरच्या डिजिटल सखींचं काम नव्या पिढीतील महिलांसाठी प्रेरणादायी : ॲड. सरिता माकाशी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ नोव्हेंबर-**

सोलापूरच्या डिजिटल सखीचे काम हे सध्याच्या नव्या पिढीतील महिलांसाठी आदर्शवत असून त्यांच्याकडून इतर महिलांनी प्रेरणा घेऊन कुटुंब आणि समाजाच्या विकासासाठी पुढे येण्याची गरज असल्याचे मत जेष्ठ सामाजिक कार्यकर्त्या सरिता मोकाशी यांनी व्यक्त केले.

२ नोव्हेंबर रोजी सोलापूर येथील अंत्रोळीकर नगर मध्ये डिजिटल सखींचा कृतज्ञता मेळावा आयोजित केला होता. या मेळाव्यात त्या प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या यावेळी सामाजिक कार्यकर्त्या व डिजिटल सखी प्रकल्पाच्या समन्वयक प्रा. रेश्मा कदम, भाग्यशी जवळे, सामाजिक कार्यकर्ते शहाजी गडहिरे उपस्थित होते.

अफार्म व अस्तित्व या सामाजिक संस्थांच्या वतीने सोलापूर जवळच्या दहा गावांमध्ये डिजिटल वित्तीय साक्षरता, उद्योजकता विकास व महिलांचा निर्णय प्रक्रियेतील सहभाग, नेतृत्व विकास यासाठी डिजिटल सखी प्रकल्प २०१७ ते २०२२ या कालावधीत राबवण्यात आला असून या प्रकल्पाच्या माध्यमातून शेकडो महिलाना डिजिटल साक्षर करण्यात आले आहे,अनेक महिलांनी स्वतःच्या व्यवसायाची व्याप्ती वाढवून आधुनिक व्यवसाय करीत आहेत.काही जनी आपापल्या गावांमध्ये महिलांच्या विकासाचे काम करीत आहेत. या प्रकल्पातील सहभागी डिजिटल सखींचा काल कृतज्ञता मेळावा आयोजित करण्यात आला होता.

यावेळी उपस्थित डिजिटल सखी प्रकल्पातील महिलांनी आपापले अनुभव सांगितले. यावेळी पूर परिस्थितीत लोकांना रात्रंदिवस राबून मदत करणाऱ्या तब्बू नगारे व पल्लवी वडने यांचा यथोचित सत्कार सरिता मोकाशी व प्रा. रेश्मा कदम यांच्या हस्ते करण्यात आला. प्रास्ताविक सामाजिक कार्यकर्ते शहाजी गडहिरे यांनी केले तर आभार प्रवीण सूर्यगंध व पल्लवी वडने यांनी मानले.

## धाराशिव, सोलापूर जिल्ह्यातील ४८ पूरग्रस्त गावात आरोग्य शिबीर घेणार



### भारतीय जैन संघटना व फॅमिली प्लॅनिंग असोसिएशनचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.३ नोव्हेंबर-**

सोलापूर, सोलापूर व धाराशीव जिल्हयातील पूरग्रस्त भागातील ४८ गावात फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन व भारतीय जैन संघटना, इंडियन रेडक्रॉस सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने या शिबीराचे आयोजन केले आहे.

फॅमिली प्लॅनिंग असोशिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखा, स्प्रिंट फोर हयूम्यानिटेरियन प्रोजेक्ट, भारतीय जैन संघटना इंडियन रेड क्रॉस सोसायटी, शाखा सोलापूर, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, सोलापूर व धाराशिव, आरोग्य विभाग सोलापूर जिल्हापरिषद, आरोग्य विभाग धाराशिव जिल्हापरिषद सोलापूर व धाराशिव जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने सोलापूर व धाराशिव जिल्ह्यातील सीना नदी पूरग्रस्त गावांमध्ये नोव्हेंबर २०२५ ते फेब्रुवारी २०२६ पर्यंत ४८ गावांमध्ये कुटुंबकल्याण, प्रजनन व आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहेत.

सभेत भारतीय जैन संघटनेच्या कांचनमाला संगवे, शाम पाटील, अभिनंदन विभूते, माया पाटील, वर्षा जैन, सागर दुरुगकर, श्वेता दुरुगकर, राजेंद्र पाटील, शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड, कार्यक्रम अधिकारी वीरेंद्र परदेशी, प्रकल्प समन्वयक स्वप्नील सोनावणे, लॅब टेकनिशियन व्यंकटेश कंची, भारतीय जैन संघटना पदाधिकारी ओम पाटील आदी उपस्थिति होते.

फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, मुंबई मुख्यालयाचे डायरेक्टर जनरल डॉ. कल्पना गडगडे, असिस्टंट डायरेक्टर अमिता धानू, स्प्रिंट प्रोजेक्ट मॅनेजर डॉ. अमित किटूकले, सोलापूर शाखेचे चेअरपर्सन प्रा. डॉ. एन. बी. तेली, मार्गदर्शक प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर, प्रा. डॉ. नभा काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रकल्प सुरु करण्यात आला आहे.

## प्रफुल्ल कदम यांचे गुरुवारी सांगोल्यात महाराष्ट्र उपोषण

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.३ नोव्हेंबर -**



महाराष्ट्रात वाढत चाललेली शिवराळ भाषा, जातीय द्वेष व असभ्य वर्तन यासाठी राज्यात स्वतंत्र आचारसंहिता लागू करा, सर्व प्रकारच्या आंदोलनासाठी सुसंवाद कार्यपद्धती निश्चित करा, अधिकाऱ्यांनी जनतेशी नीट बोलावे नीट वागावे यासाठी स्वतंत्र आदेश पारित करा, प्रसार माध्यमांनाही स्वतंत्र आचारसंहिता लागू करा यासह महत्त्वपूर्ण व अभ्यासपूर्ण चौदा मागण्यांसाठी मी गुरुवार ६ नोव्हेंबर रोजी सांगोला तहसील कार्यालयासमोर महाराष्ट्र उपोषण करीत असल्याची माहिती किसान व वॉटर आम ींचे प्रफुल्ल कदम यांनी पत्रकार परिषदेत दिली. या उपोषणास पाठिंबा देण्यासाठी शेतकरी संघटनेचे माजी खा.राजू शेट्टी, महाराष्ट्र प्रदेश सरपंच संघटनेचे अध्यक्ष प्रा.राजेंद्र कराळे, असीम सरोदे आदी उपस्थित राहणार आहेत. राज्यातील अनेक भजनी मंडळी त्या ठिकाणी येऊन महाराष्ट्र राज्यासाठी विठ्ठल नामाचा गजर करणार आहेत.

सांगोला व तालुक्यातील सर्व माजी सैनिक यांच्या हस्ते तसेच प्रा.पी.सी.झपके, डॉ.शिवाजीराव ढोबळे व कल्पनाताई शिंगाडे यांच्या हस्ते राष्ट्रपुरुषांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व अभंगवाणीने प्रफुल्ल कदम यांच्या उपोषणाची सुरुवात होणार आहे.

## 'मनमंथन' पुस्तक प्रकाशन सोहळा व कवी संमेलन उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ नोव्हेंबर-**

रंगभवन चौक येथील समाजकल्याण हॉल येथे कवयित्री लेखिका डॉ. राजश्री संजय जाधव यांनी लिहलेला कविता संग्रह मनमंथन या पुस्तकाचे प्रकाशन मराठी भाषा दक्षता अधिकारी डॉ. शिवाजी नारायणराव शिंदे यांच्या हस्ते संपन्न झाले.

अध्यक्षस्थानी जेष्ठ साहित्यिक सीताराम बबनराव नरके (पुणे ) हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून जेष्ठ साहित्यिक राजेंद्र भोसले उपस्थित होते. या पुस्तकाची प्रास्ताविक व स्वागत संयोजन साहित्य लेखक कवी दत्तात्रय इंगळे यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. नरेंद्र गुंडेली यांनी केले. अध्यक्ष व पाहुण्यांचा परिचय कवी सुरेश निकंबे व कवी भगवान चौगुले यांनी केले. कवी मयुरेश कुलकर्णी यांनी



आभार मानले.

याच वेळी आयोजित केलेल्या कविसंमेलनात सोलापूर व महाराष्ट्रातील म ान्यवर कवी मधुकर हुजरे, अशोक मोहिते, राजश्री जाधव, छाया उंब्रजकर, प्रकाश महामुनी, शोभा माळवे, कवियत्री सविता पाटील, कवियत्री वर्षा (उदगीर), मयुरेश कुलकर्णी, शैलेश उकरंडे, दत्तात्रय इंगळे, जमालोद्दीन शेख, नरेंद्र गुंडेली, प्रतीक्षा व्हटकर, सुरेश निकंबे, अजय बनसोडे, प्रियांका जगझाप, मुक्तेश्वर मूळे, भगवान चौगुले, महेश रायखेलकर, गणेश लोंढेसह ४० कवीनी बहारदार कविताचे सादरीकरण करून रसिक प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले.

## जुबेरप्रकरणात शिबीर आयोजित करणाऱ्या संघटनेचा सचिव पुणे एटीएसच्या ताब्यात

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३ नोव्हेंबर -**

पुणे एटीएसने अटक केलेल्या जुबेर हंगरगेकरच्या प्रकरणात वळसंग येथील एका शाळेत व्यक्तीमत्व विकास शिबीर आयोजित करणाऱ्या त्या संघटनेच्या सचिवास चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे.

पुणे एटीएसने गेल्या काही दिवसापूर्वी अल कायदा या दहशतवादी संघटनेशी संबंधित असलेल्या मुळच्या सोलापूरच्या असलेल्या पुण्यातील कोंढवा परिसरात स्थायिक असलेल्या जुबेर हंगरगेकर या संगणक अभियंत्यास अटक केली आहे. याप्रकरणाच्या तपासामध्ये जुबेर हा १७ ते १९ ऑक्टोबर या कालावधीत सोलापूर जिल्ह्यातील वळसंग येथील एका इंग्रजी माध्यमाच्या शाळेत एका संघटनेने आयोजित केलेल्या व्यक्तीमत्व विकास शिबीरासाठी आला असल्याचे निष्पन्न झाले होते. या शिबीरात १६ ते २० वर्षे वयोगटातील सुमारे ७० मुलांचा सहभाग असल्याचे पोलिस तपासात निष्पन्न झाल्याने पोलिस व एटीएसकडून या शिबीरात सहभागी असलेल्यांची यादी मिळवून त्यांच्याकडै चौकशी करण्यात येत आहे.

दरम्यान, जेलरोड पोलिसांकडून वळसंग येथील त्या इंग्रजी माध्यमाच्या शाळेमध्ये व्यक्तीमत्व विकास प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करणाऱ्या त्या संघटनेच्या सचिवास चौकशीसाठी बोलावून चौकशी केली असून मात्र पोलिसांच्या हाती काहीच लागले नसल्याचे समजते. जेलरोड पोलिसांनी चौकशीसाठी बोलावलेल्या त्या संघटनेच्या सचिवास पुणे एटीएसनेदीखल नोटीस पाठवून चौकशीसाठी बोलावले असून त्यास ताब्यात घेतल्याचे समजते.

पुणे एटीएसने आतापर्यंत शहरातील चौघांची कसून तपासणी केली आहे. मात्र प्रत्येकांना चौकशी करून सोडून दिले आहे. शहर पोलिसांकडूनही प्रशिक्षणात सहभागी झालेल्यांची एकत्रित फाईल तयार करण्यात येत आहे.

## कार्तिकी एकादशीवेळी रेल्वे विभागाने केली भाविकांची सेवा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ नोव्हेंबर -**

कार्तिकी एकादशीच्या मुहूर्तावर पंढरपूरला येणाऱ्या लाखों भाविकांना सुरळीत, सुरक्षित आणि आरामदायी प्रवास अनुभव मिळावा यासाठी मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने व्यापक व्यवस्था, नियोजन आणि समर्पित प्रत्यक्ष अंमलबजावणी प्रवाशांना कार्यक्षमतेने, करुणेने आणि काळजीने सेवा देण्याच्या रेल्वेच्या वचनबद्धतेचे प्रतिबिंबित करते.



उत्तम रेल्वे सेवा आणि प्रवाशांची माहिती, प्रवाशांना आराम आणि संरक्षण, प्रवासी सहाय्य आणि तिकीट सुविधा, कर्मचारी तैनात आणि समन्वय, आरोग्य आणि वैद्यकीय सुविधा, सुरक्षा आणि गर्दी व्यवस्थापन, स्वच्छता, उपयुक्तता आणि स्वच्छता, सुरक्षा आणि पायाभूत सुविधांची तयारी आदी सोयी सुविधा रेल्वे प्रशासनाच्यावतीने उपलब्ध करून देण्यात आल्या. संपूर्ण व्यवस्थेचा वैयक्तिक आढावा विभागीय रेल्वे व्यवस्थापक डॉ. सुजीत मिश्रा यांनी घेतला, ज्यांनी पंढरपूर स्थानकाला भेट देऊन जमिनीवरील तयारीचे मूल्यांकन केले. त्यांनी अधिकारी, कर्मचारी आणि प्रवाशांशी संवाद साधला आणि सुरळीत कामकाज आणि प्रवाशांचे समाधान सुनिश्चित करण्यासाठी पथकांना मार्गदर्शन केले. गर्दी व्यवस्थापनाचे प्रयत्न वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक योगेश पाटील आणि विभागीय संरक्षा आयुक्त आदित्य यांच्यासह सोलापूर विभागातील पथकांनी केले. त्यांच्या प्रत्यक्ष देखरेखी आणि सक्रिय समन्वयाने भाविकांना त्रासमुक्त तीर्थयात्रा अनुभवता आली.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# दुबार मुस्लिम मतदारांकडे दुर्लक्ष म्हणजे व्होट जिहाद

## आशिष शेलार यांनी केला मविआच्या असत्यकथनाचा भंडाफोड

◆ **मुंबई, ३ नोव्हेंबर**

राज ठाकरे यांना दुबार मतदार असलेले हिंदू आणि मराठी माणसे दिसतात. मात्र, अनेक मतदारसंघातील दुबार नावे असलेले मुस्लिम दिसत नाहीत. राज ठाकरे यांनाही व्होट जिहादचे दुखणे जडले आहे, असा घणाघात सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी सोमवारी केला.



प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. भाजपा कधीच मतदारांमध्ये भेद करत नाही मात्र मविआ आणि आता नवा भिडू राज ठाकरे हे जाती, धर्म, समाजांमध्ये भेदभाव करत असून, त्यांना आम्ही उघडे पाडणार, असा इशाराही ॲड. शेलार यांनी यावेळी दिला. यावेळी ॲड. शेलार यांनी ८ वर्गीकरणातील याद्यांमधील मतदारांची नावे सादर करीत मविआ आणि राज ठाकरे यांच्या असत्यकथनाचा पर्दाफाश केला. अनेक आमदारांच्या मतदारसंघांतील मुस्लीम दुबार मतदारांची संख्या आणि मविआ आमदारांचे मताधिक्य याची तुलना करीत अनेक मविआ आमदारांचा विजय या मुस्लिम दुबार मतदारांमुळेच झाला असे म्हणायचे का? असे म्हणत त्यांनी राज ठाकरे, मविआला लक्ष्य केले. जे कोणी दुबार मतदार दिसतील त्यांना फोडून टाकण्याची भाषा करताना पुन्हा मराठी माणसालाच बडवणार का? असा सवालही त्यांनी केला.

ॲड. शेलार यांनी सांगितले की, महाविकास आघाडीच्या सत्याच्या मोर्चामध्ये निव्वळ असत्यकथन करून सर्वसामान्य जनतेची दिशाभूल करण्यात आली. त्याचाच पुढचा अंक आता आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या तोंडावर विरोधक खोट्या माहितीच्या आधारे रंगवण्याचा प्रयत्न करत आहेत.

**मतदारसंघ आणि दुबार मुस्लिम मतदारांचा आकडा**


| | |
|---|---|
| कर्जत जामखेड(रोहित पवार) | - ५५३२ |
| साकोली (नाना पटोले) | - ४७७ |
| वांद्रे पूर्व (वरुण सरदेसाई) | -१३,३१३ |
| बीडः (संदीप क्षीरसागर) | - १४,९४४ |
| मुंब्राः( जितेंद्र आव्हाड) | - ३०,६०१ |
| माळशिरस( उत्तम जानकर) | - ४३९९ |
| घनसावंगी( राजेश टोपे) | - १,१७५ |
| लातूर शहर( अमित देशमुख) | - २०,६१३ |
| धारावी( ज्योती गायकवाड) | - १०,६८९ |
| मुंबादेवी (अमीन पटेल) | - ११,१२६ |
| मालाड पश्चिम(अस्लम शेख) | - १७,००७ |
| परभणी(राहुल पाटील) | - १३,३१३ |
| विक्रोळी(सुनील राऊत) | - ३४५० |
| जोगेश्वरी पूर्व(अनंत नर) | - ६४४१ |
| कलिना(संजय पोतनिस) | - ६९७३ |
| बाळापूर(नितीन देशमुख) | - ५२५१ दुबार मुस्लिम मते |
| दिंडोशी(सुनील प्रभू)- | ५३४७ दुबार मुस्लिम मते |
| धाराशीव( कैलास पाटील) | - ११,२४२ दुबार मुस्लिम मते |

राज ठाकरेंनी केवळ तीन नावं वाचून दाखविली. मात्र, ॲड. शेलारांनी तर, कच्चाचिठ्ठाच सादर केला. त्यांनी ३१ विधानसभा मतदारसंघाच्या विश्लेषणानंतर २ लाख २५ हजार ७९१ मुस्लिम आणि ख्रिश्चन दुबार मतदारांची संख्या समोर आली असून सर्व २८८ मदारसंघातील हाच आकडा १६ लाख ८४ हजार २५६ वर जाऊ शकतो, असे त्यांनी सांगितले. ◄(तभा वृत्तसेवा)

---

## महत्त्वाचे

### चिनी कंपन्यांकडून रशियन तेलाच्या खरेदीत कपात




**बीजिंग :** अमेरिका आणि त्याच्या मित्र राष्ट्रांनी प्रमुख रशियन तेल कंपन्या आणि त्यांच्या काही ग्राहकांवर निर्बंध लादले आहेत, त्यानंतर आता चिनी तेल कंपन्या रशियन तेल खरेदी करण्यापासून माघार घेत आहेत. गेल्या महिन्यात रशियाच्या दोन सर्वात मोठ्या तेल कंपन्यांवर, रोझनेफ्ट आणि लुकोइलवर अमेरिकेने लादलेल्या निर्बंधांनंतर, सिनोपेक आणि पेट्रोचायना सारख्या चिनी सरकारी मालकीच्या कंपन्यांनी अलीकडेच रशियाकडून अनेक तेल निर्यात रद्द केली आहेत. चीनच्या काही खाजगी छोट्या रिफायनरीज, ज्यांना टीपॉट्स म्हणून ओळखले जाते, ते देखील रशियन तेल खरेदी करण्यास कचरत आहेत, कारण त्यांना भीती आहे की जर त्यांनी रशियाशी व्यवहार केला तर त्यांना ब्रिटन आणि युरोपियन युनियनने अलिकडेच शेडोंग युलोंग पेट्रोकेमिकल कंपनीवर लादलेल्या दंडांसारखेच दंड भोगावे लागू शकतात.

### कोईम्बतूरमध्ये विद्यार्थिनीवर बलात्कार

**कोईम्बतूर :** तामिळनाडूतील कोइम्बतूर येथे विमानतळाच्या मागे तीन जणांनी एका महाविद्यालयीन विद्यार्थिनीवर सामूहिक बलात्कार केला. पीडिता तिच्या मित्रासोबत कारमध्ये बसली होती तेव्हा तिघे आरोपी आले. त्यांनी तिच्या मित्रावर हल्ला केला, विद्यार्थिनीला जबरदस्तीने कारमधून बाहेर काढले, तिचे अपहरण केले आणि तिला एका निर्जन भागात नेले. क्रूरता केल्यानंतर, आरोपी तिला सोडून पळून गेले. जखमी झालेल्या व्यक्तीने पोलिसांना माहिती दिली. रात्रभर शोध घेतल्यानंतर, पोलिसांना पहाटे ४ वाजता विमानतळापासून एक किलोमीटर अंतरावर असलेल्या एका खाजगी महाविद्यालयाजवळ ती विद्यार्थिनी बेशुद्ध अवस्थेत आढळली.

### शेअर बाजार

| | |
|---|---|
| सेन्सेक्स | ८३,९७८.४९ (+३९.७८) |
| निफ्टी | २५,७६३.३५ (+४१.२५) |



### सराफा

| | |
|---|---|
| सोने (स्टॅण्डर्ड/१० ग्रॅम) | रु. १,२१,३०० |
| चांदी (प्रतिकिलो) | रु. १,५१,२०० |

### तापमान

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| सोलापूर | ३३.२ | २३.0 |
| अमरावती | ३४.२ | २०.८ |
| भंडारा | ३२.० | २२.० |
| बुलडाणा | २८.७ | २२.२ |
| चंद्रपूर | ३४.० | २२.२ |
| गडचिरोली | ३३.२ | २३.२ |
| गोंदिया | ३१.९ | २१.८ |
| नागपूर | ३२.६ | २२.० |
| वर्धा | ३४.० | २३.४ |
| वाशीम | ३१.६ | २१.२ |
| यवतमाळ | ३३.४ | २१.६ |

---




कामाच्या ठिकाणी महिलांना त्रास आणि विविध पातळीवरील हिंसाचाराचा सामना करावा लागतो. महिलांवरील अत्याचाराच्या घटना जगभरात घडत असतात. या घटनांचा निषेध करण्यासाठी सोमवारी कोलकाता येथे विविध रुग्णालयांमधील परिचारिकांनी मोर्चा काढला

# गरीब वीजग्राहकांना २५ वर्षे मोफत वीज

## राज्य शासनाच्या स्मार्ट योजनेसाठी महावितरणचा पुढाकार

◆ **नागपूर, ३ नोव्हेंबर**

दारिद्र्य रेषेखालील आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या घरांवर एक किलोवॅट क्षमतेचा सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प बसवून त्यांना २५ वर्षे मोफत विजेची सुविधा उपलब्ध करण्यासाठीच्या स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रूफ टॉप (स्मार्ट) योजनेच्या अंमलबजावणीसाठी महावितरणने पुढाकार घेतला आहे. केंद्र सरकार व राज्य सरकारच्या अनुदानामुळे या योजनेतील लाभार्थी ग्राहकांना खूप कमी हिस्सा भरावा लागणार आहे, असे महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक मा. लोकेश चंद्र यांनी सांगितले.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात राज्य सरकारने स्मार्ट योजना सुरू केली आहे. दारिद्र्य रेषेखालील १.५४ लाख तर आर्थिकदृष्ट्या दुर्बल ३.४५ लाख अशा महिना १०० युनिटपेक्षा कमी वीज वापणाऱ्या पाच लाख घरगुती वीज ग्राहकांना मोफत वीज मिळावी आणि अतिरिक्त वीज विकून उत्पन्नही मिळावे यासाठी ६५५ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. ही योजना प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य तत्वावर राबविण्यात येणार आहे. महावितरणच्या नुकत्याच झालेल्या संचालक व मुख्य अभियंत्याच्या राज्यस्तरीय बैठकीत या योजनेच्या अंमलबजावणीबाबत सूचना देण्यात आल्या.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात केंद्र सरकारने प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना सुरू केली आहे. त्यामध्ये ग्राहकांना एक किलोवॅटचा छतावरील सौर ऊर्जा प्रकल्प बसविण्यासाठी ३० हजार रुपये अनुदान केंद्र सरकारकडून मिळते. स्मार्ट योजनेत या अनुदानाखेरीज राज्य सरकारकडूनही अनुदान मिळणार असल्याने वीज ग्राहकांना खूप कमी हिस्सा भरून प्रकल्प बसविता येईल.

स्मार्ट योजनेनुसार दारिद्र्यरेषेखालील ग्राहकांना एक किलोवॅटचा सौर ऊर्जानिर्मिती प्रकल्प बसविण्यासाठी केंद्र सरकारकडून ३० हजार रुपये तर राज्य सरकारकडून १७,५०० रुपये अनुदान मिळेल. सौर ऊर्जा प्रकल्पाची उर्वरित रक्कम भरून ग्राहक २५ वर्षे मोफत विजेचा लाभ घेऊ शकतो. एक किलोवॅटच्या सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पातून दरमहा सुमारे १२० युनिट वीजनिर्मिती होते. त्यामुळे शंभर युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्या ग्राहकांना स्वतःची गरज भागवून अतिरिक्त वीज महावितरणला विकता येते. या प्रकल्पातून २५ वर्षे वीजनिर्मिती होत असल्याने तेवढा काळ लाभ होतो ◄(तभा वृत्तसेवा)

### ३० हजार रुपये अनुदानाखेरीज मिळणार मदत

शंभर युनिटपेक्षा कमी वीज वापर असणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल ग्राहकांनाही केंद्र सरकारच्या ३० हजार रुपये अनुदानाखेरीज राज्य सरकारकडून अनुदान मिळणार आहे. या गटातील सर्वसाधारण ग्राहकांना दहा हजार रुपये राज्य सरकारकडून मिळतील. अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या ग्राहकांना राज्य सरकार १५ हजार रुपये अनुदान देणार आहे.

---

# चांदूर रेल्वेचे आठ पोलिस कर्मचारी निलंबित

### चांदूर रेल्वे येथील खुनाचे प्रकरण ● कारवाईसाठी अहवाल सादर




◆ **चांदूर रेल्वे, ३ नोव्हेंबर**

चांदूर रेल्वे येथील खुनाच्या प्रकरणात गुन्हा दाखल झाल्याप्रकरणी अमरावती ग्रामीणच्या चांदूर रेल्वे पोलिस ठाण्यातील आठ पोलिस कर्मचारी सोमवारी निलंबित करण्यात आले आहे. या कारवाईने चांगलीच खळबळ उडाली आहे. पोलिस अधीक्षकांनी ही कारवाई केली.

पकड वॉरंटमधील अटक आरोपीच्या मृत्यूप्रकरणी न्यायालयीन चौकशी अहवालानंतर चांदूर रेल्वे पोलिस स्टेशनमधील आठ पोलिस कर्मचाऱ्यांविरुद्ध २ नोव्हेंबर रोजी ३०२ व ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलिस अधीक्षक यांच्या आदेशावरून सर्व ८ पोलिस अंमलदार यांना आज निलंबित केले आहे. निलंबित करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांमध्ये चांदूर रेल्वे पोलिस स्टेशन येथील राजकुमार मुलामचंद जैन, विशाल मुकुंदराव रंगारी, अश्विनी शामराव आखरे, सरिता वैद्य, प्रवीण रामदास मेश्राम, अलीम हकीम गवळी, अमोल अमृतराव घोडे, प्रशांत ढोके यांचा समावेश आहे.

न्यायालयीन चौकशी अहवालात आरोपीच्या मृत्यूसाठी गार्ड इंचार्ज व गार्ड ड्युटीवर असलेले पोलिस अंमलदार यांना जबाबदार धरण्यात आले असून नमूद पोलिस अंमलदार यांच्याच कृत्यामुळे पोलिस दलाची जनमानसात बदनामी झाली असून, कर्मचाऱ्यांनी अत्यंत बेशिस्त, बेजबाबदार व निष्काळजीपणा दाखवला असल्याचा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे. निलंबन कालावधीत या सर्व कर्मचाऱ्यांचे मुख्यालय पोलिस मुख्यालय, अमरावती ग्रामीण हे राहील. त्याचप्रमाणे न्यायालयीन चौकशीत दोषी आढळलेले पोलिस निरीक्षक अजय अहिरकर तत्कालीन ठाणेदार पोलिस स्टेशन चांदूर रेल्वे यांचे विरुद्ध कारवाई करिता वरिठांना अहवाल सादर करण्यात आलेला आहे. ◄(तभा वृत्तसेवा)

# ॲड. असीम सरोदे यांची सनद तीन महिन्यांसाठी निलंबित

### बार कौन्सिलचा निर्णय

◆ **मुंबई, ३ नोव्हेंबर**

पुण्यातील सुप्रसिद्ध विधिज्ञ असीम सरोदे यांची वकिलीची सनद तीन महिन्यांसाठी निलंबित करण्याचा निर्णय महाराष्ट्र आणि गोवा बार कौन्सिलने सोमवारी घेतला. ॲड. विवेकानंद घाटगे यांच्या अध्यक्षतेखालील समितीने हा निर्देश दिला आहे.



असीम सरोदे यांनी उबाठा गटाच्या एका सार्वजनिक कार्यक्रमात न्यायव्यवस्था, राज्यपाल आणि विधानसभा अध्यक्षांच्या विरुद्ध आक्षेपार्ह वक्तव्य केले होते. त्यामुळे त्यांच्यावर ही कारवाई करण्यात आली. असीम सरोदे हे सर्वोच्च न्यायालयात शिवसेना पक्ष आणि चिन्हाबाबत सुरू असलेल्या सुनावणीतील सहभागी वकिलांपैकी एक आहेत. मात्र, आता त्यांची सनद निलंबित झाल्याने त्यांना तीन महिने न्यायालयात युक्तिवाद करता येणार नाही. याबाबत असीम सरोदे यांनी अद्याप कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही. असीम सरोदेंनी एका सार्वजनिक कार्यक्रमात न्यायव्यवस्था, राज्यपाल आणि विधानसभा अध्यक्षांच्या विरोधात काही वादग्रस्त वक्तव्ये केली होती. ◄(वृत्तसंस्था)

---

# ...आणि नितीशकुमार यांनी जदयुवर पूर्ण वर्चस्व मिळवले

**श्यामकांत जहागीरदार**

◆ **नवी दिल्ली, ३ नोव्हेंबर**

बिहार विधानसभा निवडणुकीत मुख्यमंत्री नितीशकुमार यांचा जनता दल संयुक्त हा सर्वात महत्वाचा पक्ष म्हणावा लागेल. नितीशकुमार यांच्या नेतृत्वात राज्यात गेल्या २० वर्षापासून हा पक्ष सत्तेवर आहे.

१९९९ च्या लोकसभा निवडणुकीच्या आधी कर्नाटकचे मुख्यमंत्री एच. एम. पटेल यांनी राष्ट्रीय लोकशाही आघाडीला पाठिंबा दिला, या मुद्यावरुन जनता दलात फूट पडली. माजी पंतप्रधान एच. डी. देवेगौडा यांनी जनता दलातून बाहेर पडत जनता दल धर्मनिरपेक्षची (सेक्युलर) स्थापना केली. भाजपा आणि काँग्रेस या दोन्ही पक्षांपासून सारख्या अंतरावर राहण्याची देवेगौडा यांच्या पक्षाची भूमिका होती. जनता दलातील शरद यादव यांच्या नेतृत्वातील गट जनता दल संयुक्त म्हणून ओळखला जाऊ लागला.




१९९७ मध्ये जनता दलातून निष्कासित करण्यात आल्यानंतर कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री राहिलेल्या रामकृष्ण हेगडे यांनी लोकशक्ती पक्षाची स्थापना केली होती. ३० ऑक्टोबर २००३ ला जॉर्ज फर्नांडिस आणि नितीशकुमार यांचा समता पक्ष तसेच रामकृष्ण हेगडे यांचा लोकशक्ती पक्ष जनता दल संयुक्तमध्ये विलिन करण्यात आले, आणि हा ब्रहत पक्ष जनता दल संयुक्त म्हणून नव्याने ओळखला जाऊ लागला.

जनता दल संयुक्त हा सुरुवातीपासूनच रालोआसोबत राहिला. जॉर्ज फर्नांडिस, शरद यादव जनता दल संयुक्तचे राष्ट्रीय स्तरावरील नेते होते, पण नंतर नितीशकुमार यांनी या पक्षावर आपले पूर्ण वर्चस्व प्रस्थापित केले. बिहारच नाही तर देशातही जदयु हा नितीशकुमार यांचा पक्ष म्हणूनच ओळखला जाऊ लागला.

२००४ ची लोकसभा निवडणूक जदयुने भाजपासोबत लढवली. या आघाडीने ३२ जागा जिंकल्या. यात जदयुच्या २० तर भाजपाच्या १२ जागांचा समावेश होता. २००५ च्या विधानसभा निवडणुकीत जदयु भाजपा आघाडीने राजदचा पराभव केला. २००५ ची विधानसभा निवडणूक जदयु आणि भाजपाने राज्यात आघाडी करुन लढवली. यात जदयुने ८८ तर भाजपाने ५५ जागा जिंकल्या. जदयुचे नितीशकुमार यांचा मुख्यमंत्री म्हणून शपथविधी झाला. भाजपाचे सुशीलकुमार मोदी यांनी या सरकारमध्ये उपमुख्यमंत्री झाले.

### २०१० मध्ये रालोआची कामगिरी सर्वोच्च

२०१० च्या विधानसभा निवडणुकीत जदयु आणि भाजपाने आपली सर्वोत्तम कामगिरी बजावत २४३ सदस्यांच्या विधानसभेत २०६ जागा जिंकल्या. यात जदयुच्या ११५ तर भाजपाच्या ९१ जागांचा समावेश होता. अशी कामगिरी नंतर राज्यात या दोन पक्षांना कधीच करता आली नाही. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपाने प्रचार समितीचे संयोजक म्हणून गुजरातचे मुख्यमंत्री असलेल्या नरेंद्र मोदी यांची निवड केल्यामुळे नाराज झालेल्या नितीशकुमार यांनी मुख्यमंत्रिपदावर कायम राहात भाजपासोबतची आघाडी तोडण्याची घोषणा केली. शरद यादव यांनीही रालोआच्या संयोजकपदाचा राजीनामा दिला.

---

# नाथाजोगींच्या वस्तीत श्रीकृष्ण झाले चतुर्भुज

## गोरज मुहूर्तावर आनंदाचा विलक्षण सोहळा ● 'तरुण भारत'च्या उपक्रमाला भटक्यांची साद

◆ **भंडारा, ३ नोव्हेंबर**

धुळ उडवीत गायी घराकडे परतत होत्या, म्हणजे मुहूर्त गोरज होता! बिऱ्हाडासमोर पहिल्यांदाच तुळस डोलत होती. सजावट झाली. पणत्या उजळल्या गेल्या. वऱ्हाडी तयार झाले. वाजंत्र्यांनी गलबला केला, अन नाथाजोगींच्या त्या वस्तीत श्रीकृष्ण चतुर्भुज झाले! इतिहासात पहिल्यांदाच भटक्यांच्या त्या वस्तीत ३० तुळशीचे लग्न झाले आणि एक अद्भुत, विलक्षण आनंद देणारा सोहळा वस्तीने अनुभवला. वरात निघाली, सुलग्न लागले एवढेच काय तर पंगतीही उठल्या बरं! निमित्त होते तरुण भारताच्या शताब्दी महोत्सवानिमित्त आयोजित सामूहिक विवाह सोहळ्याचे!



वाद्यांच्या तालावर काढण्यात आलेली वरात व विवाहाला उपस्थित मंडळी

तुळस रोपण उपक्रमानंतर तुळशीचा सामूहिक विवाह करण्याचे आवाहन 'तरुण भारत'ने केले. या आवाहनाला लाखांदूर तालुक्यातील कोदामेडी येथील भटक्या बांधवांनीही प्रतिसाद दिला. पैशाने श्रीमंत नसले तरी मनाने विशाल असलेल्या या नाथजोगी बांधवांनी सामूहिक विवाह सोहळा अद्भुत करण्याचा मानस बोलून दाखविला. त्यांच्यासाठी झटणारे दिलीप चित्रीवेकर यांच्या मदतीने व्यवस्था उभारली गेली. वस्तीची स्वच्छता झाली. तुळस नसलेल्या प्रत्येक घरासमोर तुळस उभी राहिली.

**वरातीचा अलौकिक थाट**

वाजंत्रीचे पथक गावात पोहोचले आणि ग्रामस्थांचा आनंद द्विगुणीत झाला. श्रीकृष्णाची वरात निघाली. एखाद्या खऱ्याखुऱ्या लग्नालाही लाजवेल अशा या वरातीत सहभागी अख्खे गाव प्रचंड आनंदात असतानाच एकतेचा परिचयही देत होते. मारुतीरायाचे दर्शन झाले. राधाकृष्ण विवाहस्थळी समोरासमोर आले आणि शुभमंगल सावधान झाले. ◄(तभा वृत्तसेवा)



### आनंदले नाथजोगी

दोन ते तीन तास चाललेल्या या अद्भूत विवाह सोहळ्याने नाथजोगी बांधवांची वस्ती वेगळ्याच विश्वात रमली होती. त्यानंतर प्रत्येक बिऱ्हाडासमोर जाऊन तुळशीचे लग्न लावले गेले. यावेळी बिऱ्हाडातल्या प्रत्येक कुटुंबाच्या चेहऱ्यावर वेगळ काहीतरी केल्याचा आनंद झळकत होता. नाथाजोगी एवढ्यावरच थांबले नाही तर वऱ्हाड्यांसाठी पंगतीही तेथे उठल्या. आपुलकी आणि प्रेम ओतून केलेल्या भाजी-भाताने सगळ्यांना तृप्त केले.

या सोहळ्याला दत्तूजी धकाते, तालुका संघचालक प्रकाश येरणे, डॉ. कावळे दांपत्य, सेनानाथ वडस्कर, उकंडा वडस्कर, बाळू माळवे, दाकोबा चव्हाण, साईनाथ चव्हाण, कार्तिक वडस्कर यांनी उपस्थिती लावली होती. आज एक-एक रुपयांसाठी अंगावर जाण्याची मानसिकता वाढत असताना ७० ते ८० हजारात वादनासाठी जाणारे बॅंड पथक निःशुल्क देत श्री गुरुदेव बॅंड पथकाचे शामराव बावणे यांनी सेवा कार्याचा परिचय दिला.

# नैतिकतेच्या मुद्यावरून नितीशकुमार मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देतात तेव्हा...

◆ **नवी दिल्ली, ३ नोव्हेंबर**

रालोआतून बाहेर पडल्यामुळे २०१४ ची लोकसभा निवडणूक नितीशकुमार यांनी कम्युनिस्ट पक्षाशी आघाडी करुन लढवली. बिहारच्या ४० पैकी फक्त दोन जागा त्यांना जिंकता आल्या. दुसरीकडे भाजपा लोजपा आघाडीने ३१ जागा जिंकल्या.

लोकसभा निवडणुकीतील आपल्या पक्षाच्या म्हणजे जदयुच्या खराब कामगिरीची नैतिक जबाबदारी घेत नितीशकुमार यांनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला. आपल्या पक्षाचे नेते जितनराम मांझी यांना मुख्यमंत्री बनवले. पण नितीशकुमार यांच्याशी मांझी यांचे फार काळ पटले नाही. मांझी यांना हटवत पुन्हा मुख्यमंत्री होण्याची नितीशकुमार यांची इच्छा होती. मांझी यांनी राजीनामा देण्यास नकार दिल्यामुळे त्यांना जनता दलातून निष्कासित करण्यात आले. मांझी यांच्या हकालपट्टीनंतर नितीशकुमार पुन्हा मुख्यमंत्री झाले. त्यामुळे मांझी यांनी जदयुतील १७ असंतुष्ट आमदारांना घेत हिंदुस्थान अवाम मोर्चाची (हम) स्थापना केली.

२०१५ ची विधानसभा निवडणूक जदयुने राजद आणि काँग्रेससोबत लढवली. या निवडणुकीत राजदला ८० तर जदयुला ७१ जागा मिळाल्या. काँग्रेसने २७ जागा जिंकल्या, महाआघाडीचे संख्याबळ १७८ होते. त्यामुळे नितीशकुमार यांनी महाआघाडीचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. यावेळी भाजपाला ५३ जागा मिळाल्या होत्या. २० महिन्यानंतर नितीशकुमार यानी महाआघाडी सरकारच्या मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला. आणि दुसऱ्या दिवशी भाजपाच्या मदतीने पुन्हा सरकार स्थापन केले.




नितीशकुमार सरकारला बिहार विधानसभेत विश्वासदर्शक प्रस्तावावर १३१ मते पडली. १०८ आमदारांनी विरोधात मतदान केले. ४ आमदारांनी मतदानात भाग घेतला नाही.

२०२० ची विधानसभा निवडणूक नितीशकुमार यांच्या जदयुने भाजपासोबत लढवली. या निवडणुकीत भाजपाने ७४ तर जदयुने ४३ जागा जिंकल्या. या निवडणुकीत भाजपाच्या २१ जागा वाढल्या तर जदयुच्या २८ जागा कमी झाल्या. जदयुच्या जागा कमी असतांनाही भाजपाने नितीशकुमार यांना मुख्यमंत्री केले. पण नितीशकुमार यांनी ९ ऑगस्ट २०२२ ला पुन्हा एकदा मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला आणि राज्यात राजद आणि काँग्रेस या महाआघाडीसोबत दुसऱ्यांदा सरकार स्थापन केले. लोकसभा निवडणुकीच्या आधी नितीशकुमार यांनी पुन्हा एकदा महाआघाडी सरकारच्या मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला आणि भाजपासोबतचे सरकार स्थापन करत मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. नितीशकुमार यांचे राजकारण सोयीचे आणि त्यामुळेच अनाकलनीय आहे, ते कधी कोणती भूमिका घेतील, कोणासोबत जातील, हे ते स्वतःही सांगू शकत नाही. ◄(तभा वृत्तसेवा)

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# भारतीय महिला क्रिकेटचा दबदबा

पणतीपर्यंत दिवाळीचा सण आटोपला. आत्ता कुठे फटाक्यांची धडाडधूम बंद झाली होती. पण, अचानक रविवारी रात्री बारा वाजताच्या सुमारास भारतभरातील आकाशात आतषबाजी सुरू झाली आणि पुन्हा दिवाळीचा दिवस परतला की काय, असा माहौल तयार झाला. अर्थात, याचे कारणही दिवाळीच्या सणाइतकेच मोठे होते. ५२ वर्षांच्या दीर्घ काळानंतर भारताच्या महिला क्रिकेटपटूंनी दक्षिण आफ्रिकेसारख्या बलाढ्य संघाला नमवून आणि संपूर्ण जगाच्या नाकावर टिच्चून जगज्जेतेपद पटकावले. भारतातील लोकांसाठी क्रिकेट हा कायमच आवडीचा विषय राहिला आहे. त्यातच वर्ल्ड कप म्हटले की विचारूच नका! त्यावेळी भारतीयांचा उत्साह शिगेला पोहोचतो. यावेळी महिला क्रिकेटपटूंनी देदीप्यमान कामगिरी करत जगाच्या पाठीवर आपल्या कर्तृत्वाची आणि पर्यायाने तिरंग्याची मोहर उमटवली आहे. महिलांच्या सन्मानासाठी ओळखल्या जाणाऱ्या भारताला आता महिलांनी मोठा सन्मान मिळवून दिला हा आपल्या सर्वांसाठी अभिमानाचा विषय आहे.

हा चमत्कार काही एका रात्रीत घडलेला नाही. तब्बल दोन दशकांपासून भारतीय महिला क्रिकेटपटूंचा संघर्ष, जिद्द, चिकाटी, सातत्य आणि परिश्रम घेण्याच्या वृत्तीचे हे फलित आहे. १९७३ साली महिला विश्वचषक स्पर्धेला सुरुवात झाली. परंतु भारतीय महिला संघाला ५२ वर्षांत कधीही विश्वविजेतेपद जिंकता आलेले नव्हते. दोनदा भारताच्या हातातून विश्वचषक निसटला. २००५ आणि २०१७ मध्ये उपविजेतेपदावर त्यांना समाधान मानावे लागले. आता त्यांनी तिसऱ्यांदा २०२५ च्या एकदिवसीय विश्वचषकाच्या अंतिम फेरीत धडक मारली. यंदाच्या महिला एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेत भारताचा ऐतिहासिक विजय हा केवळ सध्याच्या संघाचा विजय नव्हे. तो भारतीय महिला क्रिकेटमधील काही दिग्गजांचे कित्येक दशकांचे समर्पण, चिकाटी आणि प्रगतीचा कळसाध्याय आहे. सुरुवातीच्या प्रणेत्यांपासून ते आधुनिक आयकॉनपर्यंत, आपल्या क्रिकेटपटूंनी जागतिक स्तरावर भारताच्या उदयाचा मार्ग मोकळा केला. आपण जग जिंकू शकतो, असा विश्वास त्यांनी आपल्या खेळाडूंना दिला. भारतीय महिला क्रिकेटमध्ये ५० वर्षांहून अधिक काळ खेळाडू आणि प्रशासक म्हणून काम करणाऱ्या डायना एडुलजी यांनीही खेळाडूंना सतत प्रोत्साहन दिले. खेळाडूंनीही जिद्द कायम ठेवली. भारतीय महिलांचा यंदाच्या विश्वचषकापर्यंत पोहोचण्याचा मार्ग तेवढा सोपा नव्हता. साखळी फेरीत इंग्लंड, दक्षिण आफ्रिका आणि ऑस्ट्रेलिया या तीन संघांकडून पराभूत झाल्यानंतरही मुलींनी जिद्द सोडली नाही. याच दरम्यान सलामी फलंदाज प्रतीका रावल हिच्या घोट्याला दुखापत झाली, त्यामुळे ती विश्वचषकाच्या बाहेर झाली. तिच्या जागी शेफाली वर्माला विश्वचषकाच्या संघात स्थान दिले गेले. आधी जाहीर झालेल्या संघात तिला स्थान नव्हते, परंतु प्रतीकाच्या जागी तिला प्रवेश देण्याबाबतची विनंती बीसीसीआयने आयसीसीकडे केली. ती मान्य झाल्यामुळे भारतीय संघाला बळ मिळाले. उपांत्य सामन्यात भारतीय महिलांसमोर गत-विश्वविजेत्या ऑस्ट्रेलियाचे आव्हान होते, परंतु हरमनप्रीत कौर आणि तिची चमू डगमगली नाही. कांगारूंनी ३३८ धावांचा डोंगर उभा करूनही भारतीय मुली वाघिणीसारख्या तुटून पडल्या आणि विश्वविक्रमी लक्ष्य गाठत दिमाखात अंतिम फेरीत प्रवेश केला.

नवी मुंबईच्या डी. वाय. पाटील स्टेडियमवर अर्थात आपल्या घरच्या मैदानावर ऑस्ट्रेलियाविरुद्ध जेमिमाह रॉड्रिग्जने कमालीची फलंदाजी केली आणि नाबाद १२७ धावांची शतकी खेळी करीत भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केला. ऑस्ट्रेलियन महिला क्रिकेटपटूंनीही भारतीय महिला संघाच्या जिद्द, चिकाटी आणि लढाऊवृत्तीचे कौतुक केले. विश्वविजेत्याला हरविल्यामुळे भारतीय महिला संघाचे मनोबल उंचावले. त्याचा फायदा त्यांना रविवारी दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या अंतिम सामन्यात झाला. डी. वाय. पाटील मैदान प्रेक्षकांनी खचाखच भरले होते. दक्षिण आफ्रिकेने नाणेफेक जिंकून भारताला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केले. भारताच्या स्मृती मंधाना, शेफाली वर्मा, जेमिमाह रॉड्रिग्ज, कर्णधार हरमनप्रीत कौर, दीप्ती शर्मा, अमनजोत कौर व ऋचा घोषने कमालीचा खेळ दाखविला. त्यातही शेफाली व दीप्तीचा अष्टपैलू खेळ डोळ्याचे पारणे फेडणारा आणि भारताच्या विश्वचषकाचे स्वप्न पूर्ण करणारा ठरला. फलंदाजी आणि गोलंदाजीमध्ये या दोघींनी कमालीची कामगिरी केली. त्याचे बक्षीसही त्यांना मिळाले. शेफाली सामनावीर ठरली, तर दीप्ती मालिकावीर पुरस्काराची मानकरी ठरली. धावांचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिकेची कर्णधार लॉरा वोल्व्हार्टने शतक झळकावले, तेव्हा एका क्षणी भारताच्या हातातून विश्वचषक निसटतो की काय, असे वाटत असताना दीप्ती शर्माने लॉरा वोल्व्हार्ट, ॲनेरिक डेर्केसेन, क्लो ट्रायॉन व नादिन डी क्लर्कला तंबूचा रस्ता दाखवून सामन्याला कलाटणी दिली. शेफालीनेही दोन बळी घेत भारताच्या विजयाचा मार्ग सुकर केला. आधी शेफालीने आपल्या बॅटची चमक दाखवीत ७८ चेंडूंत ८७ धावा, तर दीप्तीने ५८ चेंडूंत ५८ धावा केल्या. भारताने दक्षिण आफ्रिकेवर ५२ धावांनी विजय नोंदवीत ऐतिहासिक आयसीसी वन-डे विश्वचषकावर आपले नाव कोरले. तिसऱ्या प्रयत्नात वन-डे विश्वचषकाला गवसणी घालता आल्यामुळे भारतीय महिला क्रिकेटपटूंच्या आनंदाला तर पारावर उरला नव्हता. हरमनप्रीत, स्मृती, शेफाली, दीप्ती व शतकवीर लॉराचा महत्त्वपूर्ण झेल टिपणाऱ्या अमनजोतने वन-डे विश्वचषकच जिंकला नाही, तर भारतीय प्रेक्षकांची मने जिंकली.

भारताने ऐतिहासिक वन-डे विश्वचषक जिंकल्यामुळे आता महिला क्रिकेटचे अच्छे दिन आले आहेत, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. देशच नव्हे, तर जगभरातील क्रिकेट दिग्गजांनी भारतीय महिला संघाचे कौतुक व अभिनंदन केले. या विजयामुळे आता अधिकाधिक मुलींना क्रिकेट खेळण्यास प्रेरणा मिळेल तसेच महिला क्रिकेटमध्ये मोठी गुंतवणूक आणि संधी निर्माण होतील. डी. वाय. पाटील स्टेडियमवरील प्रेक्षकांची गर्दी लक्षात घेता पुढील महिला प्रीमियर लीग क्रिकेट बघण्यासाठी प्रेक्षकांची गर्दी निश्चित वाढेल. तसेही भारतीय क्रिकेट नियामक मंडळ महिला क्रिकेटच्या वाढीसाठी, प्रगतीसाठी सातत्याने प्रयत्नशील असतेच. पुरुष क्रिकेटपटूंप्रमाणे महिला क्रिकेटपटूंनाही सराव-प्रशिक्षणासाठी तसेच विदेश दौऱ्यासाठी मोठ्या प्रमाणात खर्च केला जातो. एवढेच नव्हे, तर आयसीसीने स्पर्धेत विजेत्या महिला संघालाही पुरुष संघाएवढाच रोख पुरस्कार देण्याचे धोरण अवलंबिले आहे. हा महिलांचा सन्मान आहे. विश्वविजेत्या भारतीय महिला संघाला ४० कोटी रुपयांचा, तर दक्षिण आफ्रिकेला २० कोटी रुपयांचा रोख पुरस्कार प्रदान करण्यात आला. याशिवाय बीसीसीआयने भारतीय महिला संघाला ५१ कोटी रुपयांचे रोख बक्षीस जाहीर केले आहे.

महिला क्रिकेटपटूंनी वन-डे व टी-२० क्रिकेट खेळण्यावरच नव्हे, तर कसोटी क्रिकेटवर सुद्धा आता भर देण्यात येत आहे. त्यानुसार द्विपक्षीय कसोटी मालिकांचे आयोजन करण्याचा बेत बीसीसीआयने आखला आहे. त्यामुळे आता भारतीय महिला क्रिकेटमध्ये अधिकाधिक महिलांना, विशेषतः प्रतिभावान खेळाडूंना संधी उपलब्ध होणार आहे. भविष्यात पुरुषांप्रमाणे महिला खेळाडूंचेही वन-डे, टी-२० आणि कसोटी असे वेगवेगळे संघ निर्माण होतील आणि त्यातून नवनवीन प्रतिभावान खेळाडूंना देशाचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळेल, तेव्हा या खेळाची आवड असलेल्या युवतींनी क्रिकेटकडे वळण्यास काही हरकत नाही. दृढनिश्चय करून केवळ मेहनत घेण्याची तयारी असावी. सातत्याने प्रयत्न केल्यास यश निश्चितच मिळेल. क्रिकेट कौशल्य आत्मसात करतानाच शारीरिक क्षमता वाढीसाठी सुद्धा प्रयत्न केले पाहिजेत. या ऐतिहासिक विजयामुळे यापुढे भारतीय महिला क्रिकेट संघ जगात भारीच असणार आहे, असा विश्वास निर्माण झाला आहे. जगातील बारा देशांत एकदिवसीय महिला क्रिकेट हा खेळ खेळला जातो. आता कोणताही देश भारतीय महिला क्रिकेट संघाला कमी लेखणार नाही. भारतीय महिला क्रिकेटची ताकद इतर देशांना रविवारी दिसलीच आहे. भारतीय महिला क्रिकेटचा दबदबा जगभरात असाच कायम राहो, हीच शुभेच्छा. ▮

## आंतरराष्ट्रीय

# चीनशी करारामुळे जीव भांड्यात!

प्रा. जयसिंग यादव

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग सहा वर्षांनी भेटले आणि दोन्ही महासत्तांमधील बैठक महत्त्वाची होती; संपूर्ण जगाने या बैठकीवर लक्ष ठेवले होते. हे नेते अलिकडेच दक्षिण कोरियातील बुसान विमानतळावर भेटले आणि त्यांची बैठक शंभर मिनिटे चालली. बैठकीपूर्वीच ट्रम्प यांना बैठक यशस्वी होईल, असा विश्वास होता. त्यामागे कारणही तसेच होते. अमेरिकेला चीनबरोबर वाटाघाटी करून 'रेअर अर्थ मॅग्नेट'च्या आयातीचा आणि सोयाबीनच्या निर्यातीचा प्रश्न सोडवणे जास्त महत्त्वाचे होते. अमेरिकेच्या शेतकऱ्यांचा तसेच तंत्र उद्योगाचा मोठा दबाव ट्रम्प यांच्यावर होता. दोन महासत्तांच्या प्रमुखांच्या भेटीनंतर अमेरिकेच्या अध्यक्षांनी मोठी घोषणा केली. त्यात म्हटले होते की, चीनमधून येणाऱ्या वस्तूंवरील एकूण सरासरी शुल्क ५७ टक्क्यांवरून ४७ टक्क्यांपर्यंत कमी करण्यात आले आहे. हे लक्षात घेण्यासारखे आहे की अमेरिकेने चीनवर अनेक वेळा शुल्क लादले आहे. रागाच्या भरात ट्रम्प यांनी हे शुल्क जाहीर केले. ट्रम्प यांच्या मागील कार्यकाळात स्टीलवर १९ टक्के, एप्रिल २०२५ मध्ये दहा टक्के बेसलाईन शुल्क, फेंटानिलवर २० टक्के शुल्क आणि इतर शुल्क समाविष्ट होते. अशा प्रकारे अमेरिकेने चीनवर सरासरी ५५ टक्के शुल्क लादले होते. ऑगस्ट २०२५ मध्ये वाढून ते ५७ टक्के झाले. तथापि, दोन्ही नेत्यांमधील बैठकीनंतर, चीन आता सरासरी ४७ टक्के शुल्काच्या अधीन असेल. जिनपिंग यांच्याशी बोलल्यानंतर, ट्रम्प यांनी घोषणा केली, की चीनवर लादलेले फेंटानिलशी संबंधित शुल्क वीस टक्क्यांवरून दहा टक्क्यांपर्यंत कमी केले जात आहे. परिणामी अमेरिकेचा जीव भांड्यात पडला असल्यास नवल नाही.

ट्रम्प यांच्या शुल्ककपातीच्या बदल्यात जिनपिंग आता अमेरिकेकडून मोठ्या प्रमाणात सोयाबीन खरेदी करण्यास सहमत झाले आहेत. चर्चेबाबतच्या इतर तपशिलामध्ये टिकटॉक कराराबाबत चर्चेचा कोणताही उल्लेख नव्हता. दोन्ही नेत्यांनी सांगितले की ते युद्ध संपवण्यासाठी एकत्र काम करतील. दोन्ही बाजूंनी व्यापार आणि सहकार्यावर महत्त्वाचे करार केले. शी जिनपिंग फेंटानिल दरवाढ थांबवण्यासाठी कठोर परिश्रम करतील आणि अत्यंत महत्त्वाच्या मुद्यांवर पुढील निष्कर्ष लवकरच घोषित केले जातील. 'रेअर अर्थ मॅग्नेट'वर दर वर्षी चर्चा केली जाईल. या करारानंतर इलेक्ट्रॉनिक्स, इलेक्ट्रिक वाहने आणि संरक्षण उत्पादनासाठी आवश्यक असलेल्या साहित्यांचा जागतिक प्रवेश स्थिर करण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल पुढे पडले आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांनी दुर्मिळ पृथ्वी खनिजांबाबत करार केला असल्याचे जगाला सांगत जणू सुटकेचा निःश्वास सोडला. ट्रम्प यांनी सांगितले, की चीनने पुढील वर्षासाठी अमेरिकेला 'रेअर अर्थ मॅग्नेट' पुरवण्यास सहमती दर्शवली आहे. ट्रम्प यांनी असेही जाहीर केले की फेंटानिल (एक




अंमली पदार्थ) साठी चीनवरील कर दहा टक्क्यांपर्यंत कमी करण्याचा निर्णय घेतला आहे. यासह, अमेरिकेचा चीनवरील एकूण करभार आता ५७ टक्क्यांवरून ४७ टक्क्यांपर्यंत कमी झाला आहे. 'जिनपिंग हे खूप कठोर वाटाघाटी करणारे आहेत, ही चांगली गोष्ट नाही,' असे ट्रम्प यांनी सांगितले. या भेटीच्या निमित्ताने अमेरिका आणि चीनमधील सर्व वाद मिटले, असे त्यांनी सांगितले.

याच सुमारास ट्रम्प आणि शी जिनपिंग यांनी रशिया-युक्रेन संघर्ष सोडवण्यासाठी सहकार्यावरही चर्चा केली. अमेरिकेच्या अध्यक्षांनी सांगितले की त्यांच्या संभाषणात तैवानचा मुद्दा आला नाही. हे लक्षात घेण्यासारखे आहे की चीनने नेहमीच तैवानवर दावा केला आहे. अमेरिकेने मुख्य भूमी चीनपासून दूर असलेल्या या बेटाच्या स्वायत्ततेला पाठिंबा दिला आहे. म्हणूनच, चीनचे जिनपिंग ट्रम्प यांच्यासमोर तैवानचा मुद्दा उपस्थित करतील, अशी अपेक्षा होती. ट्रम्प आणि जिनपिंग यांच्यात सहा वर्षांनंतर भेट झाली. त्यांच्यात झालेली चर्चा आणि बैठकीचे एकूण निष्कर्ष पाहता जिनपिंग यांनी अमेरिका तसेच ट्रम्प यांना दाती तृण धरून शरण यायला लावले, असा अर्थ होतो. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर तसेच भारतावर ट्रम्प वारंवार टीका करत असताना भारताने कठोर उत्तर दिले नाही; परंतु चीनने ट्रम्प यांना सातत्याने कठोर उत्तर देऊन आपल्या अटींवर अमेरिकेला शरण यायला भाग पाडले. गेल्या सहा महिन्यांमध्ये हे दुसऱ्यांदा घडले आहे. अमेरिकेच्या 'टॅरिफ वॉर'ला चीनने अमेरिकेचे नाक दाबून उत्तर दिले. 'रेअर अर्थ मॅग्नेट'च्या निर्यातीवर बंधने आणली. त्याचा परिणाम अमेरिकेवर झाला. 'रेअर अर्थ मॅग्नेट'बाबत जगात चीनची मक्तेदारी आहे. अन्य देश ही मक्तेदारी मोडीत काढण्याचा आता प्रयत्न करत असले, तरी ते एका दिवसात साध्य होणार नाही. ट्रम्प यांना त्याची जाणीव झाली असावी. चीन जगभरातील 'रेअर अर्थ मॅग्नेट'चे ७० टक्के उत्पादन नियंत्रित करते. चीनने त्याला जागतिक शक्ती संतुलनाचे शस्त्र बनवले आहे. यामुळेच ट्रम्प यांना तडजोड करण्यास भाग पडले.

अमेरिकेचे संरक्षण आणि ऊर्जा-केंद्रित तंत्रज्ञान उद्योग या खनिजांशिवाय काम करू शकत नाहीत. अमेरिकेच्या सुप्रसिद्ध एफ-३५ लढाऊ विमानात ४१८ किलो 'रेअर अर्थ मॅग्नेट' वापरले जाते. त्याचप्रमाणे, अमेरिकन नौदलाच्या आर्ले बर्क डीडीजी ५१ विनाशिकेत २,६०० किलो 'रेअर अर्थ मॅग्नेट' वापरले जाते. अमेरिकेच्या संरक्षणक्षेत्रातही हेच घडते. इतर उद्योगांनाही त्यांच्याशिवाय संघर्ष करावा लागतो. इलेक्ट्रिक वाहनांपासून स्मार्टफोनपर्यंत सर्व काही 'रेअर अर्थ मॅग्नेट'शिवाय अशक्य आहे. अमेरिकेची ही दुखरी नस चीनने दाबल्यामुळेच ट्रम्प चीनशी व्यापार करार करण्यासाठी पुढे आले. अमेरिकेच्या 'चिप युद्ध' आणि 'टॅरिफ वॉर'ला उत्तर म्हणून चीनने हे पाऊल उचलले. चीनने म्हटले होते, की त्यांच्या 'रेअर अर्थ मॅग्नेट' वापरणाऱ्या कोणत्याही कंपनी किंवा देशाला त्यांची परवानगी घ्यावी लागेल. या पृष्ठभूमीवर ट्रम्प आणि जिनपिंग यांच्यात सहा वर्षांनंतर बैठक झाली. दोन्ही देशांमधील व्यापार कराराच्या चौकटीअंतर्गत चीनने अमेरिकेला दुर्मिळ पृथ्वी खनिजांच्या निर्यातीवरची बंदी किमान एक वर्षासाठी पुढे ढकलण्याचे संकेत दिले आहेत. चिनी वस्तूंवर ट्रम्प यांनी लादलेले प्रस्तावित शंभर टक्के आयात शुल्क आता टळले आहे. ही घोषणा महत्त्वपूर्ण आहे. त्या बदल्यात चीन अमेरिकेकडून सोयाबीनची पुन्हा खरेदी सुरू करणार आहे आणि 'रेअर अर्थ मॅग्नेट'वरील निर्यात बंदी किमान एक वर्षासाठी पुढे ढकलण्यास तयार आहे. सरत्या काळामध्ये चीनने 'रेअर अर्थ मॅग्नेट'चे उत्पादन आणि शुद्धीकरण याबाबत जगभरात धाक निर्माण केला. उर्वरित जग अमेरिकेच्या 'टॅरिफ वॉर'पुढे झुकले; परंतु चीन अविचल राहिला. यामुळे काही 'रेअर अर्थ मॅग्नेट' आणि कायमस्वरूपी चुंबक श्रेणीतील उत्पादनावरील निर्यात नियंत्रणे वाढली. संरक्षण, इलेक्ट्रिक वाहने, स्वच्छ सौर ऊर्जा उत्पादने आणि उच्च-तंत्रज्ञान उद्योगांवर याचा लगेचच परिणाम झाला. अमेरिकेने चीनच्या वर्चस्वापासून मुक्त होण्याचा प्रयत्न केला नाही किंवा करत नाही, असे नाही. ट्रम्प यांनी युक्रेनशी केलेल्या करारात आपल्यासाठी 'रेअर अर्थ मॅग्नेट'ना सुरक्षित करण्याकडे लक्ष केंद्रित केले होते. ट्रम्प हे या खनिजांचा पुरवठा सुरक्षित करण्यासाठी आशिया दौरा करत आहेत. जपान, मलेशिया, व्हिएतनाम आणि कंबोडियासोबतचे त्यांचे करार या संदर्भातील महत्त्वपूर्ण उदाहरणे म्हणून पाहिले जाऊ शकतात. तथापि, या घटकांच्या अंमलबजावणीसाठी बराच वेळ आणि पैसा लागेल. ही परिस्थिती लक्षात घेऊन चीनने ट्रम्प यांना त्यांच्या व्यापार धोरणांबाबत माघार घेण्यास भाग पाडले. परिणामी, अमेरिकेकडे दुसरा पर्याय नाही, ती चीनला दुखावू शकत नाही हे नव्याने सिद्ध झाले. या घडामोडींमधून जागतिक व्यापार आणि राजकारण नवा धडा घेऊ शकणार आहे. ▮

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

नितीन शिरसाट

# परतीच्या पावसाने पिकांचे नुकसान

परतीच्या पावसामुळे महाराष्ट्रात विशेषतः मराठवाडा, विदर्भ आणि कोकण भागात पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. विदर्भातील अनेक ठिकाणी ढगफुटीसदृश पाऊस पडल्याने शेती पिकांचे नुकसान झाले आहे. परतीच्या पावसामुळे हातातोंडाशी आलेली खरीप पिके- जसे सोयाबीन, कापूस, मका आणि भाजीपाला पिकांचे मोठे नुकसान झाले. बुलढाणा, अकोला व वाशीम जिल्ह्यांत पावसाने अक्षरशः धुमाकूळ घातला. यादरम्यान यवतमाळ जिल्ह्यातील ११ महसूल मंडळांत अतिवृष्टी झाली. नागपूरसह चंद्रपूर, गोंदिया, भंडारा, गडचिरोली, वर्धा या पूर्व विदर्भातील जिल्ह्यातही परतीच्या पावसाने थैमान घातले. यात हजारो हेक्टरवरील पिकांचे अतोनात नुकसान झाले. खरीप हंगामात कर्जबाजारी होत शेतकऱ्यांनी नगदी पीक असलेल्या सोयाबीनची पेरणी केली. पावसाने साथ दिल्याने पीकही बहरले. शेंगा लागल्यानंतर अळींनी आक्रमण केले. यातून मार्ग काढत पीक वाचविले. सोंगणी सुरू केली. अनेक ठिकाणी पीक सोंगून ठेवण्यात आले. यापूर्वीच मुसळधार पावसाचा तडाखा बसला. शेतात पाणी साचल्याने रचून ठेवलेल्या सूड्या पाण्याखाली गेल्या. या पिकाला अंकुर फुटणे किंवा सडण्याचा धोका व्यक्त होत आहे. बुलढाणा, मोताळा तालुका आणि परिसरात काही भागांत झालेल्या ढगफुटीसदृश पावसामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले असून, पावसामुळे जनावरांचा चारा वाहून गेला, घरांमध्ये पाणी शिरले, रस्त्यांवर वाहतूक ठप्प झाली आणि गावोगाव वीजपुरवठा खंडित झाला.

कृषी विभागाच्या प्राथमिक अहवालानुसार काही भागांत जमिनीतील ओल वाढल्याने हरभऱ्याच्या पेरणीस पोषक स्थिती आहे. परंतु ज्या भागात ढगफुटीसदृश पाऊस झाला, तिथे पाणी साचल्यामुळे बियाणे कुजणे, जमिनीची धूप आणि पोत बिघडण्याची शक्यता वाढली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना पुन्हा एकदा बी-बियाणे व खतांवर खर्च करावा लागणार आहे. प्रशासनाकडून नुकसान पंचनाम्याची हालचाल तालुका कृषी अधिकारी यांनी नुकसानीचे प्राथमिक पंचनामे सुरू केल्याची माहिती आहे. शेतकऱ्यांनी शासनाकडे तातडीने नुकसानभरपाई, बियाणे अनुदान आणि व्याजमाफीची मागणी केली आहे. केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव तसेच महायुतीच्या लोकप्रतिनिधींनी नुकसानग्रस्त भागांत पाहणी केली असता अनेक ठिकाणी शेतकऱ्यांनी परतीचा पाऊस आमचं जगणंच पाण्यात घेऊन गेला अशी व्यथा व्यक्त केली आहे. शेतकऱ्यांचे आर्थिक संकट वाढले आहे. अनेक शेतकऱ्यांकडे मागील दोन-तीन हंगामांपासून कर्जाचा बोजा वाढला आहे. खरीप पिकांचे उत्पादन कमी आणि बाजारभावही अपुरा मिळाल्याने शेतकऱ्यांची आर्थिक गणितं कोलमडली आहेत. रबी हंगामात काही दिलासा मिळेल या आशेने शेतकऱ्यांनी बियाणे व खत खरेदीसाठी पुन्हा कर्ज घेतले. परंतु पाऊस झाल्याने आता ते बीज वाया गेल्याचे दिसत आहे. या परिस्थितीत शासनाने सरसकट कर्जमाफी द्यावी, अशी जोरदार मागणी होत आहे. सरसकट कर्जमाफी योग्य की अयोग्य तर कर्जमाफीचे समर्थन करणाऱ्यांचे मत शेतकरी संघटनांचे म्हणणे आहे की ज्या शेतकऱ्यांनी स्वतःच्या कष्टाने शेती टिकवली आहे, त्यांच्यावर नैसर्गिक आपत्ती, महागाई, उत्पादन घट आणि दरकपातीचे संकट एकत्र आले आहे. अशा वेळी शासनाने सरसकट कर्जमाफी जाहीर करून शेतकऱ्यांना जगण्यासाठीचा दिलासा द्यावा. कर्जमाफी ही नैसर्गिक आपत्तिग्रस्त शेतकऱ्यांसाठी अत्यावश्यक ठरू शकते पण ती लक्ष्यित आणि नियोजित असावी. ज्या भागांत शेतकऱ्यांचे प्रत्यक्ष नुकसान झाले आहे, त्यांच्यासाठी विशेष कर्जमाफी आणि व्याजमाफी योजना जाहीर करणे उचित ठरेल. त्याचबरोबर शेतकऱ्यांना नव्या हंगामासाठी शून्य टक्के व्याजदराने नवीन कर्ज उपलब्ध करून देणे, तसेच पीकविमा दाव्यांचा तत्काळ निपटारा करणे आवश्यक आहे. राज्यातील शेतकऱ्यांचा सात-बारा कोरा करावा या मागणीसाठी प्रहार संघटनेचे प्रमुख बच्चू कडू यांनी शेतकरी आंदोलन पुकारले आहे. या आंदोलनात शेतकरी नेते राजू शेट्टी, डॉ. अजित नवले, महादेव जानकर, वामन चटप, रविकांत तुपकर यांच्यासह अन्य नेते सहभागी झाले होते. शेतकरी संघटनेच्या नेत्यांशी कर्जमाफीबाबत शासनाची सकारात्मक चर्चा झाली. त्यामुळे सध्या पहिल्यांदा अतिवृष्टीच्या मदतीचे पैसे शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करणे आवश्यक आहे. ▮

९८८१७१७८२८

## इतस्ततः

# भारतीय शिवणाची जागतिक झेप!

दत्तात्रेय आंबुलकर

ग्राहकांना त्यांचे शरीर व व्यक्तिमत्त्व यानुरूप साजेसे कपडे शिवून देण्याच्या व्यावसायिक उद्दिष्टाने, टेलरस्मार्ट या शिलाई स्मार्टअपची स्थापना करण्यात झाली. गेल्या दशकभराच्या कालावधीत या नावीन्यपूर्ण स्मार्टअपने, चांगलेच नाव आणि यश कमावले आहे. टेलरस्मार्टची सुरुवात २०१४ मध्ये प्रवीण झाडे व जॉय डिसिल्वा या दोन उद्योजकांनी केली. अल्पावधीतच त्यांच्या व्यवसायातील नव्या प्रयोगाला अपेक्षित प्रतिसादही मिळू लागला. नंतर व्यक्तिगत कारणांमुळे, जॉय डिसिल्वा यांनी टेलरस्मार्ट सोडण्याचा निर्णय घेतला.

त्यामुळे या स्मार्टअपला, एका नव्या उद्योजक सहकार्याची गरज प्रकर्षाने भासू लागली. त्यावेळी टेलरस्मार्टला समर्थ साथ मिळाली ती प्रीतम ओन्स्कर या तेवढ्याच हौशी व उत्साही उद्योजक सहकार्याची. मुख्य म्हणजे, प्रीतम ओन्स्कर हे टेलरस्मार्टचे जुने ग्राहक! टेलरस्मार्टच्या दर्जेदार सेवा व शिवण वैशिष्ट्याची भुरळ पडलेल्या प्रीतम यांनी, टेलरस्मार्टमध्ये सहर्ष भागीदारी स्वीकारली. यानंतर टेलरस्मार्टचा अधिकच दमदार असा प्रवास सुरू झाला, हे विशेष.

एका नव्या व वैशिष्ट्यपूर्ण स्मार्टअपसाठी काम करणाऱ्या प्रीतम ओन्स्कर यांच्या मते, टेलरस्मार्टचे काम एका साध्या व महत्त्वाच्या व्यावसायिक तत्त्वावर चालते. हे मूलभूत व्यवसाय तत्त्व म्हणजे, प्रत्येक ग्राहकाला त्याच्या शरीरयष्टी व मापानुरूप कपडे शिवून देणे. मात्र, हे करतानाच त्या ग्राहकाच्या वैयक्तिक गरजा व प्रचलित प्रगत पद्धतींचा मेळ घालून, प्रत्येक ग्राहकासाठी विशेष स्वरूपाचे व नेमया प्रकारचे कपडे शिवणे याचा अंतर्भाव हे टेलरस्मार्टचे विशेष होत. ही छोटी व महत्त्वाची बाब आमच्या व्यवसायात मोठी परिणामकारक ठरल्याचा उल्लेख, प्रीतम ओन्स्कर आवर्जून करतात. टेलरस्मार्टचे संचालक प्रीतम ओन्स्कर यांच्या मते, मूलतः तयार शिवलेले म्हणजेच रेडिमेड कपडे खरेदी करून त्यांचा प्राधान्याने वापर करणे, ही बाब युरोपसह पाश्चात्त्य देशांमध्ये सर्वमान्य आहे. त्यांच्या मते, भारतामध्ये मात्र तयार कपड्यांच्या संदर्भातील वापर आणि आवड सर्वस्वी वेगळी आहे. यातूनच भारताला जागतिक स्तरावर कपडे शिवण्याच्या व्यवसायात, पुढाकार घेण्यासाठी नेहमीच मोठी संधी असेल, हे लक्षात ठेवायला हवे.



यासंदर्भातील उपलब्ध आकडेवारी व तपशिलानुसार, भारतात सध्या असंघटित व अनौपचारिक स्वरूपात काम करणाऱ्या व कौशल्यप्राप्त अशा शिलाई कामगिरांची संख्या सुमारे तीन कोटींवर आहे. सध्या देशांतर्गत कपड्यांची शिलाई व संबंधित शिवणकाम याद्वारे होणाऱ्या व्यवसायातून, दरवर्षी सुमारे २६ हजार कोटी रुपयांची उलाढाल होते. हा व्यवसाय वाढण्यासाठी मोठा वाव आहे, असे जाणकारांचे मत आहे. जागतिक स्तरावर कपडे शिलाई व्यवसायासंदर्भात आज, भारताला प्रथम पसंती दिली जाते. असे होण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे, आजही भारतात कपडे शिवण्यासाठी लागणारा खर्च जागतिक पातळीवरील खर्चापेक्षा न्यूनतम असतो. परंपरागत व पिढीजात कारागिरी व कौशल्यपूर्ण शिलाईकामामुळे, भारताने तयार कपडे उद्योगात आपले अग्रस्थान कायम राखले आहे. सरकारचे लघुउद्योगांसह अशाप्रकारच्या विविध उद्योगांना सहकार्य करण्याचे धोरणही या यशासाठी पूरक असेच ठरते. भारतात कपडे शिलाई उद्योगांसाठी लागणारे, आवश्यक असे तंत्रज्ञान सहज उपलब्ध आहे.

सध्याच्या सार्वत्रिक स्पर्धेच्या युगात टेलरस्मार्टचे प्रमुख वेगळेपण व वैशिष्ट्ये सांगताना संचालक प्रीतम ओन्स्कर नमूद करतात की, ग्राहकांचे कपडे नेमके व त्यांना हव्या त्या पद्धतीने शिवताना, आमच्या कारागिरांचा अनुभव व कौशल्यांसह शिवण्यासाठी आम्ही ग्राहकांच्या मापाबरोबरच, त्यांची आवड आणि अपेक्षाही लक्षात घेतो. याशिवाय ग्राहकांची आवड व बजेट यांची नेमकी सांगड घालून, त्यांच्या आवडीनुसारच कपड्यांची शिलाई करून देतो. यामुळे ग्राहकांच्या रंगसंगतीपासून सर्वार्थाने त्यांच्या पसंतीचे कपडे, तुलनेने मापक खर्चात त्यांना मिळू शकतात.

टेलरस्मार्टच्या व्यवसाय प्रक्रियेतील पुढचा व ग्राहकांना भावणारा टप्पा म्हणजे त्यांचे शिवून तयार झालेले कपडे, ठरल्या दिवशीच वेळेवर ग्राहकांच्या घरी आवर्जून पोहोचते केले जातात. यासाठी नेहमीच विशेष काळजी घेतली जाते. आज कपडे बाजारातील ब्रॅण्डेड तयार कपड्यांच्या किमतीच्या तुलनेत, आमच्याकडे शिवून दिले जाणारे कपडे किमतीच्या बाबतीत सुमारे ४० टक्के स्वस्त किमतीत उपलब्ध होतात, असा प्रीतम ओन्स्कर यांचा दावा आहे.

या वेगळ्या व्यवसायाची पूर्वपीठिका म्हणजे, पुण्यातील मगरपट्टा येथे २०१७ मध्ये वेगळी कल्पना व ग्राहकांना काहीतरी वेगळे व माफक खर्चात देण्याच्या उद्देशाने याची सुरू झाली. तेव्हा सुरू केलेल्या टेलरस्मार्टकडे केवळ २० टेलरिंग कारागीर जोडलेले होते. मात्र, संचालकांनी जिद्दीने उद्योज वाढवण्यासाठी घेतलेली मेहनत, पाठपुरावा व प्रोत्साहन या साऱ्यांच्या यशस्वी समन्वयामुळेच, सध्या टेलरस्मार्टशी सध्या ८०० टेलर्स जोडले गेले आहेत. सुरुवातीला केवळ पुरुष ग्राहकांच्या कपडे शिवण्यापासून सुरुवात झालेल्या या व्यवसायात, आता महिलांचेही कपडे शिवून मिळतात. यातूनही टेलरस्मार्टचा व्यवसाय वाढण्यास मोठीच मदत झाली आहे. यातूनच खास टेलरस्मार्टसाठी काम करणाऱ्या टेलर्सचे, त्यांच्या व्यवसाय कौशल्यानुरूप वर्गीकरणही करण्यात आले आहे. उदाहरणार्थ टेलरस्मार्टसाठी काम करणाऱ्या टेलर्सपैकी, सुमारे १०० जण केवळ पुरुषांचे कपडे शिवण्यामाधील विशेष तज्ज्ञ झाले आहेत. अशाच प्रकारे अन्य १०० जण महिलांच्या कपड्यांची शिलाई करतात. आपल्या व्यवसायाच्या यशाचे आणखी एक वैशिष्ट्य सांगताना प्रीतम ओन्स्कर आवार्जून नमूद करतात की, त्यांच्या व्यवसाय रचनेत नव्याने सामील होऊ इच्छिणाऱ्या टेलर्सची, कौशल्यविषयक विशेष चाचणीही प्रसंगी घेतली जाते. यासाठी परस्परपूरक वा प्रसंगी सामूहिक कौशल्यांची जोड दिली जाते. यामागे मुख्य उद्देश कुशल कारागिरांच्या कौशल्यातून, ग्राहकांचे संपूर्ण समाधान व त्याद्वारे व्यवसायवाढ साधणे हाच आहे. आता भविष्यात आणखी दर्जेदार कपड्यांचा पुरवठा ग्राहकांना आवडेल, परवडेल अशा स्वरूपात व वाढत्या प्रमाणात करण्याचा प्रीतम ओन्स्कर यांचा मानस आहे. ▮

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

## आजचे संघगीत-३२

मंगळवार, ४ नोव्हेंबर २०२५

### चालत येइल सहज उद्याचा काळ आपुल्या हाती

चालत येइल सहज उद्याचा काळ आपुल्या हाती ॥धृ.॥

हिंदुपणाची लाज जयांना ते भूमीला भार
हिंदुपणाची अभिमानी या देशाचे आधार
खूणगाठ ही हृदयी बांधुन, पाउल टाकू पुढती ॥१॥

नको कुणाची कृपा फुकाची सौख्य फुलाया येथे
सामर्थ्यावर निर्भर राहुनि ठरू जगाचे नेते
परिस्थितीची नका दाखवू आम्हा पोकळ भीती ॥२॥

माणुसकीचा दिसे फुलोरा वरवर शब्दांतून
अणुगोलाची दाहकता परि डोकवते आतून
आत एक बाहेर एक ही ओळखता जनरीती ॥३॥

देह जपावा हळुवारपणे जीवन कुरवाळावे
विषयामाजी मग्न होउनी समाजास विसरावे
ही तर पशुता सोडुनि घेऊ ऐक्याची अनुभूती ॥४॥

### शीख धर्माचे संस्थापक, पहिले गुरू गुरुनानक देवजी

आपल्या देशात अनेक थोर समाजसुधारक, साधू-संत, महापुरुष होऊन गेलेत. अनेक धर्मगुरूंनी वेळोवेळी देशातील जनतेला मार्गदर्शन केले व अध्यात्माचा मार्ग दाखविला. शीख धर्माचे संस्थापक गुरुनानक देवजी त्यापैकीच एक आहेत.

शीख धर्माचे संस्थापक, पहिले गुरू गुरुनानक देवजी यांची जयंती हा शीख समुदायाद्वारे साजरा केला जाणारा सर्वांत सन्मानित दिवस आहे. गुरुनानक यांची जयंती, गुरुनानक देवजी यांच्या जन्माचे स्मरण याला गुरुपूरब, गुरु पर्व असेही म्हणतात. गुरुनानकजी नैतिकता, कठीण परिश्रम आणि सत्यतेचा संदेश देतात. हा दिवस मोठ्या श्रद्धेने आणि सामूहिक भावनेने आणि प्रयत्नाने, जगभरात उत्साहाने साजरा केला जातो. गुरुनानक देवजी यांचे जीवन प्रेम आणि शौर्याने भरलेले होते. ते शीख धर्माचे संस्थापक गुरू आहेत. देशभर त्यांचा जन्म दिन प्रकाश दिन म्हणून कार्तिक पौर्णिमेच्या दिवशी साजरा केला जातो. गुरुनानकांनी जगाला बंधुभाव आणि प्रेमाचा संदेश दिला. जातिपातीवर त्यांचा विश्वास नव्हता. परिश्रम, निःस्वार्थ प्रेम आणि बंधुभावावर त्यांनी भर दिला. जेव्हा लोक सांसारिक व्यवहारात अडकतात तेव्हा गुरुनानक देवजींनी त्यांना अंतर्मुख होण्याची प्रेरणा दिली हा त्यांचा संदेश होता. ते म्हणाले, परमेश्वराच्या नावाचा विसर पडेल एवढ्या सांसारिक व्यवहारात मग्न होऊ नका. गुरुनानक देवजींनी आपल्या जीवनात विविध देशांचा प्रवास केला आणि त्यांनी अनेक धार्मिक आणि सामाजिक मुद्यांवर भाष्य केले. त्यांच्या शिकवणुकीत ईश्वराच्या एका अद्वितीय अस्तित्वावर विश्वास, जातिभेदाच्या विरोधात आवाज आणि सर्व मानवतेसाठी प्रेमाचा संदेश यांचा समावेश आहे. त्यांच्या शिकवणीचे सार एक ओंकार म्हणजेच ईश्वर एक आहे या तत्त्वात सामावलेले आहे.

शीख पंथाचे ते आद्य गुरू होत. गुरुग्रंथ साहेब या धर्मग्रंथात त्यांच्या रचना आहेत. गुरुनानक देवजींच्या जयंतीनिमित्त आपण स्वतःला आठवण करून दिली पाहिजे की आपण सुखी राहूया, इतरांना सुखी ठेवूया, धर्मरक्षणासाठी प्रार्थना, सेवा आणि कार्य करूया. एकता, श्रद्धा आणि प्रेमाचा संदेश देणारे शीख धर्माचे संस्थापक गुरुनानक देवजी यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन.

**श्रीकांत संभाजी मगर**/९६८९११७१६९

## वाचक पत्रे

### त्रिपुरी पौर्णिमा

कार्तिक पौर्णिमेला त्रिपुरारी पौर्णिमा किंवा त्रिपुरी पौर्णिमा म्हणतात. या वर्षी ५ नोव्हेंबरला त्रिपुरारी पौर्णिमा साजरी केली जाणार आहे. या दिवशी शिव मंदिरात त्रिपुर वात लावली जाते. एकादशीपासून सुरू झालेले तुळशी विवाह करण्याचा हा शेवटचा दिवस असतो. त्रिपुरासुर नावाच्या राक्षसाने खडतर तप करून ब्रह्मदेवाकडून शत्रूंपासून भय राहणार नाही असा वर मागून घेतला. या वरामुळे उन्मत्त होऊन तो सर्व लोकांना व देवांनासुद्धा खूप त्रास द्यायला लागला. देवांनाही त्याचा पराभव करता येईना. देवांनी भगवान शंकराची प्रार्थना केली. तेव्हा शंकरांनी त्याची तिन्ही नगरे जाळून त्याला ठार केले. कार्तिक पौर्णिमेच्या दिवशी ही घटना घडल्यामुळे तिला त्रिपुरारी पौर्णिमा असे म्हटले जाऊ लागले. या दिवशी घरात, घराबाहेर व देवळातही दिव्याची आरास करून पूजा केली जाते तसेच नदीत दीपदान करून लोक आनंदोत्सव साजरा करतात. त्रिपुरारी पौर्णिमेला मोठ्या उंच दगडी खांबाला सभोवती दिवे लावण्याची व्यवस्था करून तिथे दिवे लावले जातात. हा दिवस भगवान शंकरांनी जे सामर्थ्य दाखवून त्रिपुरासुराच्या त्रासातून देवांना आणि इतरांना मुक्त केले त्यामुळे हा दिवस दीपोत्सवाच्या रूपात साजरा केला जातो. ▮

**वर्षा आवदे**/नागपूर

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



# मुस्तीमध्ये मानसिक तणावातून तरूणाची गळफास घेऊन आत्महत्या

**सोलापूर, दि. ३ नोव्हेंबर -**

मुस्ती (ता. दक्षिण सोलापूर) येथे तरूणाने मानसिक तणावातून तरूणाने गळफास घेऊन आत्म हत्या केली.

ही घटना ३ नोव्हेंबर रोजी दुपारी उघडकीस आली. सुनिल जनार्दन बनसोडे (वय ३५, रा. मुस्ती, ता. दक्षिण सोलापूर) असे मयत तरूणाचे नाव आहे. ३ नोव्हेंबर रोजी सुनिल बनसोडे यांनी स्वतःच्या शेतातील लिंबाच्या झाडाच्या फांदीला मानसिक तणावातून नॉयलॉन दोरीच्या सहाय्याने गळफास घेतल्याचे दिसून आले. त्यावेळी पोलिस पाटील यांनी गावकऱ्यांच्या मदतीने बनसोडे यांस खाली उतरवून बेशुध्दावस्थेत उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्यावेळी डॉ. राजेंद्र सैनी यांनी बनसोडे यांस मृत घोषित केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.




## भीमप्रेमी प्रतिष्ठानतर्फे भगवान गौतम बुद्ध यांच्या मूर्तीचे वाटप

**सोलापूर, दि. ३ नोव्हेंबर-**

भिम प्रेमी प्रतिष्ठानच्या वतीने फडकुले सभागृहात धम्मचक्र प्रवर्तन दिनाचे औचित साधून विविध मंडळांना भिम प्रेमी प्रतिष्ठानच्या वतीने मोफत भगवान गौतम बुद्ध यांचे मूर्ती वापट करण्यात आले व आदर्श शिक्षण संस्थांना, विविध पत्रकार बांधवांना तसेच बचत गट महिलांना पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आले. हा कार्यक्रम सरकारी वकील ॲड. प्रदीप सिंह राजपूत, बसवेश्वर प्रतिष्ठानचे संस्थापक श्रीशैल हत्तुरे, पत्रकार कृती समितीचे अध्यक्ष आप्पासाहेब लंगोटे, युवा उद्योजक राजशेखर हवशेट्टी, श्रीनिवास बनसोडे, बसवराज पनशेट्टी, अहमद शेख, विजू नागमाडे या मान्यवरांच्या हस्ते विविध मंडळांना भगवान गौतम बुद्ध यांचे मूर्ती वाटप करण्यात आले. त्यातच विविध शिक्षण संस्थांना, पत्रकार बांधवांना व विविध बचत गटाचे प्रमुख महिलांना आदर्श पुरस्कार देऊन कार्यक्रम पार पाडण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भिम प्रेमी प्रतिष्ठानच्या सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास भिम प्रेमी प्रतिष्ठानचे महिला अध्यक्ष लक्ष्मी देवकर, चंद्रशेखर पाटील, रोहन सिताफळे, प्रफुल्ल दिलपाक, राहुल कांबळे, अजय आवार, कुमार आंबट, हणमंतु माने, विजय तळभंडारे, आरती हब्बु उपस्थित होते.



### पंढरपूर नगरपरिषद, पंढरपूर
**(जि. सोलापूर)**
**पंढरपूर नगरपरिषद निवडणूक २०२५**
**जाहीर निविदा**

सर्व मक्तेदार यांना कळविण्यात येते की, पंढरपूर नगरपरिषदेच्या आगामी निवडणुका-२०२५ करिता विविध प्रकारचे फॉर्म व स्टेशनरी साहीत्य इकडील सुचनेप्रमाणे व इतर अनुषांगिक साहीत्य आवश्यकतेनुसार पुरवठा करण्याचे विहीत नमून्यामध्ये दर पत्रकाची निविदा मागविण्यात येत आहे. निविदा पत्रके दिनांक-१०/११/२०२५ रोजी दु. ४.०० वाजेपर्यत निवडणूक विभागात विकत मिळतील. दिनांक १०/११/२०२५ रोजी दु. ४.०० वाजेपर्यंत भरलेली निविदापत्रके स्विकारली जातील. निविदांच्या अटी व शर्ती, इतर संपुर्ण माहिती सुट्टीखेरीज कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.

**सही/-**
**मुख्यधिक्कारी**
**नगररिषद पंढरपूर**

### खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन :-** डि. व सब डि. सोलापूर, तालुका उत्तर सोलापूर पैकी सोलापूर शहर महानगर पालिका हद्दवाढ भागातील कसबे सोलापूर येथील जुना सर्व्हे नं. १२२/१ ब यासी नविन सर्व्हे नं. १२०/१ ब यापैकी समता नगर मधील गोकुळकृष्ण नगर (गोकुळ नगर) मधील सब प्लॉट नं. ३७० याचे एकुण क्षेत्र ९२.९३ चौ. मीटर इतके आहे.

**यासी चतुःसीमा :-**
पुर्वेस :- प्लॉट नं. ३७१, दक्षिणेस :-रस्ता.
पश्चिमेस : प्लॉट नं. ३६९, उत्तरेस :-रस्ता.

येणेप्रमाणे चतुःसीमेतील खुली प्लॉट जागा त्यातील दगड, माती वगैरे तदंगभुत वस्तूंसह, मालकी व कब्जेवहिवाटीचे हक्कासह.

ही मिळकत, श्री. राजू नागय्या गुन्नाल, रा.३७०, गोकुळकृष्ण नगर, जुना विडी घरकुल, सोलापूर यांचे मालकीचे असून त्यांनी ही प्लॉट जागा आमचे अशिलास मालकी व कब्जेवहिवाटीचे हक्काने कायम खुष खरेदीने देण्याचे ठरवून इसारा पावती लिहून दिला आहे. त्यांनी ही प्लॉट जागा निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची असल्याचे खात्री दिली आहे, तरीही या प्लॉट जागेवर कोणाचाही, कोणताही, कसलाही गहाण, दान, बक्षिस, इसारा पावती, साठेखत, खरेदीखत, वारसा, पोटगी, टाच, बोजा, जप्ती, कोर्ट केसेस अथवा अन्य कोणत्याही स्वरुपाचा हक्क, हितसंबंध वा वाद असल्यास, त्यांनी खालील नमूद पत्यावर योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून सात दिवसांचे आत लेखी कळवावे. मुदतीत कोणाचेही हरकत न आल्यास सदर मिळकतीवर कोणाचाही, कोणताही, कसल्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध नसल्याचे समजून अथवा त्यांनी तो जाणीवपुर्वक स्वेच्छेने सोडून दिला असे समजून आमचे अशिल ठरल्यानुसार खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. नंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही, कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली असे. दि. ०३/११/२०२५

**सही/-**
अशिलातर्फे **ॲड. राजरतन द. श्रीराम**
**ऑ. १६२१/१/१, कुचन नगर, सोलापूर-५**
**मो.नं. ९८८१२४०५१६**

### खरेदीपूर्व जाहीर नोटीस

की, तमाम जनतेस विशेषतः सोलापूर शहरातील जनतेस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते

**मिळकतीचे वर्णन :** डि व सब डि सोलापूर पैकी ता. उत्तर सोलापूर पैकी सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दीतील भारतरत्न इंदिरा नगर-अ येथील महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेल्या संरक्षित गलिच्छ वस्ती सुधारणा अंतर्गत असलेली मिळकत क्र. ०७०६८०१३३० यांसी झोपडी क्र.४ यांसी क्षेत्र अंदाजे ७०० चौ. फुट इतके असून यामध्ये दोन बेडरुम, एक हॉल, एक किचन, अटॅच बाथरुम सर्व बांधकाम आरसीसी पध्दतीचे असून छतावर पन्हाळी पत्र असून त्यातील नळ व विद्युत कनेक्शनसहची मिळकत यांसी चतुः सिमा पूर्वेस झोपडी क्र. ३ पठाण यांचे घर, पश्चिमेस : रस्ता, दक्षिणेस : झोपडी क्र. ५ व रस्ता, उत्तरेस : झोपडी क्र.२ परळकर यांचे घर येणेप्रमाणे चतुःसिमेतील मिळकत व त्यातील इतर तद्ंगभूत वस्तुसहची मिळकत.

वर नमूद केलेली मिळकत ही शंकर राम काळे यांचे यांचे मालकी व कब्जे वहिवाटीची असुन त्यांनी सदरची वर नमूद मिळकत आमचे अशिलांना कायमखुष खरेदी देण्याचे ठरवुन आमचे अशिलांकडून इसारापावती करारपत्राने रक्कम स्विकारुन आमचे अशिलांचे हक्कात रितसर इसारा पावती लिहून दिलेली आहे. त्याअनुषंगाने सदरची मिळकत ही निर्वेध व निजोखमी असल्याबाबतची हमी सदरहू मालकांनी आमचे अशिलास दिलेली आहे.

तरी वर नमुद मिळकतीबाबत इतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबध, गहाण, दान, लिज, टाच, पोटगी, कोर्ट प्रकरण व इतर कायदेशीर हक्क असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ७ दिवसांच्या आंत खालील नमुद पत्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी आपली हरकत नोंदवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल सदरची मिळकत ही निर्वेध व निजोखमी आहे, असे समजून खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत चालणार नाही याची नोंद घ्यावी.

ही खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली ता.०३/११/२०२५.

**सही/-**
**ॲड. अजय दिनकर रणशृंगारे**
बी.एस.सी (ऑनर्स) एलएल.बी.
**ॲड. अनिता अजय रणशृंगारे**
बी.ए.एलएल.बी.
राः१४६, बुधवार पेठ, मिलिंद नगर,सोलापूर -४१३ ००२
सेल नं. ९८५०६८४६१६
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**

### हदगांव नगर परिषद हदगांव
**ता. हदगाव जि. नांदेड**
**२४६८ ऑफिस २२२४०८**

Email-id-cohadgaongmail.com — स्थापना १९५४

ह.न.प.जा.क्र. ३५२८/२०२५ — दिनांक ०३/११ /२०२५

**- जाहिर सूचना -**

विषय :- जनहित याचिका क्रमांक 71/2013 व Interim pplication (Lodging) No. 23119 of 2025 अंतर्गत मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी रस्त्यावरील खड्याच्या संदर्भात दिलेल्या निर्देशानुसार राज्यातील सर्व महानगरपालिका/नगर परिषद/नगर पंचायत यांनी समिती गठीत करणेबाबत.

उपरोक्त विषयी PIL 71/2013 रस्त्यावरील खड्डे व उघड्ण मॅनहोल संदर्भात मा. उच्च न्यायालयाच्या दिनांक 13/10/2025 रोजीच्या सुनावणीच्या आदेशातील मुद्दा क. 70 व 79 मध्ये नमूद निर्देशानुसार सर्व नगरपरिषद क्षेत्रात नियमित पद्धतीने रस्त्यावरील खड्डे व उघड्या मॅनहोल मुळे नागरिकांना दुखापत अथवा नागरिकांची मृत्यु होऊ नये, व रस्त्यावरील खड्डे संदर्भात प्राप्त होणाऱ्या तक्रारींचे वेळेत निराकरण व्हावे या दृष्टीकोनातून समिती गठीत करणे आवश्यक आहे. सदर निर्देशाचे अनुषंगाने हदगाव नगरपरिषद क्षेत्रातील संदर्भिय प्रशासकीय निर्णयानुसार मिळालेल्या मंजुरी अन्वये खालीलप्रमाणे compensation समिती गठीत करण्यात येत आहे.

| अ. क्र. | साहित्याचे नाव | कोन्या निविदेची रक्कम |
|---|---|---|
| १ | compensation समितीच्या अधिकारी यांचे नाव | समिती पदनाम |
| २ | मुख्याधिकारी न.प. हदगाव | अध्यक्ष |
| ३ | विद्यमान सचिव जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नांदेड | सदस्य |
| ४ | पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन हदगाव | सदस्य |
| ५ | नगर अभियंता, न.प. हदगाव | सदस्य |
| ६ | रचना सहाय्यक, न.प. हदगाव | सदस्प |

वरिलप्रमाणे समितीने मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी त्यांचेकडील जनहित याचिका क्रमांक 71/2013 मधील आदेश interim pplication (Lodging) No. 29119 of 2025 (For Intervention) अन्ध्ये पारीत केलेल्या आदेशानुसार व त्यामधील दिलेल्या सुचनेनुसार नगरपरिषद क्षेत्रात रस्त्यावरील खड्याबाबत प्राप्त होणाऱ्या तक्रारीवर कार्यवाही करण्यासाठी तसेच खड्यामुळे व उघड्या मॅनहोलमुळे अपघात झाल्यास अपघात ग्रस्त नागरिकांना किंवा त्यांच्या कायदेशीर वारसांना नुकसान भरपाई देण्याबाबत कार्यवाही करण्याच्या दृष्टीने समिती compensation समिती गठीत करण्यात येत आहे.

**सही/-**
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद हदगाव**

### हदगांव नगर परिषद हदगांव
**ता. हदगाव जि. नांदेड**
**२४६८ ऑफिस २२२४०८**

Email-id-cohadgaongmail.com — स्थापना १९५४

ह.न.प.जा.क्र. ३५३२/२०२५ — दिनांक ०३/११ /२०२५

**जाहिर निविदा-**
**हदगाव नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५**

खालील साहिय पुरवठा धारक यांना सूचित करण्यात येते कि हदगाव नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ अंतर्गत निवडणूक पूर्वतयारी करीता खालील प्रमाणे कामे करावयाची आहेत तरी इच्छूक पुरवठा धारक यांनी आपले दर पत्रक दिनांक १०/११/२०२५ रोजी सकाळी ११-०० वाजेपर्यंत नगरपरिषद कार्यालयात माझे समक्ष सादर करावेत मुदती नंतर आलेली कोणतीही निविदा स्वीकारली जाणार नाही.

| अ. क्र. | साहित्याचे नाव | कोन्या निविदेची रक्कम | निविदा अनामत रक्कम |
|---|---|---|---|
| १ | निवडणूक विभागात आवश्यक ते प्रमाणे स्टेशनरी व इतर आवश्यक साहित्य पुरवठा करणे. | १०००/- | ५०००/- |
| २ | निवडणूक कामकाजा करीता लागणारे सर्व रबरी स्टंप पुरवठा करणे | ५००/- | १०००/- |
| ३ | मंडप, साऊड सिस्टीम, बेरेकेटिंग, लाईट, बिछायत, फायबर खुर्ची, टेबल व इतर आवश्यक साहित्य पुरवठा करणे. | १०००/- | ५०००/- |
| ४ | निवडणूक कर्तव्यावर उपस्थित सर्व कर्मचारी यांना चहा, नास्ता भोजन व पिण्याचे पाणी पुरवठा करणे. | १०००/- | ५०००/- |
| ५ | निवडणूक कामाकाजा करीता चारचाकी गाड्या पुरवठ्या करणे. | १०००/- | २०००/- |
| ६ | मतदान केंद्रावर व इतर ठिकाणी CCTV कॅमेरे बसविणे. | १०००/- | ५०००/- |
| ८ | मतमोजणी कक्षात बेरेकेटिंग करून जाळी लावून देणे. | १०००/- | २०००/- |
| १० | निवडणूक विभागात संगणक संच पुरवठा करणे | १०००/- | ५०००/- |
| ११ | निवडणूक विभागात झेरॉक्स मशीन पुरवठा करणे. | १०००/- | २०००/- |

वरील सर्व साहित्याचा पुरवठा हा हदगाव नगरपरिषद कार्यालया पर्यंत करावा लागेल बाकी सर्व नियम व अटी खालील प्रमाणे राहातील.
१. सर्व साहित्याचे दर हे सर्व करा सहित देण्यात यावेत.
२. सर्व साहित्य विना विलंब पोहोच करण्याची जबाबदारी हि इविदा धारकाची असेल.
३. सर्व साहित्याची नगरपरिषद कार्यालयामध्ये निवडणूक विभागात पहावयास मिळेल.
४. कोणतीही निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा सर्व अधिकार मुख्याधिकारी यांनी राखून ठेवला आहे.

**सही/-**
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद हदगाव**

### जाहिर निविदा प्रसिध्दीकरण
### करमाळा नगरपरिषद करमाळा, जि. सोलापूर.
### जाहिर निविदा प्रसिध्दीकरण सुचना

करमाळा नगरपरिषदेकडोल बांधकाम विभागातील कामांसाठी सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासासाठी करावयाच्या खालील कामांसाठी जाहिर निविदा अनुभवी ठेकेदारांकडून तांत्रिक ब-१ व्या नमुन्यात स्पर्धात्मक मागवित आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | बयाणा रक्कम | कोरी निविदा किंमत रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | मोहल्ला गल्ली येथे विविध ठिकाणी रस्ते कॉंक्रीटीकरण करणे. | ९८२६९६.०० | १००००/- | १०००/- |
| २ | जैन स्थानक कुंकू गल्ली येथे गटार बांधकाम करणे व रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. भाग-अ | ९८३३८२.०० | १००००/- | १०००/- |
| ३ | जैन स्थानक कुंकू गल्ली येथे गटार बांधकाम करणे व रस्ता कॉंक्रीटीकरण करणे, भाग-ब | १९९८२९.०० | २००/- | ५००/- |
| ४ | शिवाजी नगर भागातील वेळापूरे घराजवळ कॉंक्रीटीकरण करणे. | १९८४५९.०० | २००/- | ५००/- |
| ५ | शिवाजी नगर भागातील नलवडे घराजवळ कॉंक्रीटीकरण करणे. | १९८२२१.०० | २००/- | ५००/- |
| ६ | मुथानगर येथे बुधवंत सर घर ते दहिदुले घर PVC पाईप लाईन टाकणे चेंबर बांधणे. | १९९०३०.०० | २००/- | ५००/- |
| ७ | मुथानगर येथे जाधव घर ते सुभाष भोसले घर PVC पाईप लाईन टाकणे चेंबर बांधणे. | १९८२९२.०० | २००/- | ५००/- |
| ८ | मुथानगर येथे भोसले घर ते नाल्यापर्यंत PVC पाईप लाईन टाकणे चेंबर बांधणे. | १९८९१९.०० | २००/- | ५००/- |
| ९ | शिवाजी नगर येथे बगीचा जवळ कॉंक्रीटीकरण करणे. | १९७८८८.०० | २००/- | ५००/- |
| १० | शाहू नगर संत वामनभाऊ गॅरेज जवळ कॉंक्रीटीकरण करणे व पेव्हींग ब्लॉक बसविणे. | १९९४८२.०० | २००/- | ५००/- |
| ११ | करमाळा नगरपरिषदेच्या सफाई कामगार वसाहतीची दुरुस्ती करणे भाग-अ | १९९९००.०० | २००/- | ५००/- |
| १२ | करमाळा नगरपरिषदेच्या सफाई कामगार वसाहतीची दुरुस्ती करणे भाग-ब | १९९९६५.०० | २००/- | ५००/- |
| १३ | शितोळे घर ते गणपती मंदिर गटार बांधकाम करणे. | ८८९७८२.०० | १००००/- | १०००/- |

१) जाहिर निविदा फॉर्म न.पा. कार्यालयात दि.०४/११/२०२५ ते दि.१२/११/२०२५ सायं. ६,०० वाजेपर्यंत विक्रीसाठी उपलब्ध आहेत.
२) जाहिर निविदा फॉर्म स्विकृती दि. ०४/१०/२०२५ ते दि. १३/११/२०२५ दु.४.०० वाजेपर्यंत राहिल.
३) जाहिर निविदा उघडण्याचा दि. १३/११/२०२५ रोजी दु. ४.०० वा. (शक्य झाल्यास)
४) सर्व पात्र/इच्छुक निविदाधारकांसाठी निविदा फॉर्म न.पा. च्या कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहेत.

**शर्ती व अटी :-**
१) कोणतीही निविदा स्विकारणेचा अथवा नामंजूर करणेचा अधिकार मुख्याधिकरी यांनी राखून ठेवला आहे.
२) निविदाधारकांनी निविदा फॉर्म लिफाफे दि. १३/११/२०२५ रोजी दु.४.०० वाजेपर्यंत करमाळा नगरपरिषद कार्यालयात जमा करावयाची आहेत.
३) कोणत्याही बाबीसाठी काही तंटा निर्माण झाल्यास याबाबत नगरपरिषदेचा निर्णय अंतिम राहिल.

**सही/-** **(श्री. आकाश वाघमारे)** **बांधकाम अभियंता** **करमाळा नगरपरिषद**

**सही/-** **(श्री. सचिन तपसे)** **मुख्याधिकरी** **करमाळा नगरपरिषद**

### सोलापूर महानगरपालिका, सोलापूर
पर्यावरण विभाग
ईमेल: env.smcgmail.com
सह्याद्री शॉपिंग सेंटर, जुना एम्प्लॉयमेंट चौक, सोलापूर ४१००२

LiFE Lifestyle for Environment

जा.क्र./उ.बि./ — दि. २८/१०/२०२५

**जाहीर प्रसिद्धीकरण**

सोलापूर महानगरपालिकेने सोलापूर शहरातील विविध चौक (आयलंड) / रस्ते दुभाजक कामांच्या विकास, देखभाल आणि वृक्षारोपण कामासाठी स्वयंसेवी संस्था/सार्वजनिक/खाजगी क्षेत्रातील युनिट्स (औद्योगिक कॉर्पोरेट हाऊसेस, विकासक, कंत्राटदार, एजन्सी आणि इतर संस्था) यांचा सक्रिय सहभाग घेण्याचा निर्णय घेतला आहे. प्रायोजकत्व दत्तक तत्त्वावर पंपीपी (सार्वजनिक खाजगी भागीदारी) किंवा सीएसआर (कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी) त्यांच्या सल्लागार आर्किटेक्टने तयार केलेल्या आणि महानगरपालिकेने मंजूर केलेल्या तपशीलांनुसार सोलापूर महानगरपालिकेकडून (आयलंड/रस्ते दुभाजक विकसित करण्यासाठी, चालवण्यासाठी आणि देखभाल करण्यासाठी आवश्यक तज्ञ असलेल्या इच्छुक एजन्सींना आमंत्रित करण्यात आले असता शहरातील एकुण १० ठिकाणी संस्थांनी आपला सहभाग नोंदविला असुन उर्वरित ठिकाणच्या सहभागा करिता सदरचे प्रसिद्धीकरण करण्यात येत आहे.

संस्थाना सुरुवातीला ३ वर्षांच्या कालावधीसाठी महानगरपालिकेने मंजूर केलेल्या काही निश्चित ठिकाणी आणि क्षेत्रात त्यांचे स्वतःचे नाव/लोगो प्रदर्शित करण्यासाठी एजन्सीची निवड केली जाईल आणि त्यांना सदर ठिकाणी जाहिरातीचे अधिकार दिले जाऊ शकतात आणि नंतर मा. आयुक्त, महानगरपालिका यांच्या मान्यतेने पुढील २ वर्षापर्यंत वाढवता येतील. पात्रता निकष, अटी आणि शर्ती, चौक (आयलंड) रस्ते दुभाजक आणि इतर तपशील महानगरपालिकेने www.aolapurcorporation.gov.in या वेबसाइटवरून पाहता येतील आणि डाउनलोड करत येतील. इच्छुक एजन्सी सहभागी होण्यासाठी सोबत जोडलेल्या यादीनुसार त्यांची संमती आणि तपशीलवार प्रस्ताव उद्यान अधीक्षक, उद्यान विभाग, रामलाल चौक, सोलापूर- ४१३००१ याच्या कार्यालयात सादर करू शकतात.

EOI सादर करण्याची अंतिम तारीख दि. ०४/११/२०२५ ते दि. १७/११/२०२५ अखेर आहे.

**शहरातील मुख्य दुभाजक / आयलंडची यादी**

| अ. क्र. | दुभाजकाचे / आयलंड | अंदाजित लांबी (मि.) | अंदाजित डिपोझीट (र.रु.) |
|---|---|---|---|
| १ | जुना एम्प्लॉयमेंट चौक ते डी. आर. एम ऑफिस (दुभाजक) | ३०० | ४०,०००/- |
| २ | गोविंदश्री मंगल कार्यालय ते दावत चौक (दुभाजक) | ६०० | ८०,०००/- |
| ३ | डी. मार्ट ते गोविंदश्री मंगल कार्यालय (दुभाजक) | ३५० | ४४,०००/- |
| ४ | दावत चौक ते चैतन्य मार्केट (दुभाजक) | ६०० | ८०,०००/- |
| ५ | नवीवेस पोलीस चौकी ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पार्क चौक (दुभाजक) | ६०० | ८०,०००/- |
| ६ | अक्कलकोट रोड पाणी टाकी वॉकिंग ट्रॅक NCPA योजनेतील काम क्र.९ | ६०० | ८०,०००/- |
| ७ | जुना पुना नाका NCPA योजनेतील काम | १०० चौ. मी. | ३२,०००/- |
| ८ | अक्कलकोट रोड पाणी टाकी NCPA योजनेतील काम क्र.२ | २०० चौ. मी. | ६४,०००/- |
| ९ | किडवाई चौक (आयलंड) | ५० चौ. मी. | १६,०००/- |

**सही/-**
**उपायुक्त २**
**सोलापूर महानगरपालिका**


## सिव्हिल हॉस्पीटलमधील बाथरूममध्ये पडून जखमी झालेल्या गर्भवती महिलेचा मृत्यू

**सोलापूर -** सिव्हिल हॉस्पीटलमधील बाथरूममध्ये पडून जखमी झालेल्या गर्भवती महिलेचा मृत्यू झाला. सना तौफिक बेग (वय २६, रा. बार्शी) असे तिचे नाव आहे. प्रसुतीसाठी दाखल सना बेग दि.२ नोव्हेंबर रोजी सायंकाळी वॉर्डातील बाथरूममध्ये गेल्या होत्या. त्यावेळी पाय घसरून पडल्याने त्यांच्या पोटास मार लागून रक्तस्त्राव होऊ लागला. त्यामुळे सना यांची प्रकृती गंभीर झाल्याची नोंद डॉ. प्रगती शिंदे यांनी सिव्हील पोलिस चौकीत केली आहे. दरम्यान उपचार सुरु असताना ३ नोव्हेंबरला सकाळी सना यांचा मृत्यू झाला. याबाबत डॉ. राजश्री वंजारे यांनी खबर दिली आहे. पोलिसात नोंद झाली.



### जाहीर प्रसिद्धीकरण

तमाम नागरीकास या नोटीसींद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलाचे पती प्रदिपकुमार मधुकर सोनवणे यांचे नावे रिक्षा क्र. एम. एच. १३-सी. टी. ४३४६ ही रिक्षा असून परवाना क्र, १३/२३४५ प्रवासी वाहतूक परवाना आहे. आमचे अशिलांचे पती कै. प्रदिपकुमार मधुकर सोनवणे यांचे दि. २२/०२/२०२५ रोजी निधन झाले असून त्यांच्या पश्चात आमचे अशिल निता प्रदिपकुमार सोनवणे हे कायदेशीर वारस आहेत. त्याकरीता आमचे अशिलांनी उप. प्रादेशिक कार्यालय, सोलापूर यांचेकडे सदर रिक्षा परवाना आमचे अशिलांचे नावावर हस्तांतरण करणेकरीता अर्ज केला आहे.

यात कोणाची काही हरकत व तक्रार असल्यास ही नोटीस जाहीर झाल्यापासून ८ दिवसाचे आत सविस्तर कागदपत्रासह उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, सोलापूर येथे हजर रहावे.

ही जाहीर प्रसिद्धीकरण दिले. दि. ३/११/२०२५

**सही/-**
**अशिलातर्फे ॲड. सुदर्शन उत्तेश्वर सोनवणे**
B.Sc. L.L.B Reg No. - MAH/4761/2010
**अति रिक्त जिल्हा व सत्र न्यायालय**
mob- 9545066000 / 9922790716
**बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर**
**मो.नं. ९८३४५८७८२६**

### अुत्तम सेवा — मंगळवार दि. ०४ नोव्हेंबर २०२५ — नोकरीच्या शोधात

**उमेदवारांसाठी अत्यंत महत्त्वाची सूचना- खालील विविध स्पर्धा परीक्षांचे फॉर्म योग्य त्या विहीत नमुन्यात नसल्यास रद्द होऊ शकतात. तरी हे टाळण्यासाठी नोकरीविषयक स्पर्धा परीक्षा फॉर्म विक्रीचे सोलापुरातील एकमेव, अचूक फॉर्म विक्री केंद्र, अुत्तम सेवा, पार्क चौक, सोलापूर येथूनच फॉर्म खरेदी करावेत व संभाव्य नुकसान टाळावे.**

| अ. क्र. | ज्या कार्यालयात पद आहे त्या कार्यालयाचे नाव | शैक्षणिक/तांत्रिक अर्हता पदनाम व अनुभव | वयोमर्यादा (वर्षात) | अर्ज भरण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|
| १) | **छत्रपती शिवाजी महाराज शासकिय रूग्णालय सोलापूर** | | | |
| | कक्षसेवक/शिपाई/परिचर/सेवक/कर्मचारी इ. (१५३ पदे) | दहावी उत्तीर्ण स्त्री/पुरूष उमेदवार | ३८ पर्यंत | १२/११/२५ |
| २) | **शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सोलापूर** | | | |
| | शिपाई/माळी/अंधारखोली परिचर (२० पदे) | दहावी उत्तीर्ण स्त्री/पुरूष उमेदवार | ३८ पर्यंत | २०/११/२५ |
| ३) | **महाराष्ट्र राज्य पोलीस भरती,** | **२०२५** | | |
| | १) कॉन्स्टेबल (१२६२४ पदे) | बारावी उत्तीर्ण स्त्री/पुरूष उमेदवार | २८ पर्यंत | ३०/११/२५ |
| | २) वाहनचालक (५१५ पदे) | बारावी उत्तीर्ण स्त्री/पुरूष उमेदवार | २८ पर्यंत | |
| | ३) कॉन्स्टेबल SRPF(१५६६ पदे) | बारावी उत्तीर्ण स्त्री/पुरूष उमेदवार | २५ पर्यंत | |
| | ४) कॉन्स्टेबल कारागृह (५५४ पदे) | बारावी उत्तीर्ण स्त्री/पुरूष उमेदवार | २८ पर्यंत | |
| | ५) बॅन्डस्मन (११३ पदे) | दहावी उत्तीर्ण असावे | २८ पर्यंत | |

**✻ मोफत सरकारी अपडेट ✻**
**सर्व सरकारी नोकरींचे व स्पर्धा परिक्षांचे अपडेट आपल्या व्हॉटस्‌ॲपवर मोफत मिळविण्याकरिता ९७६३७४१९९१ या नंबरला ''जॉईन'' असा मेसेज व्हॉटस्‌ॲप करावा.**

| अ. क्र. | ज्या कार्यालयात पद आहे त्या कार्यालयाचे नाव | शैक्षणिक/तांत्रिक अर्हता पदनाम व अनुभव | वयोमर्यादा (वर्षात) | अर्ज भरण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|
| ४) | **रेल्वे रिक्रुटमेंट बोर्ड, RRB** | **(पदवीपूर्व)** | | |
| | १) तिकीट क्लर्क (२४२४ पदे) | ५०% गुणांसह बारावी उत्तीर्ण असावे | ३० पर्यंत | २७/११/२५ |
| | २) टायपिस्ट (५५७ पदे) | ५०% गुणांसह बारावी व टायपिंग इंग्रजी उत्तीर्ण स्त्री/पुरूष उमेदवार | ३० पर्यंत | |
| | ३) ट्रेन क्लर्क (७७ पदे) | ५०% गुणांसह बारावी उत्तीर्ण असावे | ३० पर्यंत | |
| ५) | **रेल्वे रिक्रुटमेंट बोर्ड, RRB** | **(पदवीधर)** | | |
| | १) ट्रेन मॅनेजर (३४१६ पदे) | पदवीधर स्त्री/पुरूष उमेदवार असावे | ३३ पर्यंत | २०/२२/२५ |
| | २) स्टेशन मास्तर (६१५ पदे) | पदवीधर स्त्री/पुरूष उमेदवार असावे | ३३ पर्यंत | |
| | ३) तिकीट सुपरवायजर (१६१ पदे) | पदवीधर स्त्री/पुरूष उमेदवार असावे | ३३ पर्यंत | |
| | ४) टायपिस्ट (१५५९ पदे) | पदवी व इंग्रजी टायपिंग उत्तीर्ण असणारे स्त्री/पुरूष उमेदवार | ३३ पर्यंत | |

**सुवर्णसंधी - १) वार्षिक वर्गणी भरल्यास वर्षभर नोकरीविषयक फॉर्म घरपोच मिळतील.**
**२) नोकरीविषयक फॉर्म संबंधित कार्यालयास सत्वर पोहोच केले जातील. (कुरिअर सर्व्हिस)**
**३) खाजगी नोकरी (प्रायव्हेट प्लेसमेंट)साठी नाव नोंदणी करा. ४) नोकरीविषयक साप्ताहिकाचे सभासद व्हा.**

वरीलपैकी कोणत्याही फॉर्मसाठी वा अचूक माहितीसाठी भेटा वा रु. ५०/- ची मनिऑर्डर करा. MPSC, RRB, BSRB, SET, NET, IAS / IPS, NDA, CDS, LIC, KVS नवोदय, कोर्ट, निवड मंडळ, स्टाफ सिलेक्शन, इंजिनिअरिंग, पोलीस भरती, तलाठी, रेल्वे या स्पर्धा परीक्षांची अद्ययावत पुस्तके फक्त आमच्याकडेच मिळतील.

**अुत्तम सेवा** १) २२, डॉ. कोटणीस शॉपिंग सेंटर, सिद्धेश्वर मंदिराजवळ, पार्क चौक, सोलापूर. वेळ स. १० ते सायं ७, फोन नंबर - ९७६३७४१९९१.

www.uttamseva.org

## महत्त्वाचे

### भारतीय संघाला ५१ कोटींचे बक्षीस जाहीर

**नवी दिल्ली.** सध्या मुंबईत असलेल्या खेळाडू मंगळवारी सायंकाळपर्यंत नवी दिल्लीत पोहोचतील आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना भेटल्यानंतर आपापल्या घरी जातील अशी अपेक्षा आहे. अद्याप विजयोत्सव साजरा करण्याचे नियोजन नसले तरी, बीसीसीआयने महिला संघाला त्यांचे पहिले आयसीसी जेतेपद जिंकल्याबद्दल कौतुक म्हणून ५१ कोटी रुपये बक्षीस देण्याचा निर्णय घेतला आहे. रविवारी पुरस्कार वितरण समारंभात विश्वविजेत्या भारतीय महिला क्रिकेट संघाला आयसीसीतर्फे ४० कोटी रुपयांचा धनादेश प्रदान करण्यात आला.

**हिमाचल प्रदेश सरकारकडून रेणुका ठाकूरला १ कोटींचे बक्षीस**

हिमाचल प्रदेशचे मुख्यमंत्री सुखविंदर सिंग सुखू यांनी सोमवारी भारताच्या महिला विश्वचषक विजेत्या संघाचा भाग असलेल्या वेगवान गोलंदाज रेणुका सिंग ठाकूरला १ कोटी रुपयांचे रोख बक्षीस जाहीर केले. रेणुका ही शिमला जिल्ह्यातील रोहरू भागातील रहिवासी आहे. आपल्या देशाच्या मुलींनी विश्वचषक जिंकून इतिहास रचला आहे आणि या कामगिरीबद्दल संपूर्ण संघाचे आणि त्यांच्या कर्णधाराचे अभिनंदन केले, असे मुख्यमंत्री सुखू म्हणाले. मी अंतिम सामना पाहिला आहे आणि तू चांगली कामगिरी केलीस आणि राज्याला तुझा अभिमान आहे, असे त्यांनी रेणुकाला फोन करून सांगितले. मुख्यमंत्र्यांनी तिला नोकरी देण्याचे आश्वासनही दिले.

### बुद्धिबळ विश्वचषकात एस.एल. नारायणन्‌चा विजय

**पणजीम** : सोमवारी येथे संपलेल्या फिडे विश्वचषक २०२५ च्या टाय-ब्रेक सामन्यांच्या पहिल्या सेटमध्ये भारताच्या एस.एल. नारायणनने दक्षिण आफ्रिकेच्या स्टीवन रोजासवरग लक्षवेधक विजय नोंदविला आणि १२८ व्या फेरीत प्रवेश करणारा तो पहिला खेळाडू ठरला. पहिल्या डावामध्ये काळ्या सोंगट्यानिशी खेळताना नारायणन्‌ने बारीक नियोजनाने पांढऱ्या सोंगट्याच्या बचाव फळीला उद्‌ध्वस्त केले आणि त्यानंतर केवळ २२ चालींमध्ये उल्लेखनीय विजय मिळवून आपला अधिकार कायम ठेवला. कोलकात्याच्या दीप्तयन घोषने चीनच्या पेंग झिओन्गिलयनपेक्षा वरचढ ठरले, कारण त्याने टायब्रेकरच्या पहिल्या सेटमध्ये दोन्ही डाव जिंकून पुढे जाण्याचा प्रयत्न केला.

### ऑस्ट्रेलियाच्या टी-२० संघातून ट्रॅव्हिस हेडची मुक्तता

**होबार्ट** : अॅशेस कसोटी मालिकेच्या तयारीचा भाग म्हणून शेफील्ड शिल्डमध्ये खेळण्यासाठी भारताविरुद्धच्या उर्वरित दोन सामन्यांसाठी ऑस्ट्रेलियाच्या टी-२० आंतरराष्ट्रीय संघातून सलामीवीर फलंदाज ट्रॅव्हिस हेडला सोमवारी मुक्त करण्यात आले. ३१ वर्षीय डावखुरा फलंदाज १० नोव्हेंबरपासून येथे तस्मानियाविरुद्ध दक्षिण ऑस्ट्रेलियासाठी अॅलेक्स कॅरीसोबत खेळेल. इंग्लंडविरुद्धच्या पाच कसोटी सामन्यांच्या मोहिमेसाठी तयारीला प्राधान्य देणारा हेड हा ऑस्ट्रेलियाच्या टी-२० संघातील तिसरा सदस्य आहे. जोश हेझलवूड आणि शॉन अॅबॉट हे इतर खेळाडू आहेत, ज्यांनी टी-२० मालिकेतील पहिल्या तीन सामन्यांमध्ये भारताचा सामना केला आहे. आता ही जोडी न्यू साउथ वेल्सकडून व्हिक्टोरियाविरुद्धच्या स्टार खेळाडूंचा समावेश असलेल्या सामन्यात खेळेल. भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील पाच सामन्यांची टी-२० मालिका तीन सामन्यांनंतर १-१ अशी बरोबरीत आहे. शेवटचे दोन सामने कॅरारा (६ नोव्हेंबर) आणि ब्रिस्बेन (८ नोव्हेंबर) येथे खेळले जातील.

### युवा आशियाई पदक विजेत्यांना रोख पुरस्कार

**नवी दिल्ली** : भारतीय ऑलिम्पिक संघटनेने (आयओए) बहरीन येथे झालेल्या तिसऱ्या आशियाई युवा क्रीडा स्पर्धेत भारतीय संघाच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल त्यांचे मनापासून अभिनंदन आणि त्यांच्यासाठी रोख पुरस्काराची घोषणा केली. या स्पर्धेत भारताच्या युवा खेळाडूंनी विविध क्रीडा प्रकारांमध्ये एकूण ४८ पदके जिंकलीत, यात १३ सुवर्ण, १८ रौप्य आणि १७ कांस्यपदके जिंकली. या संघाने २००९ व २०१३ मधील मागील पदकांच्या कामगिरीला मागे टाकले. या प्रशंसनीय कामगिरीची दखल घेत, आयओएने लवकरच होणाऱ्या एका विशेष समारंभात सर्व पदक विजेते, प्रशिक्षक आणि चौथे स्थान मिळवणाऱ्या खेळाडूंचा सत्कार करण्याचा निर्णय घेतला आहे. आयओएने खेळाडू आणि प्रशिक्षकांसाठी रोख पुरस्कारांची घोषणा केली आहे. सुवर्णपदक विजेत्यांना प्रत्येकी ५ लाख रुपये, तर रौप्य आणि कांस्यपदक विजेत्यांना अनुक्रमे ३ लाख रुपये व २ लाख रुपये बक्षीस दिले जाईल. चौथ्या क्रमांकावर असलेल्या खेळाडूंना प्रत्येकी ५० हजार रुपये आणि पदक विजेत्या खेळाडूंच्या प्रशिक्षकांना प्रत्येकी १ लाख रुपये देऊन सन्मानित केले जाईल. याशिवाय मुलांच्या आणि मुलींच्या दोन्ही कबड्डी संघांना प्रत्येकी १० लाख रुपये बक्षीस दिले जाईल.





मुंबई : आयसीसी महिला विश्वचषक जिंकल्याच्या आनंदात भांगडा करताना भारतीय संघाची कर्णधार हरमनप्रीत कौर तर दुसऱ्या छायाचित्रात डीवाय पाटील स्टेडियमवर आयसीसी महिला विश्वचषक जिंकल्यानंतर सादरीकरण समारंभात ट्रॉफीसह आनंद साजरा करताना भारतीय महिला क्रिकेटपटू.

## राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, पंतप्रधानांनी केले अभिनंदन

♦ **नवी दिल्ली, ३ नोव्हेंबर**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन् आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी भारतीय महिला क्रिकेट संघाचे त्यांच्या पहिल्या विश्वचषक जिंकल्याबद्दल अभिनंदन केले आणि म्हटले की, हा महत्त्वाचा क्षण या खेळाला आणखी उच्च कामगिरीवर घेऊन जाईल. मुलींनी भारताला ज्या प्रकारे अभिमानास्पद कामगिरी बजावली आहे त्यांचे मी कौतुक करते, असे मुर्मू यांनी एक्सवरील पोस्टमध्ये म्हटले आहे. उपराष्ट्रपती राधाकृष्णन यांनी या विजयाचे वर्णन ऐतिहासिक कामगिरी आणि देशासाठी अभिमानाचा क्षण असे केले.

**मोदींनी दिले महिला संघाला निमंत्रण**

पंतप्रधान कार्यालयाने सोमवारी भारतीय क्रिकेट नियामक मंडळाला (बीसीसीआय) औपचारिक निमंत्रण पाठवले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विश्वविजेत्या भारतीय महिला संघाचे कौतुक व अभिनंदन करण्यासाठी ५ नोवहेंबरला भेटीचे निमंत्रण पाठवल्याचे समजते. *(वृत्तसंस्था)*

# देशभरातून महिला संघावर अभिनंदनाचा वर्षाव

♦ **नवी मुंबई, ३ नोव्हेंबर**

महिला क्रिकेट संघाच्या ऐतिहासिक पहिल्या विश्वचषक विजयानंतर हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील भारतीय महिला संघावर देशभरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. आघाडीच्या क्रीडा व्यक्तिमत्त्वे, राजकीय व्यक्ती, कॉर्पोरेट क्षेत्रातील मान्यवर आणि बॉलिवूड कलाकारांनी त्याला संपूर्ण पिढीला प्रेरणा देणारा 'निर्णायक' क्षण म्हटले.



भारतीय महिला क्रिकेटसाठी हा एक महत्त्वाचा क्षण आहे, कारण वर्षानुवर्षे केलेल्या कष्टानंतर अखेर भारतीय महिला संघाने रविवारी रात्रीच्या अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिकेला ५२ धावांनी पराभूत केले आणि एकदिवसीय विजेतेपद पटकावणारा चौथा संघ ठरला.

**पंतप्रधान नरेंद्र मोदींनी केले महिला संघाचे अभिनंदन**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आयसीसी महिला क्रिकेट विश्वचषक २०२५ च्या अंतिम सामन्यात भारतीय महिला क्रिकेट संघाच्या शानदार विजयाबद्दल अभिनंदन केले. त्यांनी ट्विट केले की, आयसीसी महिला क्रिकेट विश्वचषक २०२५ च्या अंतिम सामन्यात भारतीय संघाचा शानदार विजय झाल्याबद्दल अभिनंदन. अंतिम सामन्यातील भारतीय संघाची कामगिरी उत्तम कौशल्य आणि आत्मविश्वासाने भरलेली होती. संपूर्ण स्पर्धेत संघाने असाधारण टीमवर्क आणि दृढनिश्चय दाखवला. आमच्या खेळाडूंचे अभिनंदन. हा ऐतिहासिक विजय भविष्यातील विजेत्यांना खेळात रस घेण्यास प्रेरित करेल, असे मोदींनी म्हटले आहे.

**देशासाठी एक मुकुट क्षण : अमित शाह**

आमच्या संघाने आयसीसी महिला विश्वचषक २०२५ जिंकला आहे, विश्वविजेत्या टीम इंडियाला शुभेच्छा. हा देशासाठी एक मुकुट क्षण आहे, भारताचा अभिमान गगनाला भिडला आहे. तुमच्या उत्कृष्ट क्रिकेट कौशल्याने लाखो मुलींसाठी प्रेरणाचा मार्ग मोकळा केला आहे. संपूर्ण संघाचे अभिनंदन, असे गृहमंत्री अमित शाह यांनी लिहिले.

आमच्या महिलांनी 'इतिहास रचला!. प्रतिष्ठित कामगिरी केली आहे. १४० कोटी भारतीय या अभिमानास्पद क्षणाचे कौतुक करत आहेत. अभिनंदन, विश्वविजेत्या!, असे क्रीडा मंत्री मनसुख मांडविया यांनी लिहिले.

१९८३ ने संपूर्ण पिढीला मोठी स्वप्ने पाहण्याची आणि त्या स्वप्नांचा पाठलाग करण्याची प्रेरणा दिली. आज, आमच्या महिला क्रिकेट संघाने खरोखर काहीतरी खास केले आहे, असे क्रिकेट दिग्गज सचिन तेंडुलकरने एक्स वर लिहिले. निर्भयपणे क्रिकेट खेळल्याबद्दल स्टार क्रिकेटपटू विराट कोहलीने विश्वविजेत्या महिल संघाचे कौतुक केले. शाब्बास हरमन आणि संघ. जय हिंद, असे कोहलीने लिहिले. *(वृत्तसंस्था)*



## आम्हाला एक मोठी स्पर्धा जिंकायची होती : हरमनप्रीत

♦ **नवी मुंबई, ३ नोव्हेंबर**

आम्ही अनेक वर्षांपासून चांगले क्रिकेट खेळत आहोत, परंतु आम्हाला एक मोठी स्पर्धा जिंकायची होती, ते स्वप्न आज पूणई झाले, पण त्याशिवाय आम्ही परिवर्तनाबद्दल बोलू शकत नव्हतो, असे कर्णधार हरमनप्रीत कौर भारतीय संघाच्या विश्वचषकाच्या विजयानंतर माध्यमांना सांगितले.

आम्ही चांगले क्रिकेट खेळत नव्हतो असे नाही, परंतु दिवसाच्या शेवटी, चाहते व प्रेक्षक आपल्या आवडत्या संघाला जिंकताना पाहू इच्छित होते व आम्ही या क्षणाची खूप वाट पाहत होतो आणि आज आम्हाला तो क्षण जगण्याची, अनुभवण्याची संधी मिळाली. मला ते कसे व्यक्त करावे हे कळत नाही, परंतु मी या संघाबद्दल खूप आनंदी व अभिमानी आहे, असे हरमनप्रीत म्हणाली. हरमनप्रीत कौर खूप शांत दिसत होती, पण ती खूप काही अनुभवत होती हे जाणवत होते. मी केवळ माझ्या भावना व्यक्त करण्याचा प्रयत्न करत आहे. मी सुन्न आहे. मला कळत नाही, असे ती म्हणाली. *(वृत्तसंस्था)*



## श्रीकांत हरनाळेंनी जिल्हा क्रीडाधिकारी पदाचा कार्यभार स्वीकारला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ नोव्हेंबर-**

जिल्हा क्रीडाधिकारी नरेंद्र पवार यांची जालना येथे बदली झाली असून त्यांच्या ठिकाणी भूम (जि.धाराशिवचे) तालुका क्रीडाधिकारी श्रीकांत हरनाळे यांच्याकडे अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला आहे.

सोमवारी त्यांनी श्री. पवार यांच्याकडून कार्यभार स्वीकारला. यावेळी मुख्य क्रीडा कार्यकारी अधिकारी दत्ता वरकड, क्रीडा अधिकारी नदीम शेख, सोलापूर शहर जिल्हा क्रीडा व शारीरिक शिक्षण शिक्षक महासंघाचे जिल्हाध्यक्ष दशरथ गुरव, जिल्हा सचिव संजय शिंदे, शहराध्यक्ष विठ्ठल कुंभार, शहर सचिव प्रम ोद शिंदे, सहसचिव प्रा राहुल हजारे, विश्वास गायकवाड, श्री धेंडे आदी उपस्थित होते.




## सोलापूरच्या कविन केंगनाळकरला आंतरराष्ट्रीय पॅरा-शूटिंगमध्ये सुवर्ण

**सोलापूर, दि. ३ नोव्हेंबर-**

येथील कविन केंगनाळकरने आंतरराष्ट्रीय पॅरा-शूटिंग स्पर्धेत सुवर्ण पटकाविले. अल ऐन, यूएई येथे झालेल्या स्पर्धेत पॅरा-शूटर कविनने १० मीटर एअर रायफल पॅरा-शूटिंगमध्ये सांघिक गटात ही कामगिरी केली. आंतराराष्ट्रीय पातळीवर त्याचे पहिलेच पदक आहे. यात ३९ देशातल २९० शूटर्सनी भाग घेतला होता. मुख्य प्रशिक्षक जीवन राय आणि पॅरालिम्पिक असोसिएशनचे संचालक जयप्रकाश नौटियाल यांचे मार्गदर्शन लाभले.

## भारतीय महिला संघाने वर्ल्ड कप जिंकल्याबद्दल देशात सुट्टी जाहीर करा

▸▸ वॉव संघटनेच्या विद्या लोलगे यांची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ नोव्हेंबर-**

भारतीय महिला संघाने क्रिकेट विश्वचषक पटकाविल्याल्याबद्दल देशात सार्वजनिक सुट्टी जाहीर करावी. शासनाने सर्व विजेत्या खेळाडूंना मोठी आर्थिक बक्षिसे देण्यात यावीत, अशी मागणी वॉव संघटनेच्या अध्यक्षा विद्या लोलगे यांनी पत्रकार परिषदेत केली.

क्रिकेट विश्वातील आंतरराष्ट्रीय एक दिवसीय सामन्यातील विश्वविजेतेपद भारतीय महिला संघाला मिळाले आहे. हा आनंदाचा ऐतिहासिक असा क्षण आहे. यानिमित्ताने देशात सार्वजनिक सुट्टी जाहीर करावी. यापूर्वी भारतीय पुरुष संघाने वर्ल्डकप जिंकल्यानंतर केंद्र सरकारने तशी सुट्टी जाहीर केली होती त्याचप्रमाणे यंदाही सरकारने सुट्टी जाहीर करावी. सर्व खेळाडूंना केंद्र तसेच राज्य सरकारने मोठी आर्थिक बक्षीसे द्यावीत, अशी मागणी वॉव या संघटनेने केली आहे. संघटनेचे अध्यक्ष विद्या लोलगे यांच्या नेतृत्वात पेढे वाटून आनंद व्यक्त करण्यात आला. या पत्रकार परिषदेस शारदा मसुती, सायरा शेख, शोभा गायकवाड आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.



सोलापूर : पार्क चौक येथे एकमेकांना पेढे भरवत आनंद साजरा करताना वॉव संघटनेच्या महिला.



## सिद्धेश्वर कन्या प्रशालेची किक बॉक्सिंग स्पर्धेत कामगिरी

### तनवी अंबुरेची पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ नोव्हेंबर-**

राजीव गांधी इनडोअर स्टेडियमवर झालेल्या शालेय शहर कराटे स्पर्धेत सिद्धेश्वर कन्या प्रशालेच्या खेळाडूंनी कामगिरी केली. यातील सुवर्ण पदक विजेत्यांची ६० किलो गटात तनवी अंभोरे हिची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली.

यशस्वी खेळाडूंना क्रीडा शिक्षक गुरुसिद्ध होर्तीकर, प्रचिता जोगदंडे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे शालेय शिक्षण समितीचे चेअरमन धर्मराज काडादी, भीमाशंकरजी पटणे, गुरुराज माळगे, डॉ. राजशेखर येळीकर, अॅड. रेवणसिद्ध पाटील, चनबसप्पा नाडगौडा, प्रभुराज मैंदर्गीकर, विलास कारभारी, समन्वयक संतोष पाटील, मुख्याध्यापिका संगीता गोटे, पर्यवेक्षिका सुनिता वाले यांनी अभिनंदन केले.

**विविध वयोगट व वजनी गट कामगिरी** : १४ वर्षाखालील : २२ किलो : संचेतना हिरेमठ, प्रसिद्धी स्वामी (दोघी रौप्य), २४ किलो : भूमिका बिजली (कांस्य), २६ किलो : हर्षदा ढवळशंक (रौप्य), शांभवी जेवरे (कास्य). ३८ किलो : वीरा गोगावकर (कास्य). ५० किलो : चिरंतन पुकाळे (रौप्य). १७ वर्षाखालील : ४० किलो : मानस्वी जवळे (कास्य), ४४ किलो : संस्कृती सातपुते (कांस्य), ५० किलो : स्नेहा इंगळे (कास्य). ५४ किलो : अनुष्का माळवदे (रौप्य), स्नेहा चव्हाण (कास्य). ६० किलो : तनवी अंबुरे (सुवर्ण), तेजश्री दर्गोपाटील (कास्य), ६४ किलो : जिकरा शेख (कास्य).



## ज्ञानेश्वर भोई सोलापूर विद्यापीठ क्रिकेट संघाचा कर्णधार

### अखिल भारतीय कुलगुरू चषक क्रिकेट स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ नोव्हेंबर-**

अखिल भारतीय कुलगुरू चषक क्रिकेट टी-ट्वेंटी स्पर्धेसाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ अधिकारी व कर्मचाऱ्यांचा संघाच्या कर्णधारपदी ज्ञानेश्वर भोई व उपकर्णधारपदी अनिल संभारम यांची निवड झाली. हिसार, हरियाणा येथे ५ ते १५ नोव्हेंबर दरम्यान होणाऱ्या या स्पर्धेसाठी विद्यापरीठाचा संघ सोमवारी रवाना झाला.

संघास कुलगुरू प्रा. प्रकाश महानवर यांनी संघाला स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर व प्र-कुलगुरू प्रा. डॉ. लक्ष्मीकांत दामा, प्रभारी कुलसचिव तथा क्रीडा विभागाचे संचालक डॉ. अतुल लकडे उपस्थित होते.

विद्यापीठ अधिकारी व कर्मचारी यांच्यात खेळाविषयी गोडी असावी, शारीरिक तंदुरुस्त तसेच चांगली मानसिकता राहण्यासाठी या स्पर्धेचे आयोजन केले जाते. यात सर्व विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी यात सहभागी होतात.

**विद्यापीठाचा संघ असा** : ज्ञानेश्वर भोई (कर्णधार), अनिल संभारम (उपकर्णधार), डॉ. उमराव मेटकरी, सुनील थोरात, मुक्तार शेख, हनुमंत लोखंडे, श्रीशैल देशमुख, म हादेव वलेकर, राजकुमार सले, लक्ष्मण चिक्का, अमोल गायकवाड, विनोद बंडगर आणि अतुल दाईंगडे. गजानन काशीद (प्रशिक्षक) प्रशांत पुजारी (व्यवस्थापक).

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...

### पंढरपूर तालुक्यात 'न्याय आपल्या दारी' उपक्रमांतर्गत फिरते लोकअदालत

**पंढरपूर, दि.३ नोव्हेंबर -**

समाजातील तळागाळातील तसेच सर्वसामान्य नागरिकांना न्याय मिळावा हे उदिदष्ठ ठेवून.सर्वेच्च न्यायालय यांच्या न्याय आपल्या दारी या संकल्पनेतून सुरू केलेल्या फिरते लोक अदालत व कायदेविषयक शिबीराचे आयोजन केले असून, राज्य विधी सेवा प्राधिकरण व जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सोलापूर यांचे आदेशान्वये पंढरपूर तालुक्यात दि. ७ नोव्हें ते ११ नोव्हेंबर या कालावधीत फिरते लोक अदालतची व्हॅन तालुक्यातील निवडक गावांपर्यंत पोहोचणार असल्याची माहिती तालुका विधी सेवा समिती अध्यक्ष तथा जिल्हा न्यायाधीश.ए.एस. सलगर यांनी दिली. या उपक्रमांतर्गत ७ नोव्हेंबर रोजी ग्रामपंचायत भंडीशेगाव, दि. १० नोव्हेंबर रोजी ग्रामपंचायत सोनके व दि. ११ नोव्हेंबर रोजी ग्राम पंचायत करकंब येथे फिरते लोक अदालतची व्हॅन जाणार आहे. तरी सबधित ग्रामपंचायत तसेच त्याअंतर्गत येणा-या गावातील जास्तीत जास्त नागरिकांनी याचा लाभ घ्यावा व तडजोड योग्य प्रकरणे आपसात मिटवावीत, असे आवाहन तालुका विधी सेवा समिती अध्यक्ष तथा जिल्हा न्यायाधीश सलगर यांनी केलेले आहे.

### विज्ञान केंद्र भेटसाठी झेडपीकडून दोन लाख रूपयांची तरतूद

**सोलापूर, दि.३ नोव्हेंबर -**

ग्रामीण भागातील इयत्ता पाचवी ते आठवीच्या जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना विज्ञान प्रदर्शन व केंद्रास भेटसाठी जिल्हा परिषद मधून दोन लाख तरतुद करण्यात आली आहे. विज्ञान केंद्रास भेट देणारे विद्यार्थी हे ग्रामीण भागातील आहेत . त्यांना प्रयोगाची प्रात्यक्षिके करुन पाहण्यास आवश्यक असणारे साहित्य खरेदीस पुरेसा निधी शाळा स्तरावर उपलब्ध होवू शकत नाही. तसेच विद्यार्थांमध्ये विज्ञानाविषयी गोडी निर्माण होण्याच्या उद्देशाने जिल्हा परिषदेच्या वतीने विज्ञान केंद्रास विद्यार्थांच्या प्रत्यक्ष भेटी हा उपक्रम राबविण्यात येतो. त्यास हातभार म्हणून फी कमी करून प्रती विद्यार्थी ८५ रूपये प्रमाणे सवलतीच्या दरात विद्यार्थ्यांना विज्ञान सेंटर मध्ये प्रवेश उपलब्ध करुन देण्यात यावा. यामुळे जास्तीत जास्त विद्यार्थांना याचा लाभ होईल. विज्ञान केंद्राने विद्यार्थ्यांना विज्ञानाची माहीती उपलब्ध करून देण्याचे आवाहन प्राथमिक शिक्षण विभागाने केली आहे.

### सांगोला येथील सोहम जाधव यांचे सी.ए. परीक्षेत यश

**सांगोला, दि.३ नोव्हेंबर -**



सांगोला न.पा.चे माजी नगराध्यक्ष कै. गोविंद जाधव यांचे नातू सोहम भगवान जाधव हे इन्स्टिटयूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडियाने सप्टेंबर २०२५ मध्ये घेतलेल्या चार्टर्ड अकाऊंटट अंतिम परिक्षेत उत्तीर्ण झाले असून त्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. सोहम जाधव यांचे इ.५ ते १० वी पर्यंतचे शिक्षण न्यु इंग्लिश स्कूल सांगोला, इ.११ व १२ वी पर्यंतचे शिक्षण विद्यामंदिर प्रशाला ज्यू.कॉलेज सांगोला येथे तर पदवीचे शिक्षण गरवारे कॉलेज ऑफ कॉमर्स पुणे येथे पुर्ण झाले. वरिष्ठांच्या मार्गदर्शनानुसार जिद्द मेहनत व योग्य नियोजनातून हे यश आपणास मिळाले असल्याचे सोहम जाधव यांनी सांगितले. या यशाबद्दल त्यांचे सर्वच क्षेत्रातून अभिनंदन होत आहे.



### राष्ट्रवादीच्या तालुकाध्यक्षपदी अतुल चव्हाण; प्रदेशाध्यक्ष फाटे यांच्या हस्ते केला सत्कार

**पंढरपूर, दि.३ नोव्हेंबर -**

राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) काँग्रेसच्या पंढरपूर तालुकाध्यक्षपदी निवड झालेल्या अतुल चव्हाण यांचा व्यापार व उद्योग सेलचे प्रदेशाध्यक्ष नागेश फाटे यांच्या हस्ते नुकताच सत्कार करण्यात आला. यावेळी श्री.फाटे यांनी श्री.चव्हाण यांच्या कार्याची प्रशंसा केली आणि त्यांना पक्षात अधिक सक्रियपणे काम करण्याची प्रेरणा दिली. त्यांच्या कामाचा पक्षाला नक्कीच फायदा होईल. त्यांनी जबाबदारी यशस्वीपणे सांभाळावी. असे नागेश फाटे म्हणाले. या सत्कार समारंभासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे माजी तालुका अध्यक्ष अनिताताई पवार, उद्योग व व्यापार विभागाच्या तालुका अध्यक्ष सावली बंगाळे गायकवाड, उद्योजक नवनाथ बचूटे, दुरुगकर केटरर्सचे मालक गणेश दुरुगकर, डॉ. रमेश फाटे, निवृत्ती पाटील, संग्राम कापसे उपस्थित होते.

# जिल्ह्यातील न.प, जि.प. व पं.स.वर भाजपचा झेंडा फडकणार

### जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.३ नोव्हेंबर -**



आगामी होऊ घातलेल्या निवडणुकीत जिल्ह्यातील सर्व नगरपालिका, पंचायत समित्या आणि जिल्हा परिषदेवर भाजपचा झेंडा फडकणार असल्याचा विश्वास भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांनी व्यक्त केला आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली आगामी निवडणुकीमध्ये भाजपचा झेंडा फडकवण्यासाठी भाजपचे कार्यकर्ते जोमाने कामाला लागले आहेत. जिल्ह्यातील सर्वच न.प, पं.स. आणि जि.प. वर भाजपचा झेंडा फडकावा हाच आमचा अजेंडा आहे, असे चेतनसिंह केदार सावंत यांनी स्पष्ट केले आहे.

चेतनसिंह केदार सावंत यांनी सोलापूर ग्रामीण पश्चिम जिल्ह्यात इच्छुक उमेदवार, कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांसोबत बैठक पार पडली. या बैठकीत पक्ष संघटन अधिक मजबूत करण्याबरोबरच आगामी स्थानिक स्वराज्य निवडणुकांच्या तयारी संदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली. स्थानिक स्तरावर पक्षाचे कार्य अधिक प्रभावीपणे राबवण्यासाठी मंडळांतील पदाधिकाऱ्यांशी संवाद साधून आगामी कार्ययोजना निश्चित करण्यात आली.

बैठकीदरम्यान जनतेच्या अपेक्षा, स्थानिक विकासाच्या संधी आणि सामाजिक बांधिलकी या तीनही विषयांवर सखोल विचारमंथन झाले. प्रत्येक कार्यकर्ता हा पक्षाचा मजबूत स्तंभ असल्याचे अधोरेखित करत, जनतेपर्यंत शासनाच्या योजनांचा लाभ पोहोचवणे आणि विकासाची गती वाढवणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. एकजुटीने, नियोजनबद्ध आणि जबाबदारीपूर्ण कार्यपद्धतीद्वारे आगामी स्थानिक स्वराज्य निवडणुकांमध्ये भारतीय जनता पार्टी आणि मित्रपक्ष यांचा भक्कम विजय होईल हा विश्वास चेतनसिंह केदार सावंत यांनी कार्यकर्त्यांना दिला.

> आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि नगरपालिका निवडणुकांमध्ये भाजपचा झेंडा फडकवायचा आहे. नवे-जुने कार्यकर्ते जोडून नवीन नेतृत्व उभे करायचे आहे. या निवडणुका कार्यकर्त्यांच्या आहेत. त्यामुळे त्यांना न्याय दिला जाईल. गेली अनेक वर्षे मतदारांनी ठेवलेला विश्वास सार्थ ठरवण्यासाठी सर्वांनी एकत्र काम करावे. भाजपला यश मिळवून देण्यासाठी कार्यकर्त्यांनी मतभेद विसरून एकदिलाने काम करावे.
> **- चेतनसिंह केदार सावंत, जिल्हाध्यक्ष, भाजपा**

# हातचलाखीने एटीएम कार्ड बदलून दोघांची ५९ हजारांची फसवणूक

**कुर्डुवाडी, दि.३ नोव्हेंबर-**

मशीन मध्ये अडकलेले एटीएम कार्ड काढून देतो तसेच पैसे काढून देतो म्हणून शिक्षकासह आणखी एका जणाची फसवणूक करुन अज्ञाताने दोघांची मिळून एकूण ५९ हजारांची फसवणूक केल्याची घटना दि. १७ आक्टोबर रोजी ते २५ आक्टोबर दरम्यान कुर्डुवाडी येथे घडली. याबाबत भैरु जनार्दन फरड (रा.पडसाळी ता.माढा) यांनी कुर्डुवाडी पोलिसांत फिर्याद दाखल केली आहे.

याबाबत पलिसांनी दिलेली माहिती अशी की फिर्यादी हे दिवाळी खरेदीकरीता पैसे काढण्यासाठी दि.१७ आक्टोबर रोजी दु.१२.३५ वा.सुमारास ते दि. २५ आक्टोबर दु.४.०९ वा.सुमारास कुर्डुवाडी बसस्थानकाच्या पाठीमागे असलेल्या एटीएम मध्ये पैसे काढण्याकरिता गेले होते.त्यावेळी लगेच एक अनोळखी इसम देखील तिथे आला. त्यावेळी फिर्यादी चे एटीएम कार्ड मशीन मध्ये अडकले असता त्याने मी काढून देतो असे सांगून त्याने ते एटीएम कार्ड काढले पण हातचलाखीने ते एटीएम बदलून फिर्यादीला दुसरेच एटीएम कार्ड दिले.फिर्यादीने न पाहाताच ते एटीएम कार्ड खिशात टाकले.त्यानंतर फिर्यादी हे कृषीदुकानात साहित्य खरेदीकरीता गेले असता तिथे त्यांना १२.३५ च्या दरम्याने बँकेला लिंक असलेल्या मोबाइलवर चारवेळा १० हजार रुपये व दोनवेळा ५ हजार रुपये काढल्याचा मेसेज आला.त्यावेळी त्यांनी खिशातील एटीएमकार्ड पाहिले असता सदर एटीएम कार्ड हे दुसरेच शंकर बबन पवार यांच्या नावाचे दिसले.त्यानंतर फिर्यादीने त्यांचे खाते असलेल्या बँक ऑफ इंडिया लऊळ शाखेत जाऊन ते एटीएमकार्ड बंद केले. तसेच फिर्यादीच्या ओळखीचे बंडू दत्तात्रय जाधव रा.उजनी ता.माढा यांचे देखील त्याच एटीएम मध्ये त्याच दिवशी एका अनोळखी इसमाने तुम्हाला पैसे काढून देतो म्हणून एटीएम कार्ड घेतले होते.पण पैसे निघाले नाहीत. मात्र कार्ड बदलून जयश्री आर रुपनवर यांचे नावाचे दुसरेच कार्ड दिले. त्यानंतर दि.२५ आक्टोबर रोजी ६ हजार रुपये काढल्याचा मेसेज आला. अज्ञात इसमाने एटीएम पीन ची माहिती घेऊन वरील दोघांचे एटीएमकार्ड हातचलाखीने बदलून दोघांचे मिळून सुमारे ५९ हजार परस्पर काढून फसवणूक केल्याबद्दल दि.३० रोजी अज्ञात इसमावर कुर्डुवाडी पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे.



# 'भैरवनाथ'चे चेअरमन अनिल सावंत यांनी केले उपमुख्यमंत्री शिंदेंचे स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.३ नोव्हेंबर -**

भैरवनाथ शुगर उद्योगाचे चेअरमन अनिलदादा सावंत यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे स्वागत केले. यावेळी पंढरपूर आणि मंगळवेढा येथील स्थानिक प्रश्ना संदर्भात देखील उपमुख्यमंत्र्यांशी त्यांनी चर्चा केली. कार्तिकी यात्रे निमित्त येथील विठ्ठल रुक्मिणीची शासकीय महापुजा करण्यासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे नुकतेच पंढरपूर येथे आलेले होते.

यावेळी भैरवनाथ शुगर उद्योग समूहाचे चेअरमन अनिलदादा सावंत यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे सावंत यांच्या निवासस्थानी स्वागत केले. यावेळेस महाराष्ट्र राज्याचे माजी आरोग्य मंत्री डॉक्टर तानाजीराव सावंत तसेच रोजगार व हमी योजना कॅबिनेट मंत्री भरत शेठ गोगावले, भाजपाचे आमदार गोपीचंद पडळकर तसेच माढा तालुक्याचे आमदार अभिजीत आबा पाटील व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# नान्नज ग्रामदैवत माहूरची आई देवीची गुरुवारी यात्रा

**तभा वृत्तसेवा,**
**उत्तर सोलापूर, दि. ३ नोव्हेंबर-**

सालाबादप्रमाणे याही वर्षी नान्नज (ता. उत्तर सोलापूर) येथील ग्रामदैवत माहूरचीआई देवी (रेणुका देवी) यात्रा गुरुवार ६ नोव्हेंबर रोजी होणार आहे. यात्रेनिमित्त गावात कुस्त्यांचे मोठे मैदान भरविण्यात येणार असल्याची माहिती यात्रा पंचकमिटी, ग्रामपंचायत, ग्रामस्थांच्यावतीने देण्यात आली आहे.



ग्रामदैवत माहूरचीआई देवीची यात्रा कार्तिक महिन्यातील त्रिपुरारी पौर्णिमेनंतर दुसऱ्या दिवशी भरते. बुधवार ५ नोव्हेंबर, म्हणजे पौर्णिमेच्या दिवशी सायंकाळी सहा ते रात्री दहापर्यंत गावातील माळीगल्ली नंदाईदेवी मंदिरापासून माहूरचीआई देवीची पालखी व काठ्यांची गावात प्रमुख मार्गावरून नगरप्रदक्षिणा होते. यात्रेदिवशी गुरुवारी सकाळी दहा वाजता नंदाईदेवी मंदिरापासून पालखी, नंदिकोल (काठ्या) मिरवणूक ग्रामदैवत माहूरचीआई मंदिराकडे प्रस्थान होणार आहे. दुपारी २ वाजता माहूरची आई देवी मंदिराला प्रदक्षिणा, तर ५ वाजता मंदिरापासून नान्नज गावाकडे काठ्या व पालखीचे प्रस्थान होत नगरप्रदक्षिणा करत रात्री १० वाजता नंदाईदेवी मंदिराजवळ पालखी मिरवणूक विसर्जन होणार आहे. ग्रामदैवत माहूरची आई यात्रेनिमित्त शुक्रवार ७ नोव्हेंबर रोजी जी.बी. घोडके विद्यालयाच्या मैदानात सकाळी ११ पासून कुस्ती पटूंची नेमणूक होणार असून दुपारी चार वाजता छत्रपती कुस्ती संघाच्यावतीने कुस्त्यांचे मैदान सुरू होणार आहेत. तरी पंचक्रोशीतील भाविकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन यात्रा पंचकमिटी, ग्रामपंचायत वतीने करण्यात आले आहे.

# कर्मयोगीच्या 'आविष्कार'मध्ये समाजोपयोगी प्रकल्पांचे सादरीकरण

### आविष्कार सारख्या स्पर्धेतून विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला चालना : डॉ. एस. पी. पाटील.

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.३ नोव्हेंबर -**



विद्यार्थ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून समाजातील सामान्य घटकाचे जीवन सुलभ व सुकर होईल असे समाजोपयोगी प्रकल्प साकारावेत असे प्रतिपादन कर्मयोगी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे प्राचार्य डॉ. एस. पी. पाटील यांनी केले. शनिवार दि. १ नोव्हेंबर २०२५ रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकर टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटी तर्फे आयोजित केलेल्या कर्मयोगी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, पंढरपूर येथे महाविद्यालय स्तरावरील आविष्कार या प्रकल्प स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

या स्पर्धेमध्ये महाविद्यालयातील जवळपास शंभरहून अधिक विद्यार्थ्यांनी आपला उस्फूर्त सहभाग नोंदविला. त्यामध्ये एकूण स्पर्धकांपैकी बारा स्पर्धकांची विद्यापीठाच्या विभाग स्तरावरील होणाऱ्या स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे अशी माहिती आविष्कारचे महाविद्यालयाचे संयोजक डॉ. अभय उत्पात यांनी दिली. या स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यानी ह्युम्यानिटी लँगवेज फाईन आर्ट्स, कॉमर्स मॅनेजमेंट लॉं, इंजिनियरिंग अँड टेक्नॉलॉजी, मेडिकल अँड फार्मसी, प्युअर सायन्स, अॅग्रिकल्चर ॲनिमल हसबंड्रि आदि विभागामध्ये विविध प्रकल्प सादर केले. सदर स्पर्धेमध्ये प्रा. अनिल बाबर, प्रा. राहुल पांचाळ, प्रा. डॉ एस. व्ही. एकलारकर, प्रा. दीपक भोसले, डॉ एस. एम. लंबे, प्रा.अभिनंदन देशमाने यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. श्री पांडुरंग प्रतिष्ठान चे विश्वस्त रोहन परिचारक, प्राचार्य डॉ एस पी पाटील, कर्मयोगी पॉलीटेक्निक चे प्राचार्य डॉ. ए. बी. कणसे, रजिस्ट्रार जी. डी. वाळके, उपप्राचार्य प्रा. जगदीश मुडेगावकर, संशोधन अधिष्ठाता डॉ. अभय उत्पात, शैक्षणिक अधिष्ठाता प्रा. राहुल पांचाळ तसेच विभागप्रमुख डॉ. एस. एम. लंबे, प्रा. डॉ. एस. व्ही. एकलारकर, प्रा. अनिल बाबर, प्रा. दीपक भोसले व सर्व प्राध्यापक यांनी विजेत्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी सह संयोजक प्रा.एस एम शिंदे, प्रा.दीप्ती कुलकर्णी, प्रा. अमरजीत देवकर, प्रा.के एस देशपांडे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# श्रीमत् भागवत कथा सप्ताहाने गोपाळपूर परिसर झाला भक्तिमय

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.३ नोव्हेंबर -**





सद्गुरू जगन्नाथ बाबा भक्तगण मठ, श्री क्षेत्र गोपाळपूर येथे कार्तिक वारी निमित्ताने आयोजित संगीतमय श्रीमत् भागवत सप्ताह सोहळ्याची सुरुवात कार्तिक शुद्ध सप्तमी, बुधवार दि.२९ ऑक्टोबर २०२५ रोजी घटस्थापनेने झाली. हा कार्यक्रम कार्तिक शुद्ध पौर्णिमा (पंधरावी) , बुधवार दि.५ नोव्हेंबर २०२५ पर्यंत भक्तिभावाने पार पडणार असून संपूर्ण परिसरात अध्यात्म, नामस्मरण आणि भजनरंग भरून राहिला आहे.

या भागवत सप्ताहाचे भागवतकार, प्रवचनकार व कीर्तनकार ह.भ.प. सुवर्णाताई पिंपळकर (झिंगुजी वार्ड, भद्रावती, जि.चंद्रपूर) असून त्यांच्या रसाळ व भावस्पर्शी भागवत कथेमुळे भक्तजन मंत्रमुग्ध होत आहेत. दररोज दुपारी २ ते ५ या वेळेत कथा पार पडत असून, श्रोते मोठ्या भक्तिभावाने उपस्थित राहून धर्मश्रवणाचा आनंद घेत आहेत. सप्ताहात साथसंगत हार्मोनियम ह.भ.प.विलास डाखरे महाराज, गायक ह.भ.प.प्रकाश पिंपळकर महाराज, तबला वादक ह.भ.प.रोहीत चौधरी महाराज, ढोलक वादक ह.भ.प. आदित्य पिंपळकर महाराज तसेच टाळ वादक ह.भ.प. गजानन कींनाके महाराज व संच वादनाची सेवा बजावत आहेत.

दररोज पहाटे ५ ते सकाळी ६.३० या वेळेत काकडा भजन, तर सायंकाळी ६ ते ७ या वेळेत हरीपाठ ह.भ.प. धनराज नागापूरे महाराज (मुरखेडा) व त्यांच्या संचाच्या सुमधुर गायनातून सादर केला जात आहे. रात्री ८ वाजता हरीकिर्तन कार्यक्रमही भाविकांसाठी आयोजित करण्यात आला आहे.

कार्यक्रमाचा समारोप बुधवार, दि. ५ नोव्हेंबर २०२५ रोजी हभप सुवर्णाताई पिंपळकर यांच्या सुमधुर वाणीतून काल्याच्या कीर्तनाने होणार असून त्यानंतर घुगरी काला व महाप्रसाद आयोजित करण्यात आला आहे. या सर्व कार्यक्रमांना परिसरातील भाविक, महिला मंडळी, तसेच दूरदूरवरून आलेले श्रद्धावान मोठ्या संख्येने उपस्थित राहत आहेत. सद्गुरू जगन्नाथ बाबा भक्तगण मठाच्या या धार्मिक उपक्रमामुळे गोपाळपूर परिसरात अध्यात्म, सेवा व भक्तीचा सुगंध दरवळत आहे. आयोजक मंडळाने सर्व भाविकांना दर्शन, नामस्मरण, कथाश्रवण व महाप्रसादाचा लाभ घेण्याचे आवाहन सद्गुरू जगन्नाथ बाबा भक्तगण मठाच्या आयोजक मंडळींनी केले आहे.

# माजी नगरसेवक कल्याणशेट्टींच्या 'त्या' डिजिटलने वेधले लक्ष

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ३ नोव्हेबर-**






अक्कलकोट नगरीचे माजी नगरसेवक तथा भाजपाचे युवा नेते मिलन कल्याणशेट्टी यांच्या वाढदिवसानिमित्त लावण्यात आलेल्या डिजिटल बॅनरने सर्वांचे लक्ष वेधले आहे. लोकांच्या मनातील नगराध्यक्ष ही त्यांची छबी निर्माण झाली आहे. अक्कलकोट शहरात सर्वत्र फिक्स नगराध्यक्षचे बॅनर झळकल्याने या बॅनरची जोरदार चर्चा सुरू आहे. समर्थकांच्या या मागणीला लोकांचा मोठा पाठिंबा मिळत आहे.

माजी नगरसेवक कल्याणशेट्टी यांचा नुकताच वाढदिवस साजरा करण्यात आला. त्यांना शुभेच्छा देण्यासाठी उसळलेला जनसागर त्यांची वाढती लोकप्रियता जनतेमधील त्यांचे मोठे आदराचे स्थान याची झलक पहावयास मिळली. मिलन कल्याणशेट्टी यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या मित्र परिवाराकडून समर्थकांकडून नागरिकांच्यावतीने तसेच भाजपा पदाधिकारी व कार्यकर्त्यांकडून डिजिटल फलक लावण्यात आले. अक्कलकोट शहरातील सर्वच प्रमुख चौकात मिलन दादा फिक्स नगराध्यक्षचे बॅनर झळकले आहेत. माजी नगरसेवक कल्याणशेट्टी यांना मानणारा युवावर्ग मोठा आहे. आगामी नगरपरिषद निवडणुकीत अक्कलकोट नगरीचे भाजपाचे नगराध्यक्ष पदाचे मिलन कल्याणशेट्टी प्रबळ दावेदार आहेत. मिलन कल्याणशेट्टी नगराध्यक्ष व्हावेत अशी इच्छा डिजीटल फलकाद्वारे मोठ्या प्रमाणात व्यक्त होत आहे. कल्याणशेट्टी यांनी वाढविलेला जनसंपर्क, युवा वर्गात असणारी त्यांची लोकप्रियता, आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी केलेली विकास कामे, सर्वसामान्य कार्यकर्त्यांशी असणारा जिव्हाळ्याचा संपर्क या बळावर मिलन कल्याणशेट्टी हे अक्कलकोट नगरीचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार म्हणून आघाडीवर आहेत. मिलन कल्याणशेट्टी यांच्या वाढदिवसा निमित्त शुभेच्छा देण्यासाठी जमलेला जनसागर विरोधी पक्ष पुरता गार झाला आहे त्यांच्या सत्कारासाठी भाजपा पक्ष कार्यालयात पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते आणि नागरिकांनी प्रचंड तोबा गर्दी केली होती.

मिलन कल्याणशेट्टी यांच्या वाढदिवसानिमित्त सत्कार सोहळ्यात युवा वर्गासह भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यात उत्साह दिसत होता. मिलन कल्याणशेट्टी यांच्या वाढदिवसानिमित्त अक्कलकोट शहरात सर्वत्र फिक्स नगराध्यक्ष म्हणून डिजिटल बॅनर द्वारे नागरिकांचे लक्ष वेधण्यात आले. मिलन कल्याणशेट्टी यांच्या फिक्स नगराध्यक्ष बॅनरची चर्चा मात्र राजकीय वर्तुळात रंगली आहे. सध्या तरी भाजपात नगराध्यक्ष पदाचे उमेदवार म्हणून मिलन कल्याणशेट्टी यांचे नाव आघाडीवर असल्याचे दिसत आहेत.

## महत्वाचे...



### ब्रह्मोत्सवात श्री व्यंकटेश्वर भगवंतास चक्रस्नानम अन् पुष्प यागाम होमहवन

**सोलापूर, दि.३ नोव्हेंबर**

दाजीपेठेतील श्री वेंकटेश्वर मंदिरात श्री वेंकटेश्वर भगवंताच्या उत्सव मूर्तीस आज ५३ वे ब्रम्होस्त्वात चक्रस्नानम् अभिषेक आणि सूर्यप्रभा वाहन पालखी सेवा हा धार्मिक विधी संपन्न करण्यात आले. तर सायंकाळी पुष्प यागाम होमहवन महापूर्णाहुती व वसंतोत्सवम कार्यक्रमाने सांगता समाप्ती झाली. गेल्या सहा दिवसापासून चाललेल्या या धार्मिक विधीची सांगता होत असल्याने भाविकांमधून भगवंताच्या चरणी नतमस्तक होत कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. दरम्यान, विश्वकल्याणासाठी भगवंताचा हा ब्रह्मोत्सव दक्षिणात्य धार्मिक परंपरेनुसार विधिवत मोठ्या उत्साहात संपन्न झाला. मंदिरात सकाळी ब्रम्ह मुहूर्तावर श्रींच्या उत्सव मूर्तीस चक्रस्नानम् हा धार्मिक विधी संपन्न करण्यात आला. त्यानंतर मंदिरात भाविकांची श्रीच्या दर्शनासाठी गर्दी झाली. यावेळी मंदिराचे सारे वातावरण प्रकाशमय आणि चैतन्यमय बनले होते.



### जिल्हा परिषद कर्मचारी पतसंस्थेकडून विम्याचे दोन लाख रूपये धनादेश वितरण

**सोलापूर, दि.३ नोव्हेंबर**

जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतसंस्था क्रमांक एक कडून सभासदांसाठी राबविण्यात येणाऱ्या विमा योजनेअंतर्गत मयत कनिष्ठ सहाय्यक अनिल विठोबा धुळम यांच्या पत्नी अनुराधा धुळम यांना दोन लाख रुपायाचा धनादेश जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप यांच्या हस्ते देण्यात आला. यावेळी व्हाईस चेअरमन श्रीधर कलशेट्टी, संचालक डॉ. एस पी माने, तज्ञ संचालक श्रीशैल देशमुख, चेअरमन श्वेता राऊत, संचालक सुरेश कुंभार, एस. आर. तांबोळी, व्ही. बी. पाटील. व्ही एम घेरडे, जी. एम. मारडकर, के. जी लालबोन्द्रे, व्ही. के शिंदे, विशाल घोगरे, चेतन वाघमारे, शिवाजी राठोड, तजमूल मुतवल्ली, एम. एस. शिंदे, रोहित घुले, शिवानंद म्हमाणे, डॉ. पी. बी नवले उपस्थित होते.



### 'अन्नछत्र'तर्फे प्रकाश महाजन यांचा सत्कार

**अक्कलकोट, दि.३ नोव्हेंबर**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली धार्मिकतेबरोबरच सामाजिक बांधिलकी जपणारे न्यास असल्याचे मनोगत मनसे माजी प्रदेश प्रवक्ता नेते प्रकाश महाजन यांनी व्यक्त केले. ते श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ येथे सहपरिवार आले असता न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र, श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी ते बोलत होते. यावेळी निखील पाटील, प्रवीण घाटगे, गोटू माने, एस.के.स्वामी, सिद्धाराम कल्याणी, शहाजीबापू यादव, सतीश म हिंद्रकर, दत्ता माने, लक्ष्मण बिराजदार, श्रीनिवास गवंडी, राजू पवार, रमेश हेगडे, तानाजी पाटील, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, अनिल बिराजदार, महांतेश स्वामी, समर्थ घाडगे, विठ्ठल रेड्डी उपस्थित होते.

### रोटरी जिल्हा सहाय्यक प्रांतपालपदी महेश साळुंके

**सोलापूर, दि. ३ नोव्हेंबर-**



रोटरी क्लब ऑफ सोलापूर स्मार्ट सिटीचे म ाजी अध्यक्ष महेश साळुंके यांची रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२ च्या सहाय्यक प्रांतपाल पदासाठी वर्ष २०२६-२७ साठी निवड करण्यात आली आहे. साळुंके यांनी अध्यक्षपदाच्या कार्यकाळात अनेक समाजोपयोगी प्रकल्प, आरोग्य व शिक्षण उपक्रम, तसेच सार्वजनिक प्रतिमा वाढविणारे कार्यक्रम राबवून क्लबला विशेष गती दिली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली क्लबने एकात्मता, सेवा आणि समाजभावनेचा उत्कृष्ट आदर्श निर्माण केला. सध्या ते रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२ चे डायरेक्टर-क्लब बुलेटिन म्हणून कार्यरत असून, त्यांच्या कार्यकुशलतेची आणि नेतृत्वगुणांची दखल घेऊन प्रांतपाल वर्ष २०२६-२७ जयेश पटेल यांनी त्यांच्यावर सहाय्यक प्रांतपालपदाची जबाबदारी सोपवली आहे. या निवडीबद्दल विविध रोटरी क्लब्स, रोटेरियन सदस्य तसेच सोलापूरकर समाजातून महेश साळुंके यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.



# भाजपच्या नवीन इनकमिंगला बाळे-केगावच्या निष्ठावंतांचा विरोध

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ नोव्हेंबर-**

शहर भाजपमध्ये नव्याने प्रवेश देण्यात आलेल्या इतर पक्षीय नेते-पदाधिकाऱ्यांना बाळे, केगाव परिसरातील (प्रभाग क्रमाक ५ मधील) भाजपाचे निष्ठावंत पदाधिकारी-कार्यकर्त्यांनी तीव्र विरोध करीत आपल्या मागण्यांचे एक निवेदन शहर भाजपा अध्यक्ष रोहिणी तडवळकर यांना दिले.

प्रभाग क्रमांक पाच मधील माजी नगरसेवक व भारतीय जनता पार्टीचे निष्ठावंत पदाधिकाऱ्यांनी आपला मोर्चा थेट भाजपा कार्यालयाकडे वळून आपल्या भावना शहराध्यक्ष रोहिणी तळवळकर यांची भेट घेऊन मांडल्या आणि एक निवेदन दिले. या निवेदनात नमूद केले आहे की, बाळे आणि केगाव परिसर १९९२-९३ साली हद्दवाढ शहरामध्ये समाविष्ट करण्यात आला असून, त्यावेळी भारतीय जनता पार्टी पक्षाची ताकत नगण्य असताना २००७ साली महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत भारतीय जनता पार्टी उमेदवारास ९५ मते मिळाली होती. अत्यंत प्रतिकुल परिस्थितीत पक्ष संघटना वाढीस काम करत आज बाळे व परिसर भाजपाचा बालेकिल्ला झाला आहे. गेली तीन लोकसभा व विधानसभा निवडणुकीत सातत्याने भाजपास लीड देण्याचे काम या भागातील मतदारांनी केले असून, आज भाजपा बाळे व परिसरात नंबर १ चा पक्ष असून, अनेक कायेकर्ते व पदाधिकारांना काम करीत असताना येथील प्रस्थापित काँगेस व राष्ट्रवादी काँगेस शिवसेना (उबाठा) या लोकाकडुन भाजप पदाधिकाऱ्यांना त्रास दिला. खोटया केसेस मध्ये गुंतवण्याचे काम केले.

आता शहर भाजपात त्याच लोकांना पक्ष प्रवेश दिला, हे खेदजनक आहे. भाजपा कार्यकर्त्यांचा अपमान आहे. कारण की, जे लोक गेल्या विधानसभा निवडणुकीत पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांबद्दल अपशब्द बोलले; त्याच लोकांना आज पक्षात प्रवेश दिला आहे. यामुळे भाजपा कार्यकर्ता खचून गेला असून, आम च्या भावनांचा विचार करून आम्हाला न्याय मिळावा हीच अपेक्षा. यावेळी अनेक भाजपा कार्यकर्ते-पदाधिकारी उपस्थित होते.



कार्तिकी यात्रेत चंद्रभागा नदीपात्रात बुडणाऱ्या

# दोन भाविकांचा जीव आपत्ती व्यवस्थापन महिला पथकाने वाचवला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ नोव्हेंबर-**

कार्तिकी यात्रेदरम्यान चंद्रभागा नदीपात्रात अंघोळ करत असताना बुडणाऱ्या दोन पुरुष भाविकांचा जीव सोमवारी सकाळी आपत्ती व्यवस्थापन महिला बचाव पथकाच्या सतर्कतेमुळे वाचवण्यात यश आले.

शुभम कोपरशुराम बसवंत अड्डासुरे व रामकृष्ण सिद्धप्पा कुराडे (दोघे रा. कर्नाटक) या दोघांना नदीपात्रातून सुरक्षित बाहेर काढण्यात आपदा सखी, उर्मिला पवार, अरुणा राठोड, दुर्गादेवी बनसोडे, शुभांगी गवते, रेखा राठोड यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यांना गुरुनाथ कोरे आणि माऊली अंकुशराव यांचेही मोलाचे सहाय्य लाभले. या तात्काळ आणि समन्वयपूर्ण कृतीमुळे संभाव्य दुर्घटना टळली असून, भाविकांच्या जीवितास मोठा दिलासा मिळाला आहे. कार्तिकी यात्रेच्या पार्श्वभूमीवर आपत्ती व्यवस्थापन पथकाची ही तत्परता आणि सेवा कौतुकास पात्र ठरली आहे. संपूर्ण यात्रा कालावधीत आपत्ती व्यवस्थापन बचाव पथकाने एकूण १३ भाविकांचा जीव नदीपात्रात बुडत असताना वाचवलेला आहे.



# बाजार समितीच्या निवडणुकीसाठी पहिल्या दिवशी २ अर्ज दाखल

**बार्शी, दि. ३ नोव्हेंबर-**

कृषी उत्पन्न बाजार समिती बार्शी संचालक मंडळ निवडणुकीसाठी अर्ज भरण्याच्या पहिल्या दिवशी ६२ अर्ज विक्री झाले असून एकाच व्यक्तीने दोन अर्ज दाखल केली असल्याची माहिती बाजार समितीच्या निवडणूकीचे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी अनिस सय्यद यांनी दिली.

कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीसाठी आज अर्ज भरण्याच्या पहिल्या दिवशी सर्वसाधारण सहकारी संस्था मतदारसंघातून सूर्यकांत शिवाजी गुंड व सुरेश उर्फ सूर्यकांत शिवाजी गुंड, रा. लाडोळे यांनी २ अर्ज भरले आहेत. अर्ज भरतेवेळी त्यांच्याबरोबर कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती रणवीरभैय्या राऊत, अभिजीत कापसे, बार असोसिएशनचे अध्यक्ष रणजीत गुंड, दिनकर गुंड, दत्तप्रसाद पाटील, वाणेवाडीचे चेअरमन रमेश यादव उपस्थित होते. इतर मतदारसंघातून पहिल्या दिवशी एकही अर्ज दाखल झाला नाही. अर्ज भरण्याची शेवट तारीख ७ नोव्हेंबर असल्याची माहिती सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी अनिस सय्यद यांनी दिली.

## आज 'एक वही, एक पेन' उपक्रम

**सोलापूर, दि. ३ नोव्हेंबर-**



सोलापूर पोलिस दलात ४० वर्षे विविध पदांवर कार्यरत राहून उल्लेखनीय सेवा बजावणारे दिवंगत निवृत्त पोलीस निरीक्षक केरू जाधव यांच्या प्रथम स्मृतीदिनानिमित्त 'एक वही, एक पेन' या उपक्रमाचे आयोजन मंगळवार (दि. ४) रोजी सायंकाळी ६ वा. न्यू बुधवार पेठ येथील समता परिवार बुद्ध विहार, समता चौक येथे होईल. याचे आयोजन समता सैनिक दल, समता परिवार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान कृती समिती, बी.आर. मॉर्निंग ग्रुप, रमाई महिला मॉर्निंग ग्रुप तसेच दिवंगत केरू जाधव साहेब मित्र परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे. उपस्थित राहणाऱ्यांनी फुले किंवा हार न आणता 'एक वही आणि एक पेन' घेऊन यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.



# जनता सहकारी बँकेच्यावतीने निनाद कुलकर्णी यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ नोव्हेंबर-**

सोलापूर जनता सहकारी बँक लिमिटेड हेड ऑफीस ऑडिट विभागातील कर्मचारी निनाद कुलकर्णी हे सीए परिक्षेत चांगल्या गुणाने पास झाल्याने त्यांचा सत्कार बँकेचे विद्यमान चेअरमन सुनिल पेंडसे ऑडीट विभागाचे कुलकर्णी तसेच बँकेचे पदाधिकाऱ्यांनी केला. निनाद कुलकर्णी यांचे वडील उदय कुलकर्णी हे जुळे सोलापुरातील लघू उद्योजक असून प्रतिकूल परिस्थितीत सर्व अडीअडचणीं चा सामना करत त्यांचे चिरंजीव निनाद कुलकर्णी सीए परिक्षेत पास झाल्याने संपूर्ण परिवारातील आनंदाचा क्षण म्हणावा लागेल. त्यांना संघाचे जिल्हा कार्यवाह संतोष कुलकर्णी, चेअरमन सुनिल पेंडसे यांचे मार्गदर्शन लाभले.

# अविवाहित तरुणाची छताच्या लोखंडी हुकाला गळफास घेऊन आत्महत्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ नोव्हेंबर-**

अज्ञात कारणावरून एका २८ वर्षीय अविवाहित तरुणाने राहत्या घरात छताच्या लोखंडी हुकाला दोरीच्या साह्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना जुळे सोलापुरातील रत्नमंजिरी नगरात सोमवारी दुपारी अडीच वाजेच्या सुमारास उघडकीस आली.

किरण कामण्णा हक्के (वय २८ वर्ष, रा. रत्नमंजिरी नगर, जुळे सोलापूर) असे गळफास घेतलेल्या तरुणाचे नाव आहे. मयत किरण याचे आई, वडील आणि भावाचे निधन झाल्यामुळे तो घरात एकटाच राहत होता. आज सोमवारी दुपारी जेवायला आला नाही म्हणून मामाने किरण यास फोन केला. फोन उचलत नसल्याचे पाहून ते घरी अडीच वाजेच्या सुमारासआले तेव्हा त्याचा मृतदेह घरातील छताच्या लोखंडी हुकाला दोरीच्या सहाय्याने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला.

दरम्यान विजापूर नाका पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार एस बी फुलारी हे घटनास्थळी पोहोचून इतरांच्या मदतीने दरवाजा उचकटून किरण हक्के याचा मृतदेह बाहेर काढून येथील शासकीय रुग्णालयात सायंकाळी पाच वाजता दाखल केला असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

# फ्रंट मार्जिन, पार्किंगमधील दुकाने महापालिकेकडून जमीनदोस्त

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३ नोव्हेंबर-**

महापालिकेच्यावतीने उत्तर सदर बझार सी. स . नंबर टिपी ३, फायनल प्लॉट ५१/४, घनाते गेलेक्स्सी येथील फ्रंट म र्जिन मधील २ दुकाने व पार्किंग क्षेत्रातील २ दुकाने पाडून टाकण्यात आली.

महानगरपालिका हद्दीमधील अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्याबाबत आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी आदेश दिले होते. या अनुषंगाने सोमवार ३ नोव्हेंबर रोजी उत्तर सदर बझार सी. स . नंबर, टिपी ३, फायनल प्लॉट ५१/४ घनाते गेलेक्स्सी येथील फ्रंट मर्जिन मधील २ दुकाने व पार्किंग क्षेत्रातील २ दुकाने निष्कासित करण्यात आली. ही कारवाई उपसंचालक मनीष भिष्णूरकर, उपअभियंता नीलकंठ मठपती यांच्या मार्गदर्शनाखाली, उपअभियंता तपन डंके, अतिक्रमण विभागाचे सहकार्याने नगर रचना कार्यालयाकडील सहायक अभियंता शकील शेख, कनिष्ठ अभियंता सलमान मणियार, अतिक्रमण विभागाकडील कनिष्ठ अभियंता सहाय्यक सुफियान पठाण व कनिष्ठ अभियंता दीपक कुंभारयांच्या पथकाने पार पाडली. पोलीस बंदोबस्तात ही कारवाई करण्यात आली.

सोलापूर शहरातील मिळकतदारांनी आपले मि ळकतीवर अनधिकृत बांधकाम करू नये अन्यथा ती बांधकामे निष्कासित करण्यात येईल, असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.



उत्तर सदर बझार येथील अनधिकृत चार दुकानांवर फिरवला जेसीबी

# मागील तीन महिन्यात महापालिकेच्या प्रसूतीगृहांमध्ये प्रसूती संख्येत वाढ

- सर्व प्रसूतीगृहांमध्ये अद्ययावत सुविधा उपलब्ध
- महापालिका आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ नोव्हेंबर-**

महापालिकेच्या सर्व प्रसूतीगृहांमध्ये अद्यावत सोयी सुविधा मिळत आहेत. मागील तीन महिन्यात सोलापूर महापालिकेच्या सर्व प्रसूतीगृहांमध्ये प्रसूतीमध्ये वाढ झाली असल्याचे दिसून येते. महानगरपालिकेच्या सर्व प्रसूतीगृहांमध्ये योग्य वैद्यकीय सुविधा, सुरक्षितता आणि स्वच्छता यावर विशेष भर दिला जात आहे, अशी माहिती आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने यांनी दिली.

सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने चालविण्यात येणाऱ्या सर्व प्रसूतीगृहांम धील आरोग्य सेवा अधिक सक्षम व विश्वासार्ह बनल्याने नागरिकांचा कल पुन्हा महानगरपालिकेच्या प्रसूतीगृहांकडे वाढताना दिसत आहे. महापालिकेच्या आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने यांनी सोलापूर शहरातील श्रेयस नर्सिंग होम सील करण्याची



कारवाई केली होती. त्यानंतर महापालिकेच्या आशा वर्कर्स यांनी आपापल्या कार्यक्षेत्रातील महापालिकेच्या प्रसूतीगृहांमध्ये गर्भवतींना दाखल करून घेत आहेत. त्यामुळे मनपाच्या प्रसूतीगृहांमधील रुग्णसंख्या व प्रसूतींची संख्या दोन्हीमध्ये उल्लेखनीय वाढ झाली आहे. माहे ऑगस्ट २०२५ मध्ये आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने यांनी श्रेयस नर्सिंग होम सील केले होते. ऑगस्ट २०२५ मध्ये महापालिकेच्या सर्व प्रसूती ग्रहांमध्ये २३६ प्रसूती झाल्या होत्या. दरम्यान, जुलै २०२५ मध्ये मनपा प्रसूतीगृहांमध्ये १८२ इतक्या प्रसूती झाल्या होत्या. सोलापूर शहरातील महापालिकेचे पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर प्रसूतीगृह, दाराशा प्रसूतीगृह अद्यावत करण्यात आले. या दोन्ही प्रसूतीगृहांमध्ये नॉर्मल आणि सिझरियन प्रसूती केल्या जातात. महापालिकेच्या इतरही सर्व प्रसूतीगृहांमध्ये चांगल्या सोयी सुविधा उपलब्ध आहेत. सोलापूर महापालिकेच्या भावना ऋषी प्रसूतीगृह, जिजामाता प्रसूतीगृह, चाकोते प्रसतीगृह, रामवाडी प्रसूतीगृह यासह इतर प्रसूतीगृहामध्ये गर्भवती रुग्णांची संख्या वाढली आहे. महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार उपायुक्त आशिष लोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य विभागाची यंत्रणा सज्ज आहे.

विशेष म्हणजे महापालिकेच्या प्रसूतीगृहांमध्ये सोयी सुविधांबरोबरच सर्व परिसरात स्वच्छता आहे. सर्व प्रसूतीगृहांम ध्ये स्वच्छता, आवश्यक वैद्यकीय सुविधा, प्रशिक्षित कर्मचारीवर्ग, तसेच २४ तास आरोग्य सेवा उपलब्ध आहेत.अद्ययावत असलेल्या या प्रसूतीगृहांमध्ये आरोग्य सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन महापालिका आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने यांनी केले आहे.

**मागील तीन महिन्यात प्रसूतीमध्ये झालेली वाढ**

दरम्यान, मागील तीन महिन्यांचा विचार करता ऑगस्ट २०२५ मध्ये २३६ प्रसूती, सप्टेंबर २०२५ मध्ये २५४ तर ऑक्टोबर २०२५ मध्ये २७० प्रसूती झाल्या आहेत. एकूण आकडेवारी पाहता महापालिकेच्या विविध प्रसूतीगृहांमध्ये प्रसुतीच्या संख्येत वाढ होत असल्याचे दिसून येते. ही वाढती संख्या सोलापूर महानगरपालिकेच्या प्रसूतीगृहांवरील नागरिकांचा वाढता विश्वास दर्शविते असे महापालिकेच्या आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने यांनी स्पष्ट केले.




### दयानंद महाविद्यालयात सामूहिक वंदे मातरम

**सोलापूर, दि. ३ नोव्हेंबर-**

भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील स्फूर्ती गीत ठरलेले ठरलेल्या वंदे मातरम या राष्ट्रीय गीताच्या निर्मितीला यंदा १५० वर्षे पूर्ण होत आहेत. त्यानिमित्त पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांच्या उपस्थितीत आई प्रतिष्ठानतर्फे दयानंद महाविद्यालयात गुरूवार ६ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता शेकडो विद्यार्थी-विद्यर्थिनीं वंदे मातरमचे सामूहिक गायन करणार आहेत.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 |**RNI No. MAHMAR/2023/86468**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

CMYK

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## धाराशिवमध्ये जर्शी गायी व कालवडांची बेकायदेशीर वाहतूक

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३ नोव्हेंबर -**

धाराशिव शहर पोलीस ठाण्याच्या पथकाने गोवंशीय जनावरांची कत्तलीसाठी बेकायदेशीर वाहतूक करणाऱ्या एका आरोपीस ताब्यात घेत कारवाई केली आहे.

प्राप्त माहितीनुसार, दि.२ नोव्हेंबर रोजी पहाटे २.१५ वाजता, अहिल्यादेवी होळकर चौक येथील पुलाखाली बोलेरो जिप (क्र. एमएच १४ एम ७५५९) मध्ये गोवंशीय जातीच्या दोन जर्शी गायी आणि एक कालवड अशी सुमारे ५५ हजार रूपये किंमतीची जनावरे निर्दयतेने विना चारा-पाण्याची व्यवस्था करून कत्तलीसाठी वाहतूक केल्याचे आढळून आले. या कारवाईत एकूण ७ लाख ५५ हजार रूपये किंमतीचा मुद्देमाल, बोलेरो वाहनासह, जप्त करण्यात आला. या प्रकरणी आरोपी साबेर बुर्हान कुरेशी (वय १९ वर्षे, रा. बुधवार पेठ, मोहोळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर) याच्याविरुद्ध धाराशिव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

सदर आरोपीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सुरू आहे.

## संक्षिप्त वृत्त...

### नुकसानीची पाहणीसाठी केंद्राचे पथक ४ व ५ नोव्हेंबरला जिल्हा दौऱ्यावर

**धाराशिव, दि.३ नोव्हेंबर -**

सन २०२५ च्या खरीप हंगामात झालेल्या अतिवृष्टी व पूरपरिस्थितीमुळे जिल्ह्यातील शेतपीक, शेतीजमीन, रस्ते, सार्वजनिक तसेच वैयक्तिक मालमत्तेचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या नुकसानीची पाहणी करण्यासाठी केंद्र सरकारचे पथक ४ व ५ नोव्हेंबर रोजी जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहे. केंद्रीय गृह मंत्रालयाचे सहसचिव आर.के. पांडे यांच्या नेतृत्वाखालील हे पथक जिल्ह्यातील विविध भागांना भेट देऊन नुकसानग्रस्त क्षेत्रांचा आढावा घेणार आहे. या दौऱ्यात पिकांचे, सार्वजनिक मालमत्तेचे तसेच पूरग्रस्त परिसरातील परिस्थितीचे प्रत्यक्ष निरीक्षण करण्यात येणार असून, केंद्र शासनाला सादर करण्यासाठी अहवाल तयार केला जाणार आहे.

### अ‍ॅड. आशिष शेलार यांचा आज धाराशिव जिल्हा दौरा

**धाराशिव, दि.३ नोव्हेंबर -**

राज्याचे माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्यमंत्री अ‍ॅड. आशिष शेलार हे ४ नोव्हेंबर रोजी धाराशिव जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. दौऱ्यात ते तेर येथील त्रिविक्रम मंदिर, गोरोबा काका मंदिर दर्शन आणि पुरातत्व वस्तुसंग्रहालयाला भेट देतील. त्यानंतर तुळजापूर येथे श्री तुळजाभवानी देवीचे दर्शन घेऊन दुपारी विश्रांतीसाठी शासकीय विश्रामगृहात थांबतील. सायंकाळी हुतात्मा स्मृती मंदिर, सोलापूर येथे कार्यक्रमानंतर रात्री धाराशिव येथे आगमन होईल. तेथे संत तुकाराम महाराजांच्या ३७५ व्या स्मृती वर्षानिमित्त आयोजित संस्मरणीय कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत.

### संत तुकाराम महाराजांच्या ३७५ व्या स्मृती वर्षानिमित्त संस्मरणीय कार्यक्रम

**धाराशिव, दि.३ नोव्हेंबर -**

सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने संत तुकाराम महाराजांच्या ३७५ व्या स्मृती वर्षानिमित्त संस्मरणीय कार्यक्रमाचे आयोजन ४ नोव्हेंबर रोजी सायं. ६.३० वा. धाराशिव येथील जिजाऊ चौकातील स्वयंवर मंगल कार्यालयात करण्यात आले आहे. कार्यक्रमाला पालकमंत्री प्रताप सरनाईक, सांस्कृतिक कार्यमंत्री अ‍ॅड. आशिष शेलार, खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर तसेच आ. विक्रम काळे, सतीश चव्हाण, राणाजगजितसिंह पाटील, कैलास घाडगे-पाटील, प्रवीण स्वामी आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाला नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक विभीषण चवरे यांनी केले आहे.

### लघुसिंचन योजनांच्या सातव्या प्रगणनेत सहभागी होण्यासाठी संस्थांना आवाहन

**धाराशिव, दि.३ नोव्हेंबर -**

केंद्र शासनाच्या निर्देशानुसार राष्ट्रव्यापी लघुसिंचन योजनांची (0 ते २000 हेक्टर सिंचन क्षमता) सातवी प्रगणना तसेच जलसाठ्यांची माहिती संकलन मोहीम राबविण्यात येत आहे. याबाबतचे आदेश २८ नोव्हेंबर २०२४ रोजी जारी करण्यात आले आहेत. या प्रगणनेत विहिरी, कालवे, बंधारे, उपसा सिंचन योजना, सिमेंट बंधारे, शेततळे, भूजल सर्वेक्षण कूपनलिका अशा विविध प्रकारच्या जलस्रोत व सिंचन प्रकल्पांचा समावेश करण्यात आला आहे. या कामासाठी जिल्ह्यात कार्य करण्यास इच्छुक संस्थांनी आपले प्रस्ताव ७ नोव्हेंबर २०२५ पर्यंत जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, धाराशिव यांच्या कार्यालयात सादर करावेत. अनुभवी संस्थांना प्राधान्य दिले जाणार आहे. सदर प्रगणना कार्य ३१ डिसेंबर पूर्वी पूर्ण करण्याच्या सूचना केंद्र शासनाकडून देण्यात आल्या असून, प्राप्त प्रस्तावांवर सविस्तर चर्चा करून संस्थांची निवड करण्यात येईल.

### मंगरुळ येथे मारहाण प्रकरणी एकावर गुन्हा दाखल

**कळंब, दि.३ नोव्हेंबर -**

मंगरुळ येथील बसस्थानक परिसरात झालेल्या मारहाण प्रकरणी कळंब पोलिसांनी एकावर गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी गोकुळ तुकाराम पाडोळे (रा. मंगरुळ, ता. कळंब) याने दि.१ नोव्हेंबर रोजी सायंकाळी सुमारे ६ वाजता बसस्थानक कळंब परिसरात फिर्यादी सुधाकर मल्हारी पानढवळे (वय ४२) यांना मागील भांडणाच्या कारणावरून शिवीगाळ करून लाथाबुक्यांनी व दगडाने मारहाण केली.

# महायुती व महाविकास आघाडीचे नेते एकत्र; जिल्ह्यात राजकीय चर्चांना ऊत

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.३ नोव्हेंबर -**

धाराशिव जिल्ह्यात जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका जवळ आल्याने राजकीय वातावरण तापले आहे. दिवाळीचे फटाके संपताच आता निवडणुकांचे बिगुल वाजणार असून, विजयाचे फटाके फुटण्याची उलटी गणना सुरू झाली आहे. प्रत्येक गटातील राजकीय पैलवान आता मैदानात उतरायला सज्ज झाले आहेत. याच पार्श्वभूमीवर परंडा विधानसभेत मोठ्या हालचाली पाहायला मिळत आहेत. माजी आमदार राहुल मोटे (अजित पवार गट) यांनी नुकतीच महायुतीतील भाजपचे ज्येष्ठ नेते, विधान परिषदेचे माजी आमदार सुजितसिंह ठाकूर यांची भेट घेतली.

या भेटीने राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. राहुल मोटे यांनी काही दिवसांपूर्वी शरद पवार गटाला रामराम ठोकून, अजित पवारांच्या गटात प्रवेश करून घड्याळ हातात बांधले आहे. ठाकूर आणि मोटे यांची ही भेट सदिच्छा भेट असली, तरी सूत्रांच्या मते ही भेट आगामी निवडणुकांच्या समीकरणांची पूर्वतयारी असल्याचे स्पष्ट संकेत देते. दरम्यान, (दि.२) नोव्हेंबर रोजी परंडा येथील शासकीय विश्राम गृहात निवडणुकांच्या अनुषंगाने एक महत्त्वाची बैठक पार पडली.

या बैठकीत आणखी एक राजकीय ट्विस्ट पाहायला मिळाला महाविकास आघाडीचे नेते रणजीत पाटील (माजी आमदार ज्ञानेश्वर पाटील यांचे पुत्र) यांनी देखील उपस्थिती लावली. त्यामुळे, महायुतीतील राहुल मोटे व सुजितसिंह ठाकूर आणि महाविकास आघाडीतील रणजीत पाटील हे



तिघे एकाच व्यासपीठावर दिसल्याने राजकीय समीकरणांमध्ये खळबळ उडाली आहे.

जिल्ह्यात आता चर्चा अशी रंगली आहे, की मोटे, ठाकूर आणि रणजीत पाटील हे तिघेही येत्या निवडणुकीत शिंदे सेनेला एकटे पाडण्याच्या तयारीत आहेत का? राजकीय कुस्तीचे मैदान आता सज्ज झाले आहे. कोणाची पकड मजबूत ठरेल, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

# कळंब नगराध्यक्षा व २० नगरसेवकांचे भवितव्य २१ हजार मतदारांच्या हातात




**शिंदे सेनेकडून सुनंदा कापसे, तर उद्धव सेनेकडून सारिका जाधव यांच्या नावांची चर्चा**

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.३ नोव्हेंबर -**

कळंब नगर परिषद निवडणुकीची अंतिम मतदार यादी निवडणूक विभागाने प्रसिद्ध केली असून, या निवडणुकीत एकूण २१ हजार मतदारांच्या हातात नगराध्यक्षासह २० नगरसेवकांचे भवितव्य अवलंबून राहणार आहे.

नगराध्यक्ष पदासह नगरसेवक पदांच्या निवडणुकीसाठी सर्वच प्रमुख राजकीय पक्षांनी स्वबळावर निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला आहे. पक्षीय स्तरावर स्थानिक नेत्यांना निवडणुकीची जबाबदारी देत कार्यकर्त्यांनी थेट जनसंपर्क आणि गाठीभेटीवर भर द्यावा असे आदेश दिले गेले आहेत.

सध्या राजकीय वातावरण चांगलेच तापले असून, सर्व पक्षांचे नेते स्वतंत्र प्रचार मोहिमेला सुरुवात करत आहेत. तथापि, ऐनवेळी युती किंवा पक्षादेश पाळला जाण्याची शक्यता नाकारता येत नसल्याचे कळंब तालुक्याच्या राजकीय वर्तुळात चर्चिले जात आहे.

**कळंब नगरपरिषदेची मतदारसंख्या (प्रभागनिहाय)**

| प्रभाग | पुरुष मतदार | स्त्री मतदार | एकूण मतदार |
|---|---|---|---|
| १ | ८८२ | ७७१ | १,६५३ |
| २ | १,२३२ | १,२१६ | २,१४८ |
| ३ | १,१२५ | १,०७७ | २,२०२ |
| ४ | १,००६ | ९४८ | १,९५८ |
| ५ | १,०८७ | १,०३२ | २,११९ |
| ६ | ८४८ | ७७९ | १,६२७ |
| ७ | १,२५२ | १,२६५ | २,५१७ |
| ८ | १,०७६ | १,२२५ | २,४९१ |
| ९ | १,०७६ | १,००८ | २,०८४ |
| १० | ९३९ | ९२४ | १,८६३ |
| एकूण | - | - | २१,६६२ |

दरम्यान, कळंब नगराध्यक्ष पदासाठी संभाव्य उमेदवारांबाबतही चर्चा रंगत असून शिंदे सेनेकडून सुनंदा शिवाजी कापसे, तर उद्धव ठाकरे गटाकडून सारिका जाधव या नावांची जोरदार चर्चा सुरू आहे.

निवडणुकीसाठी वातावरण दिवसेंदिवस तापत असून, मतदारांमध्ये उत्सुकता वाढली आहे.

कळंब शहरातील सर्व प्रमुख राजकीय गटांनी प्रचारयुद्धाची दिशा ठरवण्यासाठी बैठकींची मालिका सुरू केली आहे. या न.प. निवडणुकीकडे तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# डीसीसी बँक मंगरूळ शाखेत अनुदान व्यवहारांवर संशय; शेतकऱ्यांची केवायसी न करता खात्यात जमा

**भाजप नेते मकरंद लबडे यांची चौकशी व कारवाईची मागणी**

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.३ नोव्हेंबर -**

जिल्हा मध्यवर्ती सहकारी (डीसीसी) बँक शाखा मंगरूळ परिसरातील सुमारे १००० शेतकऱ्यांचे अतिवृष्टी अनुदान त्यांच्या घधउ न करता खात्यात जमा केल्याची गंभीर बाब उघडकीस आली आहे.

डीसीसी बँक सध्या आर्थिक अडचणीत असल्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी गेल्या काही वर्षांपासून आपल्या खात्यांमधून कोणतेही आर्थिक व्यवहार केलेले नाहीत. तरीही या निष्क्रिय खात्यांमध्ये शासनाकडून मिळणारे अनुदान जमा करण्यात आले आहे.

सदर अनुदानातून ‘खाते मेंटेनन्स’ या कारणाखाली कपात करण्यात आल्याने शेतकरी वर्गात तीव्र नाराजी आहे.



महाराष्ट्र शासनाने स्पष्ट सूचना दिल्या असूनही, अनुदानातून कोणतीही कपात न करण्याचे आदेश उल्लंघन झाले आहेत.

दरम्यान, अनेक शेतकऱ्यांनी राष्ट्रीयकृत बँकेचे खाते क्रमांक तलाठ्यांना दिले होते, तरीही त्यांच्या अनुदानाची रक्कम डीसीसी बँक खात्यात कशी जमा झाली, याबाबत तालुक्यात उलटसुलट चर्चेला उधाण आले आहे. ग्राहकांची संमती न घेता घधउ प्रक्रिया पूर्ण केल्याची शंका व्यक्त होत आहे.

या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी भाजपचे नेते मकरंद लबडे यांनी सहाय्यक निबंधक यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.

## धाराशिवमध्ये घरफोडी; ६४ हजारांचा ऐवज लंपास

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३ नोव्हेंबर -**

शहरातील इंगळे गल्ली येथे घरफोडीची घटना उघडकीस आली असून अज्ञात चोरट्याने घरातील सोन्याचे दागिने आणि रोकड रक्कम असा एकूण ६४ हजार ५00 रूपयांचा ऐवज चोरून नेल्याची फिर्याद धाराशिव शहर पोलीसात गुन्हा दाखल झाली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी संतोष ज्ञानदेव इंगळे (वय ४२, रा. इंगळे गल्ली, धाराशिव) यांच्या राहत्या घराचे कुलूप अज्ञात व्यक्तीने दि.२३ ऑक्टोबर रोजी सकाळी ९.३0 ते दि.१ नोव्हेंबर रोजी रात्री ८ वाजेच्या दरम्यान तोडून घरात प्रवेश केला. त्यानंतर कपाट व लोखंडी पेटीतील सुमारे ७ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने आणि ३५ हजार रोख रक्कम असा एकूण ६४ हजार ५00 रूपये किमतीचा माल चोरून नेला. या प्रकरणी फिर्यादी संतोष इंगळे यांनी पोलिसांकडे दिलेल्या तक्रारीवरून धाराशिव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

## पत्नी व परपुरुषाच्या वादामुळे तरुणाची आत्महत्या

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.३ नोव्हेंबर -**

तामलवाडी पोलीस ठाणे हद्दीतील केमवाडी शिवारात एका तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. या घटनेप्रकरणी पत्नी आणि परपुरुषाविरुद्ध तामलवाडी पोलिसांत गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

मयताचे नाव गहिनीनाथ दिगंबर पोफळे (वय २८, रा. गावडी दारफळ, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर) असे आहे. त्यांनी दि.३१ ऑक्टोबर रोजी संध्याकाळी ७.३0 ते ९.00 दरम्यान केमवाडी शिवारातील गट क्र. २५३ येथील पत्र्याच्या शेडमध्ये गळफास घेऊन आत्महत्या केली.

फिर्यादी दिगंबर बाबा पोफळे (वय ७४, रा. गावडी दारफळ, ता. उत्तर सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून समजते की, मयत गहिनीनाथ यांच्या पत्नी श्वेता गहिनीनाथ पोफळे (रा. गावडी दारफळ, ह.मु. तोकर वस्ती, बाळे, सोलापूर) या अजय पवार (रा. गुळवंची, ता. उत्तर सोलापूर) या परपुरुषाशी व्हॉट्सॲप व्हिडिओ कॉलद्वारे संवाद साधत होत्या. या कारणावरून पती-पत्नीमध्ये वारंवार वाद, भांडणे आणि तक्रारी होत होत्या. या सततच्या त्रासाला कंटाळून गहिनीनाथ यांनी आत्महत्या केल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

## विकासरत्न आ. राणादादा यांच्या वाढदिनी शालेय साहित्य वाटप

**माजी उपसभापती चित्तरंजन सरडे यांनी विविध उपक्रमांनी साजरा केला दादांचा वाढदिवस....**

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.३ नोव्हेंबर -**

विकासरत्न आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधत तुळजापूर पंचायत समितीचे माजी उपसभापती चित्तरंजन सरडे यांनी मंगरूळ येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांसमवेत शालेय साहित्यासह मुलांना फळांचे वाटप करत विविध उपक्रमांनी वाढदिवस साजरा केला.

चित्तरंजन सरडे यांनी याप्रसंगी बोलताना म्हणाले की, राणादादांनी विकास कामांसाठी कायमस्वरूपी मदत केली असुन आगामी काळात ही मंगरूळसह परिसरातील सर्व गावांना विकास निधी उपलब्ध केला जाईल आणि मंगरूळ जिल्हा परिषद गटातील सर्व शाळांना पायाभूत सुविधा उपलब्ध करून



देण्याचा प्रयत्न करेल.

याप्रसंगी माजी उपसभापती चित्तरंजन सरडे, भाजपा तालुका उपाध्यक्ष आबासाहेब सरडे, धनंजय लबडे, विश्वनाथ माशाळकर, प्रशांत खोपडे, सयाजी शिंदे, सुरज कापसे, बाबासाहेब सरडे यांच्यासह जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# महायुती झाली तर ठीक, अन्यथा स्वबळावर लढण्याची तयारी ठेवा : मोहन पनुरे

**शिवसेना शिंदे गटाची नळदुर्ग न.प.च्या निवडणुकीसाठी तयारी**

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.३ नोव्हेंबर -**

महाराष्ट्रातील आगामी नगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नळदुर्ग नगरपालिकेवर भगवा फडकविण्याचा निर्धार शिवसेना शिंदे गटाने व्यक्त केला आहे. महायुती झाली तर ठीक, अन्यथा शिवसैनिकांनी स्वबळावर लढण्याची तयारी ठेवावी, असे प्रतिपादन शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख मोहन पनुरे यांनी केले.

दि.२ नोव्हेंबर रोजी नळदुर्ग येथे नगरपालिकेच्या निवडणुकीसंदर्भात शिवसेना शिंदे गटाची बैठक पार पडली. या बैठकीचे आयोजन उपजिल्हाप्रमुख ज्ञानेश्वर घोडके यांनी केले होते. बैठकीस जिल्हाप्रमुख मोहन पनुरे, तुळजापूर तालुका प्रमुख अमोल जाधव, युवा सेनेचे तालुका प्रमुख गजानन हळदे आदी मान्यवर उपस्थित होते.

या बैठकीत आगामी निवडणुकीसाठी इच्छुक उमेदवारांची माहिती घेण्यात आली. अनेकजणांनी उमेदवारीसाठी इच्छा व्यक्त केली असून सर्व उमेदवारांची नावे संकलित करून यादी मुंबईला पाठविण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

जिल्हाप्रमुख मोहन पनुरे म्हणाले की, सर्व जाती-धर्मातील नागरिकांना



सोबत घेऊन शिवसेना शिंदे गट नळदुर्ग नगरपालिकेची निवडणूक लढविणार आहे. २४ तास जनतेसाठी काम करणाऱ्या आणि जिंकण्याची क्षमता असलेल्या उमेदवारांनाच पक्षाकडून उमेदवारी देण्यात येईल. कोणत्याही परिस्थितीत नळदुर्ग नगरपालिकेवर शिवसेनेचा भगवा फडकविणारच, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

याप्रसंगी उपजिल्हा प्रमुख ज्ञानेश्वर घोडके व तालुका प्रमुख अमोल जाधव यांनीही मार्गदर्शन केले.

बैठकीस युवा सेनेचे जिल्हा प्रमुख निखिल घोडके, शहर प्रमुख शिवाजी सुरवसे, तसेच गौस कुरेशी, विजय ठाकुर, बंडप्पा कसेकर, अफजल कुरेशी, खय्युम सुंबेकर, मनोज मिश्रा, बुद्धप्पा निंबाळकर, शंकर दुर्लेकर, आकाश घोडके आदी कार्यकर्ते उपस्थित होते. बैठकीचा समारोप शिवाजी सुरवसे यांच्या आभारप्रदर्शनाने झाला.

**जाहीरनामा**

**उमरगा येथील २ रे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, उमरगा, ता.उमरगा, जि. उस्मानाबाद यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज - ६४५/२०२५** — **निशाणी नंबर ०७ कविता/निरंक**

ज्यापेक्षा **कै. सुकुमारबाई शीवाजी तेलंग रा. उमरगा ता.उमरगा जि. धाराशिव** हे दिनांक २५/०१/२०२२ रोजी रा. उमरगा ता. उमरगा जि. धाराशिव येथे मयत झाले आहेत. कै. सुकुमारबाई शीवाजी तेलंग (मयत) यांचे वारस म्हणून **१. कविता राजाभाउ कदम वय ४६ वर्ष (मयताची मुलगी अर्जदार), २. संतोष शीवाजी तेलंग वय ४१ वर्ष (मयताचा मुलगा).** वरील नमुद वारसाशिवाय मयतास अन्य कोणतेही वारस नाहीत. मयत कैफ सुकुमारबाई शीवाजी तेलंग यांच्या मृत्यूपश्चात अर्जदार कविता राजाभाउ कदम रा. उमरगा ता. उमरगा जि. धाराशिव यांनी मयताची मुलगी या नात्याने अर्जदारास व अर्जातील नमुद वारसांना शासकिय निमशासकिय कामाकरीता वारस प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज केला आहे.

सदरहू अर्जदार मयताचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात. या लेखावरुन असे कळविण्यांत येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयाचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयत **कै. सुकुमारबाई शीवाजी तेलंग** यांचे वारस असलेबाबतचे प्रमाणपत्र हे न्यायालय अर्जदारास देईल.

**पुढील नेमलेली तारीख ३१/१०/२०२५**

स्वाक्षरित/- (कु.सी.एम. रणदिवे) वरिष्ठ लिपीक

स्वाक्षरित/- (अ.ज. सय्यद) सहा.अधिक्षक

२ रे सह दिवाणी न्यायालय व स्तर उमरगा

# बालाजी मंदिरात ब्रह्मोत्सव

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३ नोव्हेंबर**

भगवान तिरुपती बालाजी संस्थानच्यां धर्तीवर बीडमधील श्री व्यंकटेश्वर बालाजी मंदिरात यंदा ५ ते १० नोव्हेंबर दरम्यान भव्य ब्रह्मोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यंदाचे हे २० वे वर्ष असून, मागील दोन दशकांच्या धार्मिक परंपरेला यंदा अधिक भक्तिभावाचा साज चढणार आहे. मंदिर परिसर दिव्य रोषणाईने सजला असून, शहरासह जिल्हाभरातून भाविकांचा मोठा उत्साह दिसून येत आहे. दरम्यान रविवारी (दि.९) होणाऱ्या रथोत्सवात बाहुबली हनुमान, बाहुबली नरसिह्मा विशेष आकर्षण राहणार आहे.

२००४ साली बीड शहरात तिरुपती बालाजीच्या प्रतिमेसारखी मूर्ती स्थापित करून व्यंकटेश्वर बालाजी मंदिराची स्थापना करण्यात आली. तेव्हापासून दरवर्षी ब्रह्मोत्सव मोठ्या भक्तिभावाने साजरा होत आहे. भगवान ब्रह्मांनी आरंभ केलेल्या या परंपरेनुसार 'ब्रह्मोत्सव' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या सोहळ्याने गेल्या दोन दशकांत जिल्हाभरातील भाविकांना आध्यात्मिक उर्जा दिली आहे. तिरुपतीसारखीच धार्मिक शिस्त आणि विधी येथे पार पाडले जात असल्याने बीडच्या बालाजी मंदिरातील ब्रह्मोत्सवाने भाविकांच्या मनात खास स्थान मिळवले आहे. यंदाच्या ब्रह्मोत्सवात पाच दिवस विविध धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल राहणार आहे. विशेष म्हणजे दररोज सकाळ-संध्याकाळ हवनपूजा, आरती, शोभायात्रा आणि तीर्थप्रसादाचे आयोजन केले गेले आहे. भगवान बालाजीच्या शेष वाहन, हंस वाहन, हनुमंत वाहन, गरुड वाहन, रथोत्सव



आणि अश्ववाहनावर निघणाऱ्या भव्य मिरवणुका या ब्रह्मोत्सवाचे विशेष आकर्षण ठरणार आहेत.

ब्रह्मोत्सवात बुधवारी (दि. ५ नोव्हेंबर) सायंकाळी सहा वाजता पुण्याहवाचनम् आणि अंकुरार्पणम् विधीने ब्रह्मोत्सवाची सुरुवात होणार आहे. गुरुवारी (दि. ६) सकाळी १० वाजता हवनपूजा व ध्वजारोहण कार्यक्रम पार पडेल. सायंकाळी ५ वाजता कलश स्थापना, साडेसात वाजता शेष वाहन शोभायात्रा आणि रात्री ९ वाजता महाआरती होईल. शुक्रवारी (दि. ७) सकाळी ८ वाजता हवनपूजा, तीर्थप्रसादम्, साडेनऊ वाजता हंस वाहन शोभायात्रा, ११ वाजता आरती, सायंकाळी साडेसात वाजता गरुड वाहन शोभायात्रा आणि रात्री ९ वाजता आरती आयोजित केली आहे. शनिवारी (दि. ८) सकाळी ८ वाजता हवनपूजा आणि तीर्थप्रसादम्, ९.३० वाजता हनुमंत वाहन शोभायात्रा, ११ वाजता आरती, तर सायंकाळी ५.३० वाजता कल्याणोत्सव होणार असून भगवान बालाजीचा माता पद्मावती व लक्ष्मीदेवीसोबत शुभविवाह लावण्यात येणार आहे. त्यानंतर साडेसात वाजता आरती होईल. रविवारी (दि. ९) सकाळी ८ वाजता हवनपूजा व तीर्थप्रसादम्, ९.३० ते १२.३० या वेळेत रथोत्सव, सायंकाळी साडेसात वाजता अश्ववाहन शोभायात्रा, आणि रात्री ९ वाजता महाआरती आयोजित आहे. कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन श्री बालाजी मंदिर संस्थान व ब्रह्मोत्सव समिती, बीड यांनी केले आहे.

**तिरुपतीच्या पुजाऱ्यांच्या हस्ते वैदिक विधी**

ब्रह्मोत्सवातील सर्व विधी तिरुमला तिरुपती देवस्थानचे मुख्य पुजारी सीतारामचार्यलू स्वामीजी आणि वेदपाठशाळेचे उपाध्यक्ष श्रीधर स्वामीजी यांच्या हस्ते पार पडणार असून, त्यांच्याद्वारे होणारा वैदिक मंत्रोच्चार हा उत्सवाचा आध्यात्मिक केंद्रबिंदू ठरणार आहे. त्यांच्या उपस्थितीमुळे ब्रह्मोत्सवाचे आध्यात्मिक वातावरण अधिक मंगलमय होणार आहे.

**पाच दिवस महाप्रसाद**

उत्सवाच्या प्रत्येक दिवशी दुपारी १२.३० वाजता आणि रात्री ९.३० वाजता भाविकांसाठी महाप्रसाद वाटपाचे आयोजन करण्यात आले आहे. या काळात हजारो भाविकांच्या उपस्थितीची अपेक्षा असून, सर्व भक्तांना भोजन, तीर्थप्रसाद आणि पूजन विधीचा लाभ घेण्याचे आवाहन श्री बालाजी मंदिर संस्थान व ब्रह्मोत्सव समिती, बीड यांनी केले आहे.

## जिल्ह्यामध्ये मनाई हुकूम जारी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३ नोव्हेंबर**

बीड जिल्हयात कायदा व सुव्यवस्थेबाबत आगामी काळात दि. ०४ नोव्हेंबर पासून कपिलधार यात्रा सुरु होत आहे.तसेच विविध प्रकारचे निदर्शने, अंदोलने, उपोषण,मोर्चे इत्यादी होण्याची शक्यता आहे. यामूळे अचानक घडणा-या घटनावरुन व किरकोळ कारणावरुन तणाव निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही त्याअनुषंगाने कायदा व सुव्यवस्था आबाधित रहावी यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्याकडून मनाई आदेश जारी करण्यात आले आहे.दिनांक ०१ नोव्हेंबर २०२५ रोजीचे ००.०१ वाजेपासून ते दि. १५ नोव्हेंबर २०२५ रोजीचे २४.०० वाजेपर्यंत बीड जिल्हयात या कालावधीत महाराष्ट्र पोलीस कायदा ३७ (१) (३) अन्वये काढण्यात येणा-या प्रतिबंधात्मक आदेशामध्ये मोर्चे, निदर्शने, आंदोलने, धरणे आंदोलने यासारख्या आंदोलनामध्ये पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तीचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येण्यास निर्बंध राहील. जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था आबाधीत राहावी या करीता कलम ३७ (१) (३ ) अन्वये मनाई आदेश जारी केला आहे.

## जिल्हास्तर लोकशाही दिनात सहा अर्ज प्राप्त

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३ नोव्हेंबर**

जिल्हास्तरीय लोकशाही दिनामध्ये महसूल विभाग ०४ अर्ज भूसंपादन ०१ अर्ज नगर पालीका प्रशासन ०१ अर्ज असे एकूण ०६ तक्रार अर्ज प्राप्त झाले. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रगती सभागृहात लोकशाही दिन संपन्न झाला.यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्यक कार्यकारी अधिकारी, जिल्हा पोलीस मुख्यालय, जिल्हा परिषद, पाटबंधारे विभाग सार्वजनिक बांधकाम विभाग, परिवहन विभाग, सहकार विभाग, कृषी विभाग व पाणी पुरवठा विभाग, समन्वय अधिकारी इत्यादी जिल्हा स्तरावील प्रमुख अधिकारी व ज्या कार्यालयाकडून लोकशाही दिनातील प्रलंबित प्रकरणे होती, ते संबंधित अधिकारी उपस्थित होते.जिल्हाधिकारी यांच्याकडे महसूल संबधित एकूण सहा तक्रार अर्ज जिल्हा लोकशाही दिनात प्राप्त झाले असून जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी अर्जावर सुनावणी घेऊन संबधित विभागास १५ दिवसात संबधित प्रकरणे निकाली काढण्याच्या सूचना दिल्या आहेत.

# मुख्यमंत्री देवेंद्र भाऊ फडणवीस यांनी शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा निर्णय कौतुकास्पद

## शेतकरी पुत्र तथा भाजपा नेते नवनाथ अण्णा शिराळे पाटील

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३ नोव्हेंबर**

सध्या केंद्रामध्ये भारतीय जनता पार्टीचे मा श्री नरेंद्रजी भाई मोदी साहेब यांचे सरकार असून देशातील गोरगरीब सर्वसामान्य वंचित लोकांपर्यंत मोठ्या मोठ्या शासकीय योजना कशा पोहोचल्या जातील व त्यांना कसा लाभ मिळवून देण्यामध्ये यशस्वी ठरलेले मा पंतप्रधान नरेंद्र भाई मोदी साहेब एक यशस्वी पंतप्रधान म्हणून सध्या जगभरामध्ये ओळखल्या जाऊ लागले आहेत.ते सातत्याने गोरगरीब लोकांना सर्व योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील व यशस्वी मा पंतप्रधान यांनी केलेले प्रयत्न सातत्याने यशस्वी होत.असून केंद्र सरकारच्या बाबतीत सर्वत्र जगभरा मधून कौतुक व्यक्त होत आहे. याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्यामध्ये महायुतीचे सरकार असून या महायुतीचे कर्तव्यदक्ष आणि कर्तबदार सर्वांच्या मनामध्ये बसलेले देव देश आणि धर्म यासाठी सातत्याने आपले कर्तव्य पार पाडणारे असे उत्कृष्ट आणि सुसंस्कृत स्वतः वकील असलेले अभ्यासू व्यक्तिमत्व असलेले महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष मा मुख्यमंत्री देवेंद्र भाऊ फडणवीस यांनी शेतकऱ्यांच्या बाबतीत येणाऱ्या २०२६ मध्ये पूर्णपणे कर्जमाफी करु असे अभ्यासपूर्वक वचन सर्व महाराष्ट्रातील तमाम शेतकऱ्यांना त्यांनी दिल्यामुळे शेतकऱ्यांना एक फार मोठा धीर त्यांनी दिला आहे. म्हणून या शेतकऱ्याच्या घेतलेल्या कर्जमाफीच्या निर्णयाच्या बाबतीत मा मुख्यमंत्री देवेंद्र भाऊ फडणवीस साहेब यांच्या उत्कृष्ट कार्याचे बीड जिल्ह्यातील शेतकरी पुत्र तथा भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती मा नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी समाधान व्यक्त करून बीड जिल्हा भारतीय जनता पार्टीच्या वतीने व सर्व बीड जिल्ह्यातील तमाम शेतकऱ्यांच्या वतीने त्यांच्या कार्याचे कौतुक केले आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब यांनी महाराष्ट्रातील तमाम लाडक्या बहिणींसाठी लाडकी बहीण नावाची चांगल्या प्रकारची महाराष्ट्रातील गोरगरीब महिलांना माता भगिनींना एक आधार देणारी योजना सुरू केली आहे. तसेच दिव्यांग व्यक्तीच्या बाबतीत देखील त्यांनी एक हजार रुपये मानधन वाढवले आहे.आता दिव्यांग व्यक्तीला पहिले दीड हजार रुपये मासिक महिना मिळत होता परंतु देवा भाऊ यांनी एक हजार रुपयांची भर या योजनेमध्ये टाकल्यामुळे प्रत्येकी दिव्यांग व्यक्तीला संजय गांधी निराधार योजनेच्या माध्यमातून अडीच हजार रुपये महिना मिळू लागला आहे. याबाबतीत देखील महाराष्ट्रातील तमाम दिव्यांग बांधवांमधून देखील समाधान व्यक्त होत असल्याचे या प्रसिद्ध पत्रकाच्या माध्यमातून शेतकरी पुत्र तथा भारतीय जनता पार्टीचे नेते नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी म्हटले आहे. येणाऱ्या भविष्य काळामध्ये आपण बीड जिल्ह्यामध्ये सर्वत्र बीड जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील खेड्यापाड्यांमध्ये जाऊन देखील भारतीय जनता पार्टीची शाखा सर्वत्र गावोगाव करणार आहोत.तसेच भारतीय जनता पार्टीचे कार्य देखील आपण सर्वसामान्य माणसांना या शाखा ओपनिंगच्या माध्यमातून सांगणार आहोत. आणि शेतकऱ्यांच्या घेतलेल्या कर्जमाफीच्या योजनेच्या निर्णयाच्या बाबतीत सर्व शेतकऱ्यांमधून समाधान व्यक्त होत असून आता पुढेही येणाऱ्या निवडणुकीमध्ये भारतीय जनता पार्टीची सत्ता महाराष्ट्र मध्ये सर्वत्र येईल व भविष्यात लोकहिताचे चांगल्या प्रकारे निर्णय घेणारे अभ्यासू व्यक्तिमत्व असलेले कायमस्वरूपी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून देखील देवेंद्र जी फडणवीस साहेब हेच असावेत अशी चर्चा देखील आता सर्व शेतकरी बांधवांमधून होत आहे.असे प्रसिद्धस दिलेल्या पत्रकाच्या माध्यमातून शेतकरी पुत्र तथा भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती मा नवनाथ जी अण्णा शिराळे पाटील यांनी म्हटले आहे तसेच रब्बी पिकाचा सर्व बीड जिल्ह्यातील तमाम शेतकरी बांधवांनी आपापला विमा काढून स्वतःचा फायदा कसा होईल किंवा शासनाच्या धोरणामध्ये सहभागी होऊन रब्बीचा पीक विमा सर्व बीड जिल्ह्यातील तमाम शेतकरी बांधवांनी मुद्दतीच्या आत आपापले पैसे भरावेत विमा काढून घ्यावा घ्यावा असे आवाहन शेतकरी पुत्र तथा भाजप नेते मा नवनाथ जी अण्णा शिरोळे पाटील यांनी केले आहे आणि भविष्यात देवा भाऊ नक्कीच शेतकऱ्यांना रब्बी पीक विमाच्या बाबती देखील विमा कंपनीच्या माध्यमातून भरपूर शेतकऱ्यांच्या हिताची व शेतकऱ्याला आर्थिक मदत करून देतील असा विश्वास ही या वेळी नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी व्यक्त केला व मा श्री देवा भाऊ फडणवीस साहेब यांच्या महायुती सरकारच्या बाबतीत समाधान व्यक्त केले .



यश ढाका हत्या प्रकरणातील सर्व आरोपी तात्काळ अटक करा या मागणीसाठी आज जिल्हाधिकारी कार्यालयावर आज जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला.यावेळी ढाका कुटूंबियांसह नागरिक उपस्थित होते. (छाया-कृष्णा शिंदे)

# 'कोटी'चा प्रकल्प, पण धारूरला पाण्यासाठी वणवण!

**प्रतिभा नगरमध्ये जुनी-नवीन पाईपलाईनच्या 'घोळात' नागरिक तहानलेले; दिवाळीतही पाण्याचा थेंब नाही. अभियंता वाघ आणि तांबवे यांच्यावर हलगर्जीपणाचा थेट ठपका.**

**तभा वृत्तसेवा**
**किल्लेधारूर दि.३ नोव्हेंबर**

किल्ले धारूर नगरपरिषदेच्या वतीने 'नगरोत्थान महाभभयान पाणीपुरवठा प्रकल्पा' अंतर्गत ६५ कोटी रुपये मंजूर करून कुंडलिका धरणातून पाणी आणले खरे, पण या प्रकल्पाचे काम शहरात 'पाणीदार' ऐवजी 'तहानलेले' चित्र निर्माण करत आहे. शहराच्या प्रतिभा नगर भागात तर गेल्या मार्च महिन्यापासून ते आजपर्यंत नागरिकांना पाण्यासाठी मोठा संघर्ष करावा लागत आहे. दिवाळीसारख्या सणातही पाणी न मिळाल्याने येथील महिला, वृद्ध आणि बालकांचे प्रचंड हाल झाले असून, नगरपरिषद प्रशासनावर संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत.

**जुनी पाईपलाईन तोडली, नवी कोरडीच!**

**पारदर्शक स्पष्टीकरण:**

नवीन पाईपलाईनचा फटका: नगरोत्थान प्रकल्पांतर्गत मार्च महिन्यात प्रतिभा नगरमध्ये नवीन पाईपलाईन टाकण्यात आली. हे काम करत असताना, संबंधित कंत्राटदार (गुत्तेदार) यांच्या निष्काळजीपणामुळे शहरातील जुनी, कार्यरत पाईपलाईन अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात तोडण्यात (फुटली) आली.

दुरुस्तीकडे अक्षम्य दुर्लक्ष: जुनी पाईपलाईन फुटल्यानंतर ती तातडीने दुरुस्त करण्याची जबाबदारी असतानाही, कंत्राटदाराने किंवा नगरपरिषदेने याकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले आहे. जुन्या पाईपलाईनवर अनेक नागरिकांचे कनेक्शन असल्यामुळे, ही पाईपलाईन आज मार्चपासून ते आजपर्यंत पाण्यासाठी कोरडीच आहे.

नवीन कनेक्शन, सात वेळा पाणी: ज्या नागरिकांनी नवीन नळ कनेक्शनसाठी घरपट्टी व नळपट्टी भरली, त्यांना नवीन पाईपलाईनमार्फत आजपर्यंत फक्त सात ते आठ वेळाच पाणी आले आहे. यातही दिवाळीच्या सणात पाण्याचा थेंबही न आल्याने नागरिकांचा संताप शिगेला पोहोचला आहे.

**अधिकारी व गुत्तेदार जबाबदार; मुख्य अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी**

प्रतिभा नगरमधील नागरिक संतप्त होऊन मागणी करत आहेत की, जुनी पाईपलाईन फुटल्यास ती तत्काळ दुरुस्त करण्याची जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची (गुत्तेदाराची) होती, पण त्याने जाणूनबुजून दुर्लक्ष केले.जबाबदार अधिकारी: पाणीपुरवठा अधिकारी अभियंता वाघ आणि त्यांचे सहकारी ऋषिकेश तांबवे यांना वारंवार फोनद्वारे, प्रत्यक्ष भेटून तसेच अर्जाद्वारे नागरिकांनी माहिती दिली. मात्र, त्यांनी या समस्येकडे हलगर्जीपणाने दुर्लक्ष केले. त्यांच्या हाताखालील रोजंदारीवरील (मजुरीवरील) कर्मचाऱ्यांचा निष्काळजीपणा तर कळस गाठणारा आहे.

हलगर्जी करणाऱ्यांवर कारवाईची मागणी: या हलगर्जीपणामुळे निष्पाप महिला, बालक आणि वृद्धांना पाण्यासाठी वंचित राहावे लागले आहे. त्यामुळे, निष्काळजीपणा करणाऱ्या रोजंदारी मजुरांना तातडीने सेवेतून काढून, त्यांच्या जागी कायमस्वरूपी व जबाबदार व्यक्तींची नेमणूक करावी.

गुत्तेदारावर प्रशासकीय कारवाई: जुनी पाईपलाईन दुरुस्त करण्याची जबाबदारी न पाळल्यास, संबंधित गुत्तेदारावर प्रशासकीय कारवाई करून त्यांच्याकडून तत्काळ दुरुस्ती करून घ्यावी, अशी नागरिकांची मागणी आहे.

या संपूर्ण प्रकरणाची सखोल माहिती घेऊन एक समिती स्थापन करावी आणि पाणीपुरवठा अधिकारी वाघ आणि तांबवे यांच्यासह दोषी गुत्तेदार व रोजंदारी कर्मचाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी संतप्त नागरिकांची होत आहे.

# 'पाणी नाही, विकास नाही, पण नगराध्यक्ष-नगरसेवक पदाचे दर ठरले!' -'पैसा' बोलतोय, 'धारूरचा विकास' गप्प आहे!

किल्ले धारूर: ( सुर्यकांत जगताप )नगरपरिषद किल्ले धारूरच्या आरक्षण सोडतीनंतर शहरात निवडणुकीच्या चर्चेला मोठे उधाण आले आहे. नगराध्यक्ष आणि नगरसेवक पदासाठी प्रत्येक पक्षातून मोठी चढाओढ सुरू असून, मुलाखती, गट-चर्चा, पक्षप्रवेश अशा अनेक राजकीय घडामोडींनी धारूर सध्या गाजत आहे. मात्र, या सर्व राजकीय धामधुमीत शहराच्या मूलभूत प्रश्नांवर चर्चा होताना दिसत नाही. विशेष म्हणजे, गेल्या वीस-पंचवीस दिवसांपासून शहराला पाणीपुरवठा झालेला नसतानाही, मुख्य चर्चेचा विषय पाणीटंचाई नसून, निवडणुकीतील पैशांचा 'खेळ' हाच ठरत आहे.




आज आरक्षण सुटल्यापासून शहरातील प्रत्येक हॉटेल, चौक, दुकान आणि गल्लीत फक्त आगामी निवडणुकीचीच चर्चा रंगली आहे. नगराध्यक्ष कोण होणार? कोण किती खर्च करणार? याच बाबींवर सर्वाधिक बोलले जात आहे. सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, नगराध्यक्ष पदासाठी चक्क 'दर' ठरवले जात असल्याची चर्चा शहरात सुरू आहे. एका पक्षातून नगराध्यक्षपदासाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांमध्ये 'मी एक कोटी, दुसरा दीड कोटी, तिसरा अडीच कोटी, तर चौथा तीन कोटी खर्च करेन', अशा पैशांच्या स्पर्धेला उधाण आले आहे. केवळ नगराध्यक्षच नव्हे, तर नगरसेवक पदासाठीही २० लाख, २५ लाख, ३० लाख खर्च करण्याची तयारी इच्छुक उमेदवारांनी दर्शवली आहे. ही परिस्थिती केवळ एका पक्षापुरती मर्यादित नसून, सर्वच पक्षांतील प्रमुख इच्छुकांमध्ये अशीच चर्चा जोर धरू लागली आहे.

**विकासाचा लेखाजोखा हरपला!**

वास्तविक पाहता, या निवडणुकीच्या निमित्ताने गेल्या नऊ वर्षांतील नगरपरिषदेच्या कामाचा लेखाजोखा मांडणे आवश्यक होते. किल्ले धारूर नगरपरिषदेची निवडणूक होऊन नऊ वर्षे पूर्ण झाली आहेत. या नऊ वर्षांत पहिल्या पाच वर्षांत भाजपचे सरकार (नगरपरिषद सत्ता) होते आणि त्यानंतरची चार वर्षे प्रशासकीय राजवट होती. या काळात शहरात काय विकासकामे झाली, किती पूर्ण झाली आणि किती अर्धवट राहिली, यावर गंभीर चर्चा होणे अपेक्षित होते.

भाजपच्या पाच वर्षांच्या काळात नेमकी कोणती विकासाची कामे मार्गी लागली आणि ती पूर्णत्वास का गेली नाहीत? यावर बोलण्याऐवजी, फक्त पैशांच्या बळावर निवडणूक लढवण्याची मानसिकता तयार होताना दिसत आहे. विशेष म्हणजे, मागील चार वर्षांच्या प्रशासकीय काळात माजी नगरसेवक, विरोधी नगरसेवक किंवा कोणत्याही पक्षाचे नेते नगरपरिषदेच्या विकासासंदर्भात फिरकले नाहीत किंवा जनतेच्या हिताचे कोणतेही काम त्यांनी केले नाही, अशी शहरवासीयांची भावना आहे. त्यांनी फक्त 'पाहण्याची' भूमिका घेतल्याचे चित्र दिसत आहे.

**ऐतिहासिक वसा धोक्यात!**

किल्ले धारूर हे शहर ऐतिहासिक वसा आणि वारसा लाभलेले शहर म्हणून ओळखले जाते. जर अशा पद्धतीने निवडणुकीत पैशाचा 'खेळ' चालणार असेल, तर निवडून येणारे प्रतिनिधी शहराचा विकास काय करणार? त्यांनी खर्च केलेला पैसा ते व्याजासकट वसूल करतील, यात शंका नाही. याचा थेट परिणाम शहराच्या विकासावर होऊन, ऐतिहासिक धारूरचा नावलौकिक आणि वसा संपुष्टात येण्याची भीती निर्माण झाली आहे. नऊ वर्षांपासून झालेला विकास खुंटलेला असताना, भविष्यातही हीच स्थिती कायम राहण्याची शक्यता आहे.

**जनतेनेच परिवर्तन घडवावे!**

येणाऱ्या निवडणुकीत अनेक नवीन मतदारही आपला मतदानाचा हक्क बजावणार आहेत. या पार्श्वभूमीवर, धारूरच्या सुजाण नागरिकांनी आणि मतदारांनी विचार करणे अत्यंत गरजेचे आहे. जर मतदारांनी नगराध्यक्ष आणि नगरसेवकांचे पैशांचे आमिष स्वीकारले, तर धारूर शहराचा विकास निश्चितपणे खुंटेल.

आता वेळ आली आहे, परिवर्तन घडवण्याची! किल्ले धारूरच्या जनतेने या पैशाच्या जीवावर निवडणूक लढवू पाहणाऱ्या आणि गोरगरिबांच्या मतदानाची चेष्टा करणाऱ्या उमेदवारांना योग्य धडा शिकवावा. प्रामाणिक, निस्वार्थी आणि खऱ्या अर्थाने शहराचा विकास करण्याची तळमळ असलेल्या व्यक्तीला निवडून देणे, ही काळाची गरज आहे. तुम्ही निवडलेला प्रामाणिक प्रतिनिधीच शहरात चांगल्या सुख-सुविधा उपलब्ध करून देईल आणि येणाऱ्या पिढीसाठी एक विकसित धारूर निर्माण करेल.

अन्यथा, जर ही 'पैशाची स्पर्धा' अशीच चालू राहिली, तर आपला हा ऐतिहासिक किल्ले धारूर येणाऱ्या काळात केवळ 'इतिहास' बनून राहील! मतदारांनो, योग्य वेळी योग्य निर्णय घ्या आणि धारूरच्या विकासाची दिशा बदला!

# देश, राज्यासह स्थानिक स्वराज्य संस्थेतही 'भाजप'च हवा : खा. अशोक चव्हाण

**तभा वृत्तसेवा**
**देगलूर, दि. ३ नोव्हेंबर-**

देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पार्टीची सत्ता आहे. आता देगलूरच्या सर्वांगीण विकासासाठी स्थानिक स्वराज्य संस्थेतही भाजपाच हवा असे आवहन खा. अशोक चव्हाण यांनी केले. भारतीय जनता पार्टीच्या वतीने आज (दि. ०३ नोव्हेंबर) रोजी देगलूर येथील मोंढा मैदानावर भव्य जनसंवाद सभेचे आयोजन करण्यात आले यावेळी ते बोलत होते.

या जनसंवाद सभेस राज्यसभेचे खासदार डॉ. अजित गोपछडे, जिल्हाध्यक्ष संतुकराव हंबर्डे, माजी आ. अमरनाथ राजूरकर, आ. तुषार राठोड, आ. जितेश अंतापूरकर, माधवराव



उच्चेकर, लक्ष्मण ठक्करवाड, जिल्हा चिटणीस अनिल पाटील खानापूरकर, माजी समाजकल्याण सभापती ड.रामराव नाईक आदींची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना खा. अशोक चव्हाण म्हणाले की, शेतकऱ्यांची कर्जमाफी, बिदर रेल्वेमार्ग, लातुर रेल्वेमार्ग, पिण्याच्या पाण्याची योजना, सर्व घटकांच्या विकासासाठी मी कटिबध्द आहे. देगलूरच्या विकासाची गॅरंटी मी घेतो. देगलूरच्या जनतेवर माझा पूर्ण विश्वास आहे. येणाऱ्या काळात विकासाच्या पाठीशी देगलूरची जनता राहिल, असा आशावाद त्यांनी व्यक्त केला. विरोधक नकारात्मक राजकारण करत आहेत. विकासाच्या मार्गात काही लोक स्पीड ब्रेकर होत आहेत, अशा स्पीड ब्रेकरला उखडून टाका. सध्या जिल्ह्यात काही लोकांचा शिव्या देऊन मत विकत घेण्याचा धंदा झाला आहे, असे म्हणत आ. प्रतापराव पाटील यांचा चांगलाच समाचार घेतला.

या जनसंवाद सभेत भारतीय जनता पार्टीत देगलूर - बिलोली मतदारसंघातील कार्यकर्त्यांनी मान्यवरांच्या उपस्थितीत पक्ष प्रवेश केला.

यावेळी बोलताना राज्यसभेचे खासदार डॉ. अजित गोपछडे म्हणाले की, देगलूर शहराला स्वच्छ, सुंदर आणि सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध बनविण्याचे आमचे ध्येय आहे. शहरात सांस्कृतिक भवन, क्रीडांगण, एस. एम. जोशी सभागृह उभारले जाणार आहे. नांदेड-बिदर रेल्वे मार्गाचा विस्तार, तसेच सीमावर्ती गावांच्या समस्यांवर उपाययोजना करण्यासाठी आम्ही केंद्र आणि राज्यस्तरावर प्रयत्न करू, असेही त्यांनी सांगितले.

या सभेचे प्रास्ताविक पंचायत समितीचे माजी सभापती शिवाजीराव बळेगावकर यांनी केले. तर या सभेस आ. जितेश अंतापूरकर, माजी आ. अमरनाथ राजूरकर, आ. तुषार राठोड, भाजपा जिल्हाध्यक्ष संतुकराव हंबर्डे, महिला आघाडीचे जिल्हाध्यक्षा अनिता चोंडीकर यांनी मार्गदर्शन केले.

ही सभा देगलूर बिलोली विधानसभेचे आ. जितेश अंतापूरकर यांच्या नेतृत्वाखाली घेण्यात आली. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसंदर्भात ही जनसंवाद सभा महत्त्वपूर्ण ठरणार असून आगामी देगलूर नगरपरिषदेचा नगराध्यक्ष पदाचा उमेदवार इतर पक्षासारखे दादागिरी, जुगारबाज आम्ही देणार नाही. आमचा नगराध्यक्ष पदाचा उमेदवार हा प्रामाणिक, स्वच्छ प्रतिमेचा देऊ. येणाऱ्या काळात भाजपाचा झेंडा देगलूर नगरपरिषदेवर फडकवू असे जनसमुदायासमोर उपस्थितांनी सांगितले. यावेळी मंडळ अध्यक्ष शिवकुमार देवाडे व ड. प्रितम देशमुख यांच्यासह भारतीय जनता पार्टी शहर व ग्रामीण कार्यकर्त्यांचे सहकार्य लाभले.

## जांब गटातून जयपाल गायकवाड यांना उत्स्फूर्त प्रतिसाद



**जांब** -जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसकडून जांब गटात जयपाल गायकवाड यांचे नाव जोरदार चर्चेत आले आहे. गायकवाड यांनी अलीकडेच हिप्परगा, दापका राजा आणि लादगा येथे घेतलेल्या संवाद दौऱ्यांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. स्थानिक युवक, महिला व ज्येष्ठ नागरिकांनी त्यांचे स्वागत करत काँग्रेसला पाठिंबा दर्शविला. जांब गट हा अनुसूचित जातीसाठी राखीव असून, या वेळी स्थानिक उमेदवाराचा मुद्दा ठळक झाला आहे. काँग्रेस जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार हनमंतराव पाटील बेटमोगरेकर यांनी स्थानिक पातळीवरून उमेदवारीसाठी नावे मागवली होती, त्यात उच्चशिक्षित आणि पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत जयपाल गायकवाड यांचे नाव पुढे आले आहे. गायकवाड यांच्या संपर्क दौऱ्यांना वाढता प्रतिसाद मिळत असून, स्थानिक युवा चेहरा आणि प्रामाणिक प्रतिमा या बळावर काँग्रेसला जांब गटात गती मिळाल्याचे दिसून येत आहे. दुसरीकडे, भाजप व इतर पक्षांचे उमेदवार अद्याप निश्चित झालेले नाहीत. त्यामुळे गायकवाड यांच्या प्रचाराला जांब गटात सुरुवातीपासूनच वेग आला आहे.

## इच्छुक उमेदवार अंकुश भालेराव यांच्या गाव भेटीच्या दौऱ्याचा पहिला टप्पा पूर्ण!

**किनवट** -गोकुंदा पंचायत समिती गणातून निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक असलेले अंकुश भालेराव यांनी आपल्या गाव भेटीच्या दौऱ्याचा पहिला टप्पा नुकताच पूर्ण केला आहे. गणातील विविध गावांना भेट देऊन त्यांनी नागरिकांशी संवाद साधला आणि त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. या गावांमध्ये झाला दौरा: पहिल्या टप्प्यात अंकुश भालेराव



यांनी गणातील महत्त्वाची गावे असलेल्या गोकुंदा, कोठारी, शनिवारपेठ, प्रधानसांगवी, बेंदी, बेंदी तांडा, आणि आमडी या गावांना भेटी दिल्या. उद्देश आणि प्रतिसाद: या दौऱ्यात त्यांनी नागरिकांच्या समस्या, मूलभूत गरजा आणि स्थानिक प्रश्न जाणून घेतले. या भागातील नागरिकांनी श्री. अंकुश भालेराव यांचे उत्साहाने स्वागत केले आणि त्यांच्याशी विविध विषयांवर चर्चा केली. पुढील टप्प्याची तयारी: पहिल्या टप्प्याला मिळालेल्या चांगल्या प्रतिसादानंतर, आता अंकुश भालेराव लवकरच दौऱ्याचा पुढील टप्पा सुरू करणार असल्याचे त्यांच्या कडून आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगण्यात आले. उर्वरित गावांमध्ये भेट देऊन ते आपला जनसंपर्क वाढवणार आहेत. अंकुश भालेराव यांच्या या सक्रिय जनसंपर्क अभियानामुळे गोकुंदा पंचायत समिती गणातील राजकीय वातावरण अधिक तापले आहे.

स.अजितसिंग मंचरियालवाले,शिवकुमार देवकते, सुरेश चंदावाड, शादुल होणवडजकर, कैलास मादसवाड, प्रा.डॉ. गणेश जोशी, डॉ. अभय दांडगे, रमेश पांडे, रमेश चिते, प्रशांत गवळे,विजय मंगरुळे, श्रीधरराव कदम, योगगुरू सिताराम सोनटक्के, किशोर पसलवाड, मंगेश खंडागळे, आर.आर.यवतीकर, अबास काझी, विकास गजभारे,जीवन वडजे पाटील यांच्यासह नवीन नांदेड, नांदेड व उमरदरी येथील त्यांच्या संस्थेतील प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, आदी शेकडो हितचिंतकांनी शिवाजीराव जाधव यांना शुभेच्छा दिल्या.

## सुनील पाटील शिंदे यांची सावरगाव (न). गटातुन निवडणूक लढविण्याची तयारी

**लोहा** - तालुक्यातील सावरगाव (न.) जि.प. गटाचे इच्छुक उमेदवार सुनील शिंदे पाटील यांनी आगामी जि.प. निवडणूक लढविण्याची जय्यत तयारी केली आहे. सावरगाव (न.) गटातील पेनूर, आडगाव, खांबेगाव, हळदव या गावातील मतदारांच्या भेटी गाठी घेत असुन मतदारांचा सकारात्मक प्रतिसाद दिसुन येत आहे. लोहा तालुक्यातील पेनूरचे भूमीपुत्र तथा पुणे येथील प्रसिद्ध स्वराज होम्सचे संचालक व सामाजिक चळवळीत युवा नेतृत्व सर्वसामान्य नागरिकाला मृदुभाषी आपलेस करणारे म्हणुन ओळख निर्माण केली आहे, शेतकरी मजुरदार यांना सहकार्याची भावना ठेवणारे म्हणुन मतदारांचा कल दिसून येत आहे. सामाजिक व धार्मिक कार्यात नेहमी सहकार्याची भावना ठेवणारे भावी उमेदवार समजले जातात. सावरगाव गटातील पेगूर, आडगाव खांबेगाव, हळदव वाडी,तांडे यासह अनेक गावांत झंझावात दौरा करत आहेत. .राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे लोहा कंधार मतदार संघाचे आ. प्रताप पाटील चिखलीकर यांच्या संपर्कात कार्यालयात मुलाखत देऊन उमेदवारी मागणी केली आहे. आ. प्रताप पाटील चिखलीकर यांनी आगामी निवडणुकीमध्ये उमेदवारी निश्चित मानली जाते येणाऱ्याकाळात पक्षासाठी तन धन मनाने पक्षवाढी काम करुन सर्वसामान्य कुटुंब माझे कुटुंब म्हणुन अनेक संकटात आपली जिवाची बाजी लावून उभा राहिल असे म्हणाले यापुर्वी राजकारण या विषयाचा छंद नसताना अनेक गावांत सामाजिक कार्य म्हणुन महापुरुषाच्या पुतळ्यासाठी मदत केली आहे याचं जोरावर जनतेने ठरवले आहे या युवकाची समाजाला गरज आहे यामुळेच आ.प्रताप पाटील चिखलीकर यांच्या नेतृत्वाखाली सावरगाव (न) झिप गटात नशिब आजमावीत आहे.

## पर्यावरणपूरक वाढदिवस; लालवंडी शाळेत १०० फळझाडांची लागवड

**तभा वृत्तसेवा**
**नरसी, दि. ३ नोव्हेंबर-**

वाढदिवस म्हणजे फक्त केक,मेणबत्ती नव्हे, तर समाजासाठी काहीतरी सकारात्मक करण्याची संधीही असते, याचा उत्तम आदर्श लालवंडीतील धनश्री नागेश येरसनवार हिने दाखवून दिला आहे. आपल्या वाढदिवसानिमित्त तिने लालवंडी जिल्हा परिषद शाळेच्या परिसरात तब्बल १०० फळझाडे व शोभेची झाडे लावून पर्यावरण संवर्धनाचा सुंदर संदेश दिला.



या हरित उपक्रमात कॅनिप्रास, मोरपंखी, तार, पारिजातक, फायकॅाट, तोडा, तोफखाना, जाहोपा, दुराई, महागणी यांसारख्या विविध फळझाडे व शोभेच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. ग्रामसेवक नागेश येरसनवार यांनी आपल्या मुलीच्या वाढदिवसाचे औचित्य साधून व्यर्थ खर्च न करता झाडे लावा, पर्यावरण वाचवा हा संदेश देत एक आदर्श घालून दिला. त्यांच्या या विचारपूर्वक उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

या कार्यक्रमास भगवान पा. लंगडापुरे, प्रकाश जोंधळे, शिवराम अप्पा येरसनवार, रंजित पाटील कुरे, पत्रकार नागेश कल्याण, रामराव बामनपल्ले, व्यंकटराव इंद्रे, युवराज लालवंडे, नागेश संगेपवाड, शिवराज वरवटे, प्रताप बोमनाळे, माधव परगेवार, अँड. नीलकंठ पा. कुरे तसेच मुख्याध्यापक देविदास बैस, शिक्षक शहाजी सुनपे आदींसह अनेक मान्यवर, ग्रामस्थ व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या निमित्ताने उपस्थित सर्वांनी वृक्षारोपणाच्या माध्यमातून गाव सुशोभित करण्याचा संकल्प केला. 'हरित ग्राम सुंदर ग्राम' या संकल्पनेला या उपक्रमातून नवे बळ मिळाले असून, धनश्री येरसनवार हिचा वाढदिवस ग्रामस्थांसाठी प्रेरणादायी ठरला आहे.

## हदगांव पंचायत समितीच्या कर्मचाऱ्यांच्या अप-डाऊनमुळे नागरिकांची गैरसोय

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव, दि. ३ नोव्हेंबर-**

शासन प्रत्येक योजनेसाठी गावापासून ते दिल्ली पर्यंत कर्मचारी अधिकारी नेमुन लाखो रुपये खर्च करीत आहे. प्रत्येक कामासाठी अधिकारी नियुक्त करुन त्याला मुख्यालयी राहणे बंधनकारक आहे. पण हदगाव पंचायत समितीचे अनेक अधिकारी कर्मचारी मुख्यालयी न राहता आपल्या सोयीनुसार राहत असल्याने सर्व सामान्य माणसाला आपले काम करण्यासाठी अडचणीचा सामना करावा लागत असुन अधिकारी कर्मचारी मात्र आम्हाला नाही कोणाची भिती असे भासवीत असल्याने कर्तव्य दक्ष मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी लक्ष देण्याची गरज आहे.

प्रत्येक गावातील विकासाचा कणा म्हणून ग्रामसेवक प्रशासनाचा अधिकारी असतो. त्याला मुख्यालयी राहणे गरजेचे असते. पण एका ग्रामसेवकांना अनेक गावाचा कारभार असल्याने मला काय तुमचेच गाव आहे का दुसरेही गाव असल्याने मी तिथं आहे, मिटिंग



ला आहे. असे सांगुन वेळ काढत आहेत. गावातील दोन तीन गटांच्या राजकीय ग्रहणात विकास कामाचा दर्जा खालावला गेल्यामुळे ग्रामीण भागात अनेक अडचणी निर्माण झाल्या विकास फक्त कागदावरच दिसत असून परीणामी सर्व सामान्य माणसाला डोकेदुखी ठरत असुन आंधळ दळत कुत्र पिठ खातं अनेक गावांत ग्रामसेवक, विस्तार अधिकारी, कोण आहे. कधी येतो हे तुरळक पुढारी यांनाच माहीत असल्याने सर्व सामान्य माणसाला काम पडले की वशीला लावल्या शिवाय काम होत नाही ही वस्तुस्थिती आहे.कार्यालयात गटविकास अधिकारी, पाणीपुरवठा कर्मचारी, बांधकाम व आरोग्य कर्मचारी, कृषी विभाग, पाणीपुरवठा विभाग, पशुसंवर्धन विभाग, एकात्मिक बाल विकास विभाग, रोहयोसारख्या, महत्वाच्या विभागाचे कर्मचारी नेहमी गैरहजर असतात. सध्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. उमेदवार कागदपत्रे जुळवाजुळव करण्यासाठी फिरत असल्याने ग्रामपंचायतीच्या फायदेशीर आहे पण ग्रामसेवक आपल्या सोयीनुसार राहत असल्याने उमेदवार मात्र फिरत असताना दिसत आहे. तर अधिकारी कर्मचारी आम्हाला नाही कोणाची भिती असे भासवीत असल्याने हदगाव तालुक्यातील ग्रामीण भागातील गावांना कर्तव्य दक्ष मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी भेट दिली तर सत्य परिस्थिती समजणार आहे. कोणत्या गावात पंचायत समितीच्या अधिकारी कर्मचारी भेटी दिल्या हे सर्व सामान्यांना विचारले तर सत्य समोर येणार आहे. आपल्या कार्याचा ठसा उमटविणाऱ्या सिईओ यांनी अचानक भेट देतील असे सर्व सामान्य नागरिकांना आशा वाटत आहे.

## रत्नागिरीत उजळला ज्ञानाचा दीप; बाबाराव महादवाड यांचा राष्ट्रीय सन्मान सोहळा

**तभा वृत्तसेवा**
**नायगाव, दि. ३ नोव्हेंबर-**

नायगांव तालुक्यातील खंडगांव येथील भुमी पुत्र तथा कै. रामचंद्र पा.माध्यमिक विद्यालय शेळगांव गौरीचे मुख्याध्यापक बाबाराव रामजी महादवाड यांना राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार देवून गौरविण्यात आले.

शिक्षण हेच खरे परिवर्तनाचे शस्त्र मानणाऱ्या आणि आयुष्यभर विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी झटणाऱ्या शिक्षकांच्या कार्याला मानाचा मुजरा करत महात्मा ज्योतीराव फुले शिक्षक परिषद, महाराष्ट्र तर्फे महात्मा ज्योतीराव फुले राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार २०२५ हा सन्मान प्रदान करण्यात आला.

या वर्षीचा मानाचा पुरस्कार बाबाराव महादवाड, सेवानिवृत्त मुख्याध्यापक, कै. रामचंद्र पाटील माध्यमिक विद्यालय, शेळगाव गौरी, ता. नायगाव, जि. नांदेड यांना बहाल करण्यात आला आहे.

कार्यक्रमाचे आयोजन स्व. वि. वा. सावरकर नाट्यगृह, रत्नागिरी येथे करण्यात आले होते. या प्रसंगी प्रदेश उपाध्यक्ष



प्रा. डॉ. सखाराम वाघमारे, प्राचार्य डॉ. शिवाजी पाटील, प्राचार्य गोपिनाथ व प्रदेश संयोजक सागर व्यंकटराव जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सन्मान सोहळा पार पडला. महात्मा फुलेंच्या विचारधारेवर आधारित ही परिषद गेल्या अनेक वर्षांपासून शैक्षणिक व सामाजिक कार्यात नवे आयाम निर्माण करणाऱ्या शिक्षकांचा गौरव करत आहे..बाबाराव महादवाड यांनी प्राथमिक व शिक्षक सेवेपासून ते मुख्याध्यापक या पदाच्या सेवा काळात नायगांव तालुक्यातील शेळगांव गौरी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची जागृती निर्माण केली, समाजातील दुर्बल घटकांपर्यंत शिक्षण पोहोचवण्याचे कार्य केले. त्यांच्या कार्यात फुले-शाहू-आंबेडकर विचारांचा ठसा स्पष्टपणे दिसून येतो. सन्मानपत्र स्वीकारताना भावूक होत बाबाराव महादवाड म्हणाले, हा पुरस्कार माझ्या आयुष्यभराच्या सेवेला लाभलेले खरे यश आहे. मी हा सन्मान माझ्या विद्यार्थ्यांना आणि सहकाऱ्यांना अर्पण करतो.

कार्यक्रमाला उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, अशा शिक्षकांमुळेच समाज उजळतो, शिक्षणाला आत्मा मिळतो आणि पिढ्या घडतात. महात्मा ज्योतीराव फुले यांच्या क्रांतिकारी कार्याची प्रेरणा घेऊन शिक्षण, समाज आणि राष्ट्राच्या प्रगतीसाठी अखंड कार्य करणाऱ्या शिक्षकांना सलाम करत हा सोहळा उत्साहात पार पडला.शिक्षक हा केवळ ज्ञानदाता नसून समाजाच्या प्रगतीचा दीपस्तंभ असतो बाबाराव महादवाड यांच्या कार्याने हे पुन्हा अधोरेखित झाले. महात्मा ज्योतिराव फुले शिक्षक परिषद महाराष्ट्र या अंतर्गत के.रामचंद्र पाटील माध्यमिक शाळेचे गौरी शेळगांव चे सेवानिवृत्त मुख्याध्यापक बाबाराव रामजी महादवाड यांना नुकताच राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल नायगांव तालुक्यातील राजकीय ,सामाजिक ,शैक्षणिक,क्षेत्रातील अनेक मान्यवर मित्र मंडळी कडून अभिनंदन केले जात आहे.

## 'वादळ' आत्मकथनाचा प्रकाशन सोहळा

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. ३ नोव्हेंबर-**

येथील पीपल्स महाविद्यालय परिसरातील एज्युकेशन सोसायटी सभागृहात अर्जुन वाघमारे लिखित विस्तवाकडून वास्तवाकडील एक अविस्मरणीय प्रवास मांडणाऱ्या 'वादळ' या आत्मकथनाचे प्रकाशन नांदेड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष, माजी खासदार तथा प्रसिद्ध हृदयरोग तज्ञ डॉ.व्यंकटेश काब्दे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक तथा संविधानाचे गाढे अभ्यासक डॉ.अनंत राऊत हे होते. तर प्रमुख पाहुणे प्रसिद्ध साहित्यिक विचारवंत देविदास फुलारी, स्वा. रा.ती. मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथील माध्यम संकुलाचे संचालक डॉ.राजेंद्र गोणारकर, ज्येष्ठ नाट्यकर्मी डॉ.विजयकुमार माहुरे, लेखक तथा संपादक डॉ. विलास ढवळे यांची उपस्थिती होती.


कार्यक्रमाची प्रास्ताविक प्रा.अशोककुमार दवणे तर सूत्रसंचालन डॉ.प्रमोद वाघमारे यांनी केले तसेच आभार प्रदर्शन सुनिता वाघमारे (कदम) यांनी मांडले.कार्यक्रम यशस्वीतेसाठी भीम पँथरचे मराठवाडा अध्यक्ष विनोद वाघमारे, प्रवीण गोडबोले नितीन वाघमारे, बालाजी बामिलवाड आदींनी परिश्रम घेतले.

## किनवटमध्ये उद्या भाजपाची जनसंवाद सभा

**तभा वृत्तसेवा**
**किनवट, दि. ३ नोव्हेंबर-**

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने माजी मुख्यमंत्री तथा खा. अशोकराव चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत किनवट येथील कलावती मंगल कार्यालय ५ नोव्हेंबर ला सायंकाळी ५ वाजता भव्य जनसंवाद सभा आयोजित करण्यात आली आहे.

नगरपरिषद निवडणुकी साठी कुठल्या ली क्षणी आचार संहीता लागण्याची



शक्यता असल्याने सर्वच राजकीयपक्षानी जन संवाद सभा सभांचे आयोजन करुन इच्छूका सह स्थानिक पदाधीकाऱ्या समवेत बैठाका घेतल्याजात आहे . भाजपा साठी ही प्रतीष्ठेची निवडणूक असल्याने यश मीळवीण्या साठी रननीती आ.भिमराव केराम पुढे सरसावले आहेत या पार्श्वभूमीवर माजी मुख्यमंत्री खा.आशोकराव चव्हाण या जनसंवाद सभेला उपस्थीत राहुन कार्यकर्त्याना मार्गदर्शन करणार आहे. या सभेला किनवट तालुक्यातील कार्यकर्त्यानी व नागरिकांनी उपस्थित रहावे असे आवाहन आमदार भीमराव केराम यांनी केले,

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसाठी सर्वच पक्षांनी कंबर कसली आहे नुकतेच भाजपाचे मराठवाडा संघटन मंत्री यांचाही दौरा झाला, या पार्श्वभूमीवर आगामी होऊ घालणाऱ्या नगरपालिका पंचायत समिती व जिल्हा परिषद निवडणुकीचे भाजपचा झेंडा फडकवण्यासाठी खा.अशोकराव चव्हाण आणि आमदार भीमराव केराम यांच्या नेतृत्वाखाली जनसंवाद सभा आयोजित करण्यात आली आहे.

## मुदखेड शहरात आ. श्रीजया चव्हाण यांच्या हस्ते विकास कामाचे भूमिपूजन

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड, दि. ३ नोव्हेंबर-**

महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा खा.अशोक चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली व भोकर विधानसभेच्या आमदार श्रीजया चव्हाण यांच्या उपस्थितीत दि.२ नोव्हेंबर रोजी मुदखेड शहरातील विविध प्रभागात कार्यालय नगरपरिषद विशेष रस्ता अनुदान अंतर्गत विकास कामाचे आ. श्रीजया चव्हाण यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले.

तसेच भोकर विधानसभा मतदारसंघातील भारतीय जनता



पक्षाच्या बूथ प्रमुख व शक्ती प्रमुख केंद्राची बैठक आयोजित करण्यात आली होती यावेळी भाजपाचे मराठवाडा विभागीय संघटक मंत्री संजय कौडगे, मुदखेड अर्धापूर भोकर या तिन्ही तालुक्यातील पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते,

यावेळी शहरातील प्रभाग क्र.१ मधील ओम शांती केंद्रापर्यंत व महादेव मंदिर परिसर सीसी रस्ता नाली बांधकाम, प्र. क्र. २ भिमनगर मधील समाज मंदिराच्या संरक्षण भिंतीचे बांधकाम स्मशानभूमी कडे जाणारा रस्ता व नालीचे बांधकाम, प्र. क्र.४ सीसी रस्ते व नालीचे बांधकाम,प्र. क्र. ६ सीसी रस्ते व नालीचे बांधकाम,व विठ्ठल आचार्य यांच्या संपर्क कार्यालयाचे उद्घाटन,मोंढा अंतर्गत विविध ठिकाणी रस्ता व नालीचे बांधकाम,व्यंकटेश नगर येथील रस्ता व नालीचे बांधकाम, कृष्णा नगर येथे रस्ता व नालीचे बांधकाम, ऊमरी चौक येथे ओपन प्लेस संरक्षण भिंत,वडार गल्ली येथील अंतर्गत रस्ते व नालीचे बांधकाम, वसंत नगर तांडा अंतर्गत सीसी रस्ते व नालीचे बांधकाम, शहरातील इत्यादी ठिकाणी विकास कामाचे भूमिपूजन करण्यात आले.

यावेळी प्रा. कैलास दाड, भाजपा शहराध्यक्ष रामसिंग चव्हाण, माधव पाटील कदम, संजय आऊलवार, राजू बारटोके,गंगाधर डांगे, बजरंग खोडके, विनोद चंद्रे, शंकर राठी,उत्तम चव्हाण, प्रवीण काचावार, कुणाल चौदंते, बाळू पांचाळ, राम आबादार,शैलेश गुडमलवार,चांदू बोकेफोड, मुन्ना चौधरी, डॉ.संदीप पचलिंग, श्रीहरी बैनवाड, ऋषी पारवेकर, कपील लोखंडे, एकबाल कुरेशी, जय चंद्रे, नितिन चौदंते,अविनाश चौदंते,जयप्रकाश चौदंते, मधुकर दवणे, माजी नगरसेवीका सौ. वैशाली चौदंते, माजी नगरसेविका कमलबाई कांबळे, सौ.जयश्री देशमुख, यांच्यासह भाजपा पदाधिकारी कार्यकर्ते यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

CMYK

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## कदम यांची भाजपकडून साकोळ जि.प. गटातून उमेदवारीची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.३, नोव्हेंबर -**

साकोळ जि.प. गटातून भारतीय जनता पक्षाकडून उमेदवारीची मागणी उत्तमराव इस्माईल कदम यांनी पक्षश्रेष्ठीकडे केली आहे. मात्र ही मागणी केवळ राजकीय इच्छा नसून, गेल्या तीन दशकांपासून सुरू असलेल्या लोकाभिमुख कार्याच्या प्रवासाचा परिणाम असल्याचे स्थानिक पातळीवर बोलले जात आहे. जनतेसाठी सातत्याने राबणारा, पक्षनिष्ठ, प्रामाणिक आणि सर्वसमावेशक दृष्टिकोन असलेला कार्यकर्ता जर जिल्हा परिषदेत पोहोचला, तर तो विकासाचा मार्ग जनतेच्या हिताचा ठरेल, असा विश्वास कार्यकर्त्यांमध्ये आहे. उत्तमराव कदम हे आदर्श लोकप्रतिनिधीचे उदाहरण मानले जातात. त्यांच्या वाटचालीत निष्ठा, कार्यक्षमता, सामाजिक बांधिलकी आणि लोकसेवेची तळमळ दिसते. शिरूर अनंतपाळ तहसील कार्यालयासमोर त्यांनी विविध मागण्यांसाठी अनेकदा एक दिवसीय लाक्षणिक उपोषण केले आहे. निलंगा मतदारसंघातील उजेड येथील भाजपचे निष्ठावान कार्यकर्ते म्हणून त्यांची ओळख आहे. त्यामुळे साकोळ जिल्हा परिषद गटातून भाजपकडून उमेदवारी मिळावी आणि कदम यांना जिल्हा परिषदेत पाठवावे, अशी अपेक्षा शिरूर अनंतपाळ तालुक्यातील असंख्य महिला, पुरुष, मित्रमंडळ, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शेतकरी आणि युवक वर्गातून व्यक्त केली जात आहे.



### संक्षिप्त वृत्त...

#### विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय रुग्णालयाचा ओ.पी.डी. बुधवारी बंद

**लातूर, दि.३ नोव्हेंबर -**

गुरुनानक जयंती निमित्त शासकीय सुट्टी असल्यामुळे विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय रुग्णालयातील बाह्यरुग्ण विभाग (ओ.पी.डी.) बुधवार, ५ नोव्हेंबर रोजी बंद राहणार आहे.तथापि, गुरुवार, ६ नोव्हेंबर पासून ओ.पी.डी. नियमित वेळेनुसार सुरू राहील, अशी माहिती वैद्यकीय अधीक्षक डॉ. राहूल अंभगे यांनी दिली आहे. दरम्यान, रुग्णालयातील आपत्कालीन सेवा २४ तास सुरू राहणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

#### लातूर जिल्हा कोषागार कार्यालयात गुरूवारी निवृत्तीवेतनधारकांची बैठक

**लातूर, दि.३ नोव्हेंबर -**

लातूर जिल्हा कोषागार कार्यालयामार्फत बँकेद्वारे निवृत्तीवेतन घेणाऱ्या निवृत्तीवेतनधारक आणि कुटुंब निवृत्तीवेतनधारक संघटनेची बैठक ६ नोव्हेंबर २०२५ रोजी आयोजित करण्यात आली आहे.या बैठकीत हयात प्रमाणपत्र सादरीकरण तसेच निवृत्तीवेतनाशी संबंधित अडीअडचणींवर चर्चा होणार आहे. लातूर जिल्ह्यातील सर्व राज्य शासकीय निवृत्तीवेतनधारक संघटनांनी या बैठकीस उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा कोषागार अधिकारी डॉ. उज्वला पाटील यांनी केले आहे.

#### जि.प. आणि पं.स. निवडणुकांसाठी अंतिम मतदार यादी जाहीर

**लातूर, दि.३ नोव्हेंबर -**

राज्य निवडणूक आयोगाच्या २३ सप्टेंबर, १० ऑक्टोबर आणि २७ ऑक्टोबर रोजीच्या आदेशानुसार जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदार यादी तयार करण्याचा कार्यक्रम निश्चित करण्यात आला होता. त्या अनुषंगाने लातूर जिल्हा परिषद तसेच तिच्या अधीन असलेल्या पंचायत समित्यांच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकांसाठी अंतिम मतदार यादी ३ नोव्हेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे, अशी माहिती प्रशासनाकडून देण्यात आली. अंतिम छापील मतदार याद्या संबंधित तहसील कार्यालयांमध्ये माहितीसाठी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. नागरिकांनी आपली नावे तपासण्यासाठी आणि माहिती अवलोकनासाठी या अंतिम मतदार याद्यांचा आढावा घ्यावा, असे उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) यांनी आवाहन केले आहे.

#### सावरगाव खून प्रकरणातील तिघांची निर्दोष मुक्तता

**लातूर, दि.३ नोव्हेंबर -**

सावरगाव खून प्रकरणातील आरोपी विकास हिंगे, कैलास हिंगे आणि सतिश कांबळे यांना सबळ पुरावा नसल्याने जिल्हा न्यायालयाने निर्दोष मुक्त केले आहे. सदर प्रकरणात मुरुड पोलिस ठाण्यात किशोर घुटे यांनी तक्रार दाखल केली होती की, १६ मार्च २०२१ रोजी भागवत घुटे यांची सावरगाव शिवारात हत्या करण्यात आली. तपासानंतर पोलिसांनी आरोपींविरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले होते. सरकार पक्षाकडून नऊ साक्षीदारांची जबाबे नोंदविण्यात आली, मात्र साक्षींमध्ये विसंगती आणि पुराव्यांचा अभाव असल्याने जिल्हा न्यायाधीश एस.जे. बारुखा यांनी आरोपींना निर्दोष मुक्त केले. आरोपींच्या वतीने ॲड. एस. एस. ढवण-पाटील यांनी काम पाहिले असून त्यांना ॲड. इरफान सय्यद व ॲड. प्रकाश भुरे यांनी सहकार्य केले.

#### माईर फार्मसी महाविद्यालयात नवप्रवेशित विद्यार्थ्यांचे प्रवेशाभिनंदन

**लातूर, दि.३ नोव्हेंबर -**

लातूर येथील माईर पुणे अंतर्गत महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल सायन्सेस महाविद्यालयात बी.फार्मसी प्रथम वर्षातील नवप्रवेशित विद्यार्थ्यांसाठी प्रवेशाभिनंदन समारंभ प्रेरणादायी वातावरणात पार पडला. या कार्यक्रमास लातूर एमआयटीचे परिसर समन्वयक पृथ्वीराज कराड प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने झाली. विद्यार्थ्यांसह पालकांची उपस्थिती लक्षणीय होती. यावेळी बोलताना पृथ्वीराज कराड यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत करत उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. मधुकर गुट्टे यांनी फार्मसी व्यवसायातील संधी, जबाबदाऱ्या व नैतिक मूल्यांवर मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वैजिनाथ डिग्गे यांनी शिस्त, नियमावली आणि विद्यार्थी वर्तणुकीसंबंधी धोरणांची माहिती देत विद्यार्थ्यांना अनुशासित आणि प्रगतिशील राहण्याचे आवाहन केले.

## नीलकंठेश्वर मंदिराच्या जतन-संवर्धनासाठी निधी कमी पडू देणार नाही








### सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांची ग्वाही

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.३, नोव्हेंबर -**

राज्यात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकार सक्षमपणे कार्यरत असून, विकसित महाराष्ट्रासोबतच राज्याचा संस्कृतिक आणि पौराणिक वारसा जपणे हेच आमचे मुख्य ध्येय आहे, अशी ग्वाही राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी दिली. ते निलंगा येथील ग्रामदैवत श्री नीलकंठेश्वर मंदिराच्या जतन व संवर्धन कार्याच्या शुभारंभ सोहळ्याप्रसंगी बोलत होते. यावेळी मंदिरात झालेल्या महाआरतीस भाविकांनी प्रचंड गर्दी केली होती.

याप्रसंगी माजी मंत्री आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर, युवा नेते अरविंद पाटील निलंगेकर, सांस्कृतिक कार्य विभागाचे संचालक तेजस गर्गे, तेजस्विनी आफळे, शिवसेनेचे लिंबन महाराज रेशमे, माजी नगराध्यक्ष बाळासाहेब शिंगाडे, राहुल केंद्रे, अजित पाटील कव्हेकर, दत्ता शाहीर आदी मान्यवर उपस्थित होते.

शेलार म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील सांस्कृतिक आणि ऐतिहासिक स्थळांचे जतन करण्याची जबाबदारी माझ्याकडे सोपवली आहे. निलंग्यातील नीलकंठेश्वर मंदिर हे राज्यातील दुर्मिळ आणि जगाला हेवा वाटावा असे मंदिर आहे. येथे महादेव, विष्णू आणि पार्वती या त्रिमूर्तींची अद्वितीय एकत्र उपस्थिती पाहायला मिळते.

ते पुढे म्हणाले, जोपर्यंत मुख्यमंत्री फडणवीस आणि मी जबाबदारीवर आहोत, तोपर्यंत महाराष्ट्रातील कोणतेही मंदिर जीर्णावस्थेत राहणार नाही. जतन आणि संवर्धनासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही. श्री नीलकंठेश्वर मंदिराला राज्य संरक्षित वास्तूचा दर्जा दिला जाईल.

शेलार यांनी आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर यांच्याशी असलेल्या दीर्घ कार्यसंबंधांचा उल्लेख करत, युवा मोर्चाच्या काळापासून आम्ही एकत्र कार्यरत आहोत आणि नीलकंठेश्वराचे हे कार्य राज्याच्या सांस्कृतिक वैभवाचा दीप उजळवणारे ठरेल, असे सांगितले. दरम्यान, आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर म्हणाले, नीलकंठेश्वर मंदिर हे आमचे श्रद्धास्थान आहे. या मंदिराच्या सेवेत आम्ही भाविक म्हणून कायम उभे आहोत. या विषयावर राजकारण न करता सर्वांनी एकत्र येऊन मंदिराचे कार्य भावी पिढीसाठी आदर्श ठरावे, यासाठी प्रयत्न करावेत.

ते पुढे म्हणाले, आगामी काळात जिल्हा परिषद, महानगरपालिका व नगरपरिषद निवडणुकीत विरोधकांना चारी मुंड्या चित करून महायुतीचा भगवा झेंडा फडकवू. त्यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हेलिकॉप्टर अपघातातून बचावाचा उल्लेख करत, नीलकंठेश्वराच्या आशीर्वादानेच हा चमत्कार घडला, असेही नमूद केले.

कार्यक्रमस्थळी भगव्या कमानी, झेंडे व पताकांनी संपूर्ण निलंगा शहर भगवे झाले होते.

महिलांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती. श्री नीलकंठेश्वर मंदिराच्या प्रतिमेचे पूजन करून सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांचा भक्तगणांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक तेजस्विनी आफळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन माजी नगराध्यक्ष बाळासाहेब शिंगाडे यांनी मानले.

## गांधी चौकातील सिग्नल बंद; वाहतूक कोंडीने नागरिक हैराण

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.३, नोव्हेंबर -**

शहरातील मध्यवर्ती गांधी चौकातील सिग्नल यंत्रणा बंद पडल्याने वाहतूक कोंडीचे गंभीर चित्र निर्माण झाले आहे. वाहनांची गर्दी, रस्त्यावरची लगबग आणि सिग्नल न चालू असल्याने वाहनधारक तसेच पादचारी यांना त्रास सहन करावा लागत आहे.

या चौकात नेहमीच मोठ्या प्रमाणावर वाहतूक असते. काही दिवसांपूर्वी येथे सिग्नल यंत्रणा बसविण्यात आली होती; मात्र ती सध्या बंद अवस्थेत असून केवळ नावालाच उभी आहे. त्यामुळे वाहनधारकांना दोन मिनिटेसुद्धा थांबायची तयारी नसल्याने वाहतूक गोंधळ उडत आहे. फळ विक्रेते आणि खरेदीसाठी येणाऱ्या ग्राहकांची गर्दी नेहमीच असल्याने या ठिकाणी वाहतुकीत अडथळे निर्माण होत आहेत. विशेष म्हणजे,



वाहतूक नियंत्रण शाखा याच चौकाच्या जवळ असूनही सिग्नल बंद असल्याकडे त्यांचे दुर्लक्ष झाल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

नागरिकांनी सिग्नल यंत्रणा तात्काळ सुरू करून वाहतूक सुरळीत करण्यासाठी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी प्रशासनाकडे केली आहे.

## धर्मशाळा व दंत रुग्णालयाचे बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.३, नोव्हेंबर -**

उदगीर शहरात उभारण्यात आलेल्या धर्मशाळा व दंत रुग्णालयाचे उद्घाटन राज्याचे सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात पार पडले. या उपक्रमामागे माजी मंत्री आमदार संजय बनसोडे आणि उदयगिरी लायन्स नेत्र रुग्णालयाचे अध्यक्ष डॉ. रामप्रसाद लखोटिया यांची संकल्पना असून, आरोग्यसेवा आणि सामाजिक कार्य यांचा सुंदर संगम या माध्यमातून साधला आहे.

नगरविकास विभागाकडून केवळ १ रुपयांचा नाममात्र निधी मंजूर करण्यात आला असून, धर्मशाळा आणि रुग्णालय उभारणीसाठी एकूण १ कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला आहे. धर्मशाळा सुमारे ७ हजार चौरस फूट जागेवर बांधण्यात आली असून, रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांसाठी खोल्या, शौचालये आणि इतर सर्व आवश्यक सोयी-



सुविधा उपलब्ध आहेत.

रुग्णालयास शकुंतलादेवी बनसोडे लायन्स दंत रुग्णालय असे नामकरण करण्यात आले आहे.

या रुग्णालयामुळे उदगीर व परिसरातील नागरिकांना नेत्र व दंतोपचारासाठी अत्याधुनिक सुविधा आता स्थानिक स्तरावरच उपलब्ध होणार आहेत.

कार्यक्रमास माजी मंत्री आ. संजय बनसोडे, नेत्र रुग्णालयाचे सचिव प्रदीप बेद्रे, सहसचिव प्रा. महेश बसपुरे, ईश्वरप्रसाद बाहेती, सुरेश देबडवार, बालाजी आदेप्पा, प्रा. डॉ. श्याम डावळे यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

या प्रकल्पामुळे उदगीर शहरातील आरोग्यसेवा अधिक सक्षम होणार असून, हे पाऊल आरोग्यसेवेतील एक मोलाचे योगदान ठरेल, असे उदयगिरी लायन्स नेत्र रुग्णालयाचे अध्यक्ष डॉ. रामप्रसाद लखोटिया यांनी सांगितले.

## जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांतील भरती प्रक्रिया पारदर्शक व ऑनलाइन पद्धतीने होणार : सहकार मंत्री बाबासाहेब पाटील

**तभा वृत्तसेवा**
**चाकूर, दि.३, नोव्हेंबर -**

राज्यातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमधील भरती प्रक्रिया आता पूर्णपणे ऑनलाइन आणि पारदर्शक पद्धतीने घेण्यात येणार असून, स्थानिक उमेदवारांना प्राधान्य दिले जाणार आहे. असा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य शासनाने घेतला असल्याची माहिती सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी दिली.

सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांनी तयार केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार, या भरती प्रक्रिया खइझड (इन्स्टिट्यूट ऑफ बँकिंग पर्सनल सिलेक्शन), ढउड (टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस) आणि चघउङ (महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन लिमिटेड) या नामांकित संस्थांमार्फत राबविण्यात येणार आहे.

राज्यातील सर्व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमध्ये स्थानिक उमेदवारांना ७० टक्के जागांवर प्राधान्य मिळणार आहे, तर उर्वरित ३० टक्के जागा जिल्ह्याबाहेरील उमेदवारांसाठी खुल्या असतील. उमेदवारांकडे संबंधित जिल्ह्याचे मूळ रहिवासी अथवा अधिवास प्रमाणपत्र असणे बंधनकारक राहील.



सहकार मंत्री पाटील म्हणाले, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचे कार्यक्षेत्र त्या जिल्ह्यापुरते मर्यादित असल्याने, स्थानिक उमेदवारांना संधी दिल्यास बँकेचे ग्राहक, सभासद व ठेवीदारांना अधिक चांगली सेवा मिळेल. ही भरती प्रक्रिया अधिक विश्वसनीय, पारदर्शक आणि जनतेचा विश्वास वाढविणारी ठरेल.

सहकार आयुक्त व निबंधकांनी तयार केलेल्या मार्गदर्शक सूचनांना शासनाने मंजुरी दिली असून, संबंधित शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. या निर्णयामुळे राज्यातील सहकारी बँकांमधील भरती प्रक्रिया न्याय्य, पारदर्शक आणि गुणवत्तापूर्ण उमेदवारांना संधी देणारी ठरणार असल्याचा विश्वास सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी व्यक्त केला.

## खेर्डा शिवारात नातेवाईकांकडून ११० क्विंटल सोयाबीन चोरी

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.३ नोव्हेंबर -**

कळंब तालुक्यातील खेर्डा शिवारात एका शेतकऱ्याचे ११० क्विंटल सोयाबीन चोरून नेल्याची घटना उघडकीस आली असून या प्रकरणी फिर्यादीच्या नातेवाईकांविरोधात कळंब पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

प्राप्त माहितीनुसार, फिर्यादी बिभीषण सुखदेव लोकरे (वय ४० वर्षे, रा. खेर्डा, ता. कळंब, जि. धाराशिव) यांचे खेर्डा शिवारातील गट क्र.४९, ७८, १०६, व १११ मधील एकूण १७ एकर शेतीतून ११० क्विंटल सोयाबीन, किंमत सुमारे ४ लाख १८ हजार रूपये आरोपींनी चोरून नेले.

## श्री तुळजाभवानी मंदिरातील ऑनलाईन बुकिंग कालावधी वाढविला

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.३ नोव्हेंबर -**

श्री तुळजाभवानी मंदिरातील अभिषेक पूजा पास, देणगी दर्शन पास आणि स्पेशल देणगी दर्शन पास यांचे ऑनलाईन बुकिंग आता सात दिवसांऐवजी पंधरा दिवसांपर्यंत करता येणार आहे, अशी माहिती मंदिर संस्थानच्या तहसीलदार तथा व्यवस्थापक माया माने यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली.

पूर्वी भाविकांना फक्त पुढील सात दिवसांचेच बुकिंग करता येत होते. परंतु, भाविकांच्या वाढत्या गर्दीचा आणि सोयीचा विचार करून मंदिर संस्थानने ही मर्यादा वाढविली आहे. सध्या दररोज रात्री १२ वाजता पुढील सात दिवसांसाठी बुकिंग खुले होत असते. आता दिनांक ५ नोव्हेंबरपासून ही सुविधा दररोज सकाळी ११ वाजल्यापासून पुढील पंधरा दिवसांसाठी खुली राहील, अशी माहिती संस्थानकडून देण्यात आली आहे.

**आता पंधरा दिवसांपर्यंत अभिषेक व दर्शन पास उपलब्ध...**

तसेच मंदिर संस्थानने स्पष्ट केले आहे की, नोंदणी करताना भाविकांनी स्वतःचा सुस्पष्ट (स्पष्ट दिसणारा) फोटो अपलोड करावा. अपलोड केलेला फोटो व्यक्तीशी जुळत नसेल, तर त्या भाविकास प्रवेश दिला जाणार नाही. (उदा. ब्लॅक फोटो, श्रीदेवीचा फोटो किंवा इतर कोणत्याही



व्यक्तीचा फोटो अपलोड करू नये. तसे आढळल्यास प्रवेश नाकारला जाईल.)

भाविकांनी आधारकार्डनुसार संपूर्ण नाव, अचूक आधार क्रमांक आणि स्पष्ट फोटो अपलोड करणे आवश्यक आहे. तसेच पूजेच्या वेळी ओळखपत्राची मूळ प्रत सोबत ठेवणे बंधनकारक आहे.

रजिस्ट्रेशनवेळी नोंद झालेल्या भाविकांची पडताळणी करूनच प्रवेश दिला जाणार असून भाविकांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन मंदिर संस्थानने केले आहे.

## वारकरी संप्रदायाचा विचार जगभर पोहोचविण्यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करणार : ना. शेलार

### औसा येथे तीन दिवसीय कीर्तन महोत्सवाचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.३, नोव्हेंबर -**

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचा वारसा जपणाऱ्या कीर्तन परंपरेचा गौरव आणि समाजजागृतीचा संदेश देण्यासाठी सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय कीर्तन महोत्सवाला औशा येथे सुरुवात झाली.

हा तीन दिवसांचा सांस्कृतिक सोहळा नाथ सभागृह, औसा येथे सोमवारपासून (दि. ३ नोव्हेंबर) प्रारंभ झाला असून, महोत्सव सर्वांसाठी



विनामूल्य खुला ठेवण्यात आला आहे. या कार्यक्रमाचा लाभ सर्व नागरिकांनी घ्यावा, असे आमदार अभिमन्यू पवार यांनी आवाहन केले आहे. महोत्सवाचे आयोजन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रेरणेने तसेच सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे.

कार्यक्रमाच्या पहिल्या दिवशी भक्तिमय वातावरणात कीर्तनाचा महासोहळा रंगला. विठ्ठल-रुक्मिणी मंदिराचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, गणेश सोनवणे, आणि हभप. सुधाकर इंगळे महाराज सोलापुरकर यांनी आपल्या कीर्तनातून भक्ती, संतविचार, अध्यात्म आणि जीवनमूल्यांचा संदेश दिला. मंगळवार, दि.४ नोव्हेंबर रोजी अमोल बुवा फडकरी आणि साध्वी सोनाली दीदी करपे यांची कीर्तनसेवा होणार आहे. तर बुधवार, दि.५ नोव्हेंबर रोजी महोत्सवाच्या अखेरच्या दिवशी डॉ. पुजा (महानुभाव पंथ) आणि वेणा भारती महाराज आपल्या कीर्तनातून संतपरंपरेचा अनोखा भावार्थ सादर करणार आहेत.

या कीर्तन महोत्सवाच्या माध्यमातून संत परंपरेचा संदेश, सामाजिक ऐक्य, श्रद्धा आणि संस्कार यांची नाळ अधिक दृढ होणार असून आयोजकांनी नागरिक, युवक-युवतींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून भक्ती आणि संस्कृतीचा आनंद घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.